# मानवी जीवनातील गूढ रहस्ये

(भाग ४)

लेखक
स्वामी दत्तावधूत

ॐ वनिता बुक्स
मुंबई – ४०००१२.

ॐ वनिता बुक्स

❍ सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

❍ पुष्प अकरावे

❍ प्रथमावृत्ती : नोव्हेंबर २००३
द्वितीयावृत्ती : नोव्हेंबर २००७
तृतीयावृत्ती : नोव्हेंबर २०१०
चतुर्थावृत्ती : मार्च २०१३
पंचमावृत्ती : जुलै २०१४
षष्ठमावृत्ती : जुलै २०१६
सप्तमावृत्ती : जानेवरी २०१८

❍ प्रकाशक :–
ॐ वनिता बुक्स
बी–२१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था
(पानवाला चाळ), डॉ. एस्. एस्. राव मार्ग,
लालबाग, मुंबई –४०००१२.
दूरध्वनी : २४१८७३३९.

❍ मूल्य : रु. १५०/–

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | विटेवरी उभे परब्रह्म सावळे | ५ |
| २. | असाही भेटतो देव ! | १० |
| ३. | सिद्धपुरुष | २९ |
| ४. | आजही अशा घटना घडतात. | ३६ |
| ५. | चार अवस्था | ५६ |
| ६. | आत्मसाक्षात्कार | ६१ |
| ७. | यज्ञ | ६४ |
| ८. | तांत्रिकांच्या कथा | ६६ |
| ९. | दुर्जन संगतीचे दुष्परिणाम | ९१ |
| १०. | कर्म व त्याचे परिणाम | १०५ |
| ११. | सामूहिक प्रारब्ध | १३५ |
| १२. | मृत्यूनंतरचे जीवन | १४७ |
| १३. | ग्रंथरहस्य | १७१ |

भरो शांतीने विश्व ।

व्हावे आध्यात्मिक विश्व ।

भक्ती, ज्ञान, प्रेमयुक्त ।

व्हावे अखिल विश्व हे ।।

– श्री स्वामी दत्तावधूत

# १. विटेवरी उभे परब्रह्म सावळे

अनेक मराठी ग्रंथांमध्ये असे लिहिलेले आहे की, श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विटेवर साक्षात् परब्रह्म पांडुरंग उभे आहेत. दर वर्षी आषाढी यात्रेला जवळजवळ पाच ते सात लाख लोक पांडुरंगाच्या दर्शनाला येतात; तसेच कार्तिकी यात्रेला जवळजवळ पाच ते सात लाख लोक पांडुरंगाच्या दर्शनाला येतात. दररोज हजारो लोक पांडुरंगाचे दर्शन करतात.

असा हा पांडुरंग विटेवर उभा आहे.

पांडुरंग विटेवर उभा आहे असे जे सर्व संत सांगतात, त्याचा अर्थ असा आहे की...

संसारातील सुखाचा जोपर्यंत **वीट** येत नाही, तोपर्यंत पांडुरंगाचे म्हणजेच आत्मारामाचे, म्हणजेच परमात्म्याचे दर्शन होणे कठीण आहे. संसारातील सुखाचा वीट प्रथम यावा लागतो, मगच त्या विटेवर पांडुरंग उभा राहतो, असे संतांना म्हणायचे

आहे, असे मला वाटते. मानव मात्र संसार सुखाचा व्हावा म्हणून; तसेच संसारातील उणीवा दूर व्हाव्यात म्हणून पांडुरंगाची उपासना करत असतो. एकंदरीत या पांडुरंगाच्या भक्तीमध्ये, तसेच ज्यांनी या पांडुरंगाचा महिमा गायिला; त्या संतांच्या नावांमध्ये गूढ अर्थ भरलेला असावा, असे मला वाटते. यातील काही संतांच्या नावांमध्ये किती तत्त्वज्ञान भरलेले आहे, केवढे आध्यात्म भरलेले आहे हे पाहू या !

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम.

पंढरपूर येथील पांडुरंगाच्या भक्तांचे हे अतिशय आवडते भजन आहे. हे भजन गात पांडुरंगाचे भक्त देहभान विसरून नाचतात. या भजनातील संतांच्या नावांमध्येही आध्यात्म साठलेले आहे.

**निवृत्ती** – सर्व प्रकारच्या प्रापंचिक सुखातून, आशा, अपेक्षांमधून मन निवृत्त होणे म्हणजे **निवृत्ती !**

**ज्ञानदेव** – ज्या साधकाचे मन सर्व आशा अपेक्षांतून निवृत्त झाल्यानंतर त्याच्या मनामध्ये जो ज्ञानाचा प्रकाश पडतो, तोच **ज्ञानदेव !**

**सोपान** – सोपान म्हणजे शिडी ! ज्याला ज्ञान प्राप्त झालेले आहे, असा साधक मुक्तीची शिडी चढू लागतो किंवा

मुक्तीच्या दिशेने एक-एक पायरी वर चढू लागतो, त्या अवस्थेला **सोपान** असे म्हणतात.

**मुक्ताबाई –** सोपान चढून गेल्यानंतर मुक्ताबाई भेटते. म्हणजे **जीवनमुक्त** अवस्था प्राप्त होते. येथे साधकाचा **सिद्ध** होतो.

**एकनाथ –** येथे 'अहं ब्रह्मास्मि' असा साक्षात्कार सिद्धपुरुषाला होत असतो. या सर्व जगाचा मीच एक नाथ आहे असे वाटते, त्या अवस्थेला **एकनाथ** म्हणतात.

**नामदेव –** ईश्वराच्या सर्व नामांमध्ये मी भरलेला आहे असा अनुभव सिद्धपुरुषाला येतो. या अवस्थेला **नामदेव** असे म्हणतात.

**तुकाराम –** येथे त्याला सर्व विश्वामध्ये भरून राहिलेला परमेश्वर दिसतो व तो म्हणतो **तू का राम** ! या अनुभवाला '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' असेही म्हणतात. येथे सिद्ध ईश्वर होतो. अशा प्रकारे प्रपंचातील सुखाचा जेव्हा माणसाला वीट येतो, तेव्हा त्याच्या अंत:करणात वैराग्य निर्माण होते. तपश्चर्येच्या तापाने ही वीट चांगली भाजली जाते व या विटेवर परब्रह्म उभे राहते.

हे परब्रह्म विटेवर उभे राहिले म्हणून त्याला **विठ्ठल** असे म्हणतात. विठ्ठल म्हणजे विटेवर ठासून किंवा पाय रोवून उभा

राहिलेला ! तो धवल आकाशाप्रमाणे धवल रंगाचा आहे, म्हणून त्याला पांडुरंग असेही म्हणतात.

ही वीट सुरुवातीला खूप कच्ची असते. गुरुरूपी भट्टीमध्ये ही वीट जेव्हा भाजली जाते, तेव्हा ती पक्की होते.

गुरु आपल्या भक्ताला अनेक प्रकारचे कष्ट देतात व त्याच्या अंत:करणातील वैराग्याची वीट चांगली भाजून पक्की करतात.

अशा पक्क्या विटेवरच परमात्मा, परब्रह्म, परमेश्वर, पांडुरंग उभा राहतो व नंतर –

**देह ही पंढरी । आत्मा पांडुरंग ।।**
**नांदतो केवळ । परब्रह्म ।।**

अशी अवस्था प्राप्त होते.

अशा प्रकारे मानवाच्या जीवनामध्ये जेव्हा वैराग्यरूपी वीट तयार होते, त्यावेळेला तो सद्‌गुरुला शरण जातो व सद्‌गुरुरूपी भट्टीमध्ये जेव्हा ही वीट चांगली भाजली जाते व पक्की होते तेव्हा निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम अशा सर्व अवस्था त्याला प्राप्त होतात व तो परब्रह्माशी तादात्म्य पावतो.

विटेवर पाय घट्ट रोवून जो उभा राहतो, त्याला **विठ्ठल** असे म्हणतात. प्राण जेव्हा आज्ञाचक्राकडून सहस्रारचक्राकडे जातो, तेव्हा ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी थोडासा फुगीर भाग तयार

होतो. या अवस्थेला पांडुरंग असे म्हणतात; तसेच प्राण आज्ञाचक्रात पोहोचेपर्यंत सूक्ष्मदेह आकाशात दिसणाऱ्या पांढऱ्या ढगांप्रमाणे स्वच्छ होतो, हलका होतो; या अवस्थेलाही पांडुरंग असे म्हणतात. संतवचनामध्ये गूढ रहस्ये भरलेली असतात. आध्यात्मामध्ये जसजशी प्रगती होऊ लागते, तसतसा संतांच्या गूढ वचनांचा अर्थ कळायला लागतो.

परमेश्वराच्या असंख्य नामांपैकी सर्वांत सोपे नाम म्हणजे **राम!** राम नाम अतिशय सोपे आहे, म्हणून अनेक संतांनी 'राम नाम' घेण्यास सांगितले आहे. आबाल-वृद्धांना राम या ईश्वरी नामाचा उच्चार करणे अतिशय सोपे जाते, म्हणून आम्ही सर्वांना राम नाम देतो, असे संत सांगतात. या अतिशय साध्या-सोप्या राम नामातही अतिशय गूढ रहस्य भरलेले आहे.

रम् हे अग्निबीज असून, या रम् बीजाचा सतत जप केला असता सूक्ष्मदेहामध्ये प्रचंड आध्यात्मिक ताप निर्माण होतो, प्रचंड उष्णता निर्माण होते व संपूर्ण सूक्ष्मदेहाला ती शुद्ध करून टाकते. हे रम् बीजाक्षर मणिपूरचक्रालाही जागृत करते. या रम् बीजापासून संतांनी राम असे ईश्वराचे नाम तयार केले व ते सर्व समाजाला दिले.

संतांच्या वचनामध्ये अशी गूढ रहस्ये दडलेली असतात.

## २. असाही भेटतो देव !

देव कोणाला कसा भेटेल हे काहीच सांगता येत नाही. देवाने जर भेट द्यायची ठरविली, तर तो कोणालाही, कोठेही भेटू शकतो. माझ्या प्रवासी जीवनामध्ये मला अशा काही कथा ऐकायला मिळाल्या. त्यातील काही येथे सांगत आहे.

**एक**

मध्य प्रदेशामधील अरण्यामध्ये एक मनुष्य जंगलात गेला होता. रात्री त्याने जंगलातच वस्ती केली. शेकोटी पेटवून तो बसला होता. अचानक त्याने पाहिले जंगलातून वाघ आला व त्याच्यापासून सुमारे दहा-वीस फूट अंतरावर येऊन बसला.

वाघाला पाहून या गृहस्थाची भीतीने बोबडी वळली; परंतु थोड्याच वेळात त्याने स्वत:ला सावरले व त्याने मनातल्या मनात भगवान् शंकराचा धावा सुरू केला. मृत्यूच्या भीतीने जिवाच्या आकांताने त्याने ईश्वराचा धावा केला. अचानक आकाशात लख्ख प्रकाश पडला. त्या प्रकाशात भगवान्

शंकराचे त्याला दर्शन झाले. इतक्यात तो वाघही तेथून पळून गेला. या भक्ताला गाढ झोप लागली. स्वप्नामध्ये रात्रभर तो भगवान् शंकराच्या सहवासात होता.

सकाळी उठला तेव्हा त्याचे मन अगदी परमानंदात डुंबत होते.

या घटनेनंतर ज्याज्यावेळी त्याला भगवान् शंकराची आठवण होई, त्यात्यावेळी त्याच्या दृष्टीसमोर भगवान् शंकर प्रकट होत असत. कालांतराने लोक त्याला सत्पुरुष मानू लागले.

**दोन**

एक मुस्लीम गृहस्थ दुपारच्या वेळी रस्त्याने चालत जात होता. त्याच्या डोळ्यांसमोर एक तेजस्वी प्रकाशगोल प्रकट झाला. या प्रकाशगोलातून एक तेजस्वी सत्पुरुष अवतीर्ण झाले. ते या मुस्लीम गृहस्थास म्हणाले...

''मला दत्त म्हणतात. मी तुझ्या हातून कार्य करून घेणार आहे!''

या घटनेनंतर तो मुस्लीम गृहस्थ दत्तभक्त झाला. गाणगापूरच्या वाऱ्या करू लागला व नंतर त्याने एक दत्तमंदिर बांधले व अनेक हिंदू-मुस्लीमांना दत्तभक्तीला लावण्याचे कार्य केले.

**तीन**

ही घटना सुमारे शंभर वर्षांपूवी घडलेली आहे. सावंत नावाचे एक गृहस्थ फॉरेस्ट ऑफिसर होते. एकदा ते सकाळी उठून जंगलामध्ये जायला निघाले. त्यांच्या आठ-नऊ वर्षांच्या मुलाने बाबा मी पण येतो असा हट्ट धरला. त्यांनी मुलाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, तर मुलाने जोरजोरात रडायला सुरुवात केली. मुलाला तसेच रडत ठेवून सावंत जंगलात निघून गेले.

मुलगा रडत होता व मुलाची आई त्याची समजूत काढत होती; पण मुलगा मला बाबांकडे जायचेच म्हणून जोरजोराने रडत राहिला. कंटाळून मुलाच्या आईने त्याचा नाद सोडला व तिने इतर कामे करायला सुरुवात केली.

आईचे लक्ष नाही असे पाहून मुलाने घर सोडले व सरळ जंगलाच्या दिशेने चालायला सुरुवात केली. पायवाटेने तो मुलगा जंगलामध्ये दोन-तीन मैल चालत गेला.

इतक्यात त्याने एक विशालकाय साधुपुरुष समोरून चालत येताना पाहिले. त्यांच्या हातात एक वेताची काठी होती.

डोळे लाल करून ते या मुलाला जोरात ओरडले.

वेताच्या छडीचा एक फटका त्यांनी मुलाच्या पाठीत मारला व पुनश्च घरी जाण्यास दरडावून सांगितले.

हा मुलगा साधूच्या भीतीने पळत-पळत घरी आला.

कालांतराने हे साधुपुरुष त्याला स्वप्नात येऊन मार्गदर्शन करू लागले व मोठा झाल्यानंतर या मुलाने अनेकांना मार्गदर्शन केले.

**चार**

एका वृद्ध दांपत्याला एक मुलगा होता. मुलगा जन्मापासूनच आंधळा होता. त्या वृद्ध आईवडिलांना आपल्या आंधळ्या मुलाचे आपल्यामागे कसे होईल, अशी सतत चिंता लागून राहिलेली होती व ते वारंवार तसे येणाऱ्या-जाणाऱ्यास बोलून दाखवीत.

आपल्या आंधळेपणामुळे आपले आई-वडील खूप दुःखी आहेत याचे मुलालाही खूप दुःख होत असे. मुलगा वीस-बावीस वर्षांचा होता. येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडून गाणगापूर दत्त क्षेत्राविषयी त्याने बरेच काही ऐकले होते. एक दिवस तो आपल्या वडिलांना म्हणाला,

''बाबा मला गाणगापूर क्षेत्रात नेऊन सोडा. श्रीदत्ताच्या त्या पवित्र स्थानात लोक जी काही भिक्षा घालतील ती खाऊन मी राहीन. येथे या खेडेगावात राहून मरण्यापेक्षा गाणगापूरसारख्या तीर्थक्षेत्रामध्ये मरण आले तर अधिक चांगले.''

मुलाचे उद्‌गार ऐकून आई-वडिलांना खूप दुःख झाले. त्यांनी मुलाची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला; परंतु मुलाने गाणगापूरला जाण्याचा हट्टच धरला.

अनेक दिवस आई-वडील मुलाची समजूत काढत होते; परंतु मुलगा काही ऐकेना. माझे काय व्हायचे ते होवो, तुम्ही मला फक्त गाणगापूरला सोडा, असा हट्ट मुलाने आई-वडिलांजवळ धरला.

शेवटी नाईलाजाने वडील मुलाला घेऊन गाणगापूरला गेले.

आंधळ्या मुलाला गाणगापूरला एकटे सोडून स्वत: घरी परतणे याचे मुलाच्या वडिलांना अतिशय दु:ख होत होते. वडील दु:खाने रडत होते व मुलाला आपण घरी जाऊया म्हणत होते. मुलगा वडिलांची समजूत घालत होता.

मुलगा वडिलांना सांगत होता...

''तुम्ही माझी काळजी करू नका ! मी दत्तप्रभूंच्या दारात आहे. ते माझी सर्वतोपरी काळजी घेतील. मी आता मरेपर्यंत येथेच राहणार. काहीही झाले तरी मी आता हे स्थान सोडून कोठेही जाणार नाही.''

त्यांचा हा असा संवाद चालू आहे, इतक्यात अतिशय तेज:पुंज साधू तेथे आला. त्या साधूने मुलाच्या वडिलांना काय प्रकार आहे म्हणून विचारले. मुलाच्या वडिलांनी सर्व हकीकत सांगितली. सर्व हकीकत ऐकल्यानंतर ते यतिराज म्हणाले...

''काळजी करू नका. तुमच्या मुलाला चांगले दिसेल !'' असे म्हणून त्यांनी त्या मुलाच्या डोक्यावर आपला वरदहस्त

ठेवला.

तात्काळ मुलाला दृष्टी आली. त्याला चांगले दिसू लागले. मुलाने त्या यतिराजांच्या पायावर डोके ठेवले. मुलाच्या वडिलांना अतिशय आनंद झाला.

यतीवेषधारी भगवान् दत्तात्रेय त्या मुलाला म्हणाले,

''बाळ तुला आता चांगले दिसू लागले आहे ! घरी जा! आई-वडिलांची सेवा कर !''

मुलगा म्हणाला, ''आई-वडील, घरदार सोडून मी आपल्याला शरण आलो आहे. मी आता आपल्याबरोबरच राहणार !''

वडील म्हणाले...

''माझ्या मुलाला आपण दृष्टिदान दिलेत. मी मुलाला आपल्या हवाली करत आहे. मला परमानंद होत आहे. माझ्या मुलाला दृष्टी मिळाली व साक्षात् परमेश्वराच्या आश्रयाखाली माझा मुलगा आहे, यापेक्षा अधिक भाग्य ते काय ! मी आता आनंदाने घरी जाईन,'' असे म्हणून साश्रुपूर्ण नयनांनी त्या मुलाच्या वडिलांनी मुलाचा व त्या सिद्धपुरुषाचा निरोप घेतला. मुलाचे वडील निघून गेल्यानंतर ते यतिराज मुलाला म्हणाले,

''बाळ ! तुझ्यासाठी मी खूप लांबून आलो आहे. मला आता गेले पाहिजे !''

मुलगा म्हणाला, ''मीही आपल्याबरोबर येणार !''

''ठीक !'' म्हणून त्या यतिराजांनी मुलाला डोळे मिटण्यास सांगितले. एक-दोन क्षणानंतर ते यतिराज म्हणाले...

''बाळ डोळे उघड!'' डोळे उघडून मुलाने पाहिले. गाणगापूरचा सर्व परिसर अदृश्य झाला होता. त्याऐवजी ते दोघेही एका गुहेत येऊन पोहोचले होते.

''आपण कोठे आहोत,'' त्या मुलाने विचारले.

यतिराज म्हणाले, ''आपण गाणगापूरपासून शेकडो मैल दूर आहोत. खास तुझ्यासाठी मी गाणगापूरला आलो होतो.''

त्या गुहेमध्ये एक ऋषी ध्यानस्थ बसलेले होते. ते ऋषी विशालकाय होते. बसून त्यांची उंची सुमारे दहा फूट होती. म्हणजे ते ऋषी जर उभे राहिले असते, तर त्यांची उंची २२ फूट ते २३ फूट नक्कीच झाली असती.

त्या विशालकाय महाऋषींना त्या मुलाने साष्टांग नमस्कार घातला व यतिराजांना विचारले...

''हे ऋषी कोण आहेत?''

तेव्हा ते यतिराज म्हणाले,

''तो मीच आहे ! या देहातून बाहेर पडून मी हे रूप धारण करून तुझ्या संरक्षणार्थ गाणगापूरला आलो होतो. हा माझा देह सत्ययुगातील आहे !''

त्या यतिराजाने त्या मुलाला काही दिवस आपल्याजवळ ठेवून घेतले, काही सिद्धी त्याला प्रदान केल्या व आता घरी जाऊन आई-वडिलांची सेवा कर, लग्न कर, असे सांगून त्याला घरी पाठविले.

**पाच**

एक सैनिक होता. सैन्यामध्ये नोकरी करीत असताना त्याची तब्येत वारंवार बिघडू लागली, म्हणून त्याने सैन्यातील नोकरी सोडली व आसाममधील आपल्या घरी येऊन राहू लागला. घरी आई एकटीच होती. दोन-तीन वर्षे आईने मुलाची खूप सेवा केली; परंतु वृद्धावस्थेमुळे तिला मुलाची सेवा करणे कठीण होऊ लागले.

एक दिवस वैतागून ती मुलाला म्हणाली...

''तू जर मरशील तर खरेच बरे होईल. मी तरी सुटेन !''

आईचे हे उद्‌गार ऐकून मुलाला अतिशय वाईट वाटले. त्या रात्री आई झोपल्यानंतर त्याने दरवाजाची कडी काढली व वाट फुटेल तिकडे चालायला सुरुवात केली. पहाटेपर्यंत तो चालत होता. सकाळी त्याने पाहिले की, आपण एका डोंगराजवळ पोहोचलो असून समोर एक गुहा होती व गुहेतून धूर बाहेर पडत होता.

त्याचे गाव हिमालय पर्वतातच होते. त्यामुळे गुहा व धूर

पाहून नक्कीच कोणीतरी येथे साधू असणार, असे त्याला वाटले.

तो टेकडी चढून वर गेला. त्याने पाहिले की, गुहेत एक साधू ध्यानस्थ बसले होते व त्यांच्या समोर धुनी जळत होती. हा धुनीजवळ जाऊन बसला व साधूची समाधी केव्हा उतरते याची प्रतीक्षा करू लागला. त्याला ज्या अनेक व्याधी होत्या, त्यात एक व्याधी अशी होती की, त्याला अचानक फिट येत असे. फिट आली की, तो जोराने किंचाळून बेशुद्ध पडत असे.

धुनीजवळ बसून साधूची समाधी केव्हा उतरते याची तो प्रतीक्षा करत होता. इतक्यात अचानक त्याला फिट आली व जोराने किंचाळून तो बेशुद्ध झाला.

त्याच्या किंचाळण्याने त्या साधू महाराजांची समाधी उतरली. त्यांनी रागाने या किंचाळणाऱ्या तरुणाकडे पाहिले. धुनीतील चिमटा उचलला व जोराने त्याच्या डोक्यात मारला व त्या साधू महाराजांनी पुनश्च डोळे मिटले व प्रगाढ समाधीत निमग्न झाले. जवळजवळ आठ-दहा तास हा युवक गाढ झोपेत होता. तो जेव्हा झोपेतून उठला तेव्हा त्याला खूप उत्साही वाटत होते. आपण आता पूर्ण बरे झालो आहोत असे त्याला वाटू लागले. इतक्यात त्या योगीराजांनी डोळे उघडले. ते म्हणाले...

''तुला भूक लागली आहे. मी तुला खायला देतो.''असे

म्हणून त्यांनी धुनीतील राखेचे सहा लाडू बनविले व या तरुणाला ते खायला सांगितले.

तरुणाने लाडू हातात घेताच ते सर्व लाडू बुंदीचे झाले.

तरुणाचे लाडू खाऊन झाल्यानंतर ते योगीराज त्या तरुणाला म्हणाले,

''तुझे आजारपण संपले आहे. तू आता ठणठणीत बरा झाला आहेस ! तू आता घरी जा ! तुझी आई खूप आठवण काढत आहे व काळजी करीत आहे !''

तरुण म्हणाला...

''मी आता घरी जाणार नाही. मी येथेच तुमची सेवा करत राहणार !'' यावर ते योगीराज म्हणाले...

''तुला येथे राहता येणार नाही. तू घरी जा ! तुझ्या आईला तुझ्यावर रागावल्याचा खूप पश्चात्ताप होत आहे. कालपासून ती जेवली नाही. तुला ताबडतोब घरी जायला पाहिजे!'' असे म्हणून योगीराजांनी त्या युवकाला घरी जाण्याचा आग्रह केला.

तेव्हा तो युवक म्हणाला...

''मी रोज आपल्या दर्शनाला दूध घेऊन येत जाईन. कृपा करून मला एवढी परवानगी द्या ! आपण माझे प्राण वाचविले आहेत. माझे अनेक वर्षांचे आजारपणही बरे केले आहे. तेव्हा एवढी सेवा मला करू द्या ! नाही म्हणू नका !''

यावर योगीराज म्हणाले...

''तू दररोज सकाळी आंघोळ करून एक वाडगाभर दूध घेऊन अंगणात उभा राहा व माझे स्मरण कर. मी सर्प रूपाने तेथे प्रकट होईन व दूध प्राशन करीन ! ''

योगीराजांचा निरोप घेऊन तो तरुण आपल्या घरी आला. त्याच्या आईला खूप आनंद झाला. त्याने आईला सर्व हकीकत सांगितली.

दुसऱ्या दिवशी वाडगाभर दूध घेऊन तो अंगणांत उभा राहिला व त्याने योगीराजांचे स्मरण केले.

तात्काळ एक नाग त्याच्या समोर फडा काढून उभा राहिला. तरुणाने त्या नागासमोर दूध ठेवले. नाग ते दूध प्यायला व निघून गेला.

त्या दिवसापासून दररोज ते योगीराज नागाच्या रूपात येऊन त्या युवकाच्या हातून दूध पिऊन जाऊ लागले. कालांतराने त्या युवकाने एक छोटेसे मंदिर बांधले व त्या मंदिरामध्ये दूधाचा वाडगा ठेवू लागला. योगीराज नागरूपाने तेथे येत व दूध पिऊन जात; परंतु ती गुहा त्याला परत कधीही सापडली नाही.

आत्मस्वरूप योगी आपल्या देहातून आत्मा बाहेर काढतात व कोणतेही रूप धारण करू शकतात. अशा प्रकारे कार्यानुसार ते त्यांना हवे ते रूप धारण करून आपले कार्य करून पुन्हा

मूळ शरीरात परत येतात.

हिमालयातील सुखी नावाच्या गावाजवळ असलेल्या पर्वत शिखरावर लोक वाडगाभर दूध भरून ठेवतात. त्या अरण्यात राहणारे योगी सर्परूपाने येऊन दूध पिऊन जातात.

सुशिक्षित-बुद्धिवादी लोक विचार करताना हाडामांसाच्या स्थूलदेहाचाच विचार करतात. स्थूलदेहात राहणाऱ्या आत्म्याचा विचार करत नाहीत. त्यामुळे नाग दूध पीत नाही. नाग दूध प्यायला तर मरून जाईल असे म्हणतात. अर्थात, नाग दूध पीत नाही हे खरे आहे व प्यायला तर मरून जाईल हेही खरे आहे; परंतु दूध पिणारे नाग हे स्थूलदेहधारी नाग नसतात, तर योगी सर्पाचे रूप धारण करतात व दूध पितात.

जेव्हा योगी नागाचे रूप धारण करतात तेव्हा त्यांचा हाडामांसाचा देह समाधी अवस्थेत असतो व त्यांचा आत्मा नागचे रूप धारण करतो व दूध पितो. अशा प्रकारे देहाबाहेर पडून योगी काही काळापुरते कुठलेही रूप धारण करून फिरतात व आपले कार्य करतात.

उज्जैन शहराच्या सीमेवर एक भैरवाचे मंदिर असून, या भैरवाच्या मंदिरात एक पाषाण शिळा आहे. या भव्य पाषाण शिळेला शेंदूर फासलेला आहे. भैरव म्हणून सर्व लोक त्या शिळेला नमस्कार करतात. या शिळेचे वैशिष्ट्य असे की, या शिळेत राहणारा आत्मा दारू पितो. आजही हा प्रकार चालू

आहे.

कोकणामध्येही पूर्वी अशी काही स्थाने होती. या स्थानांमध्ये लोक वर्षातून एकदा रेड्याचा बळी देत. बळी दिल्यानंतर या रेड्याचे रक्त मोठ्या पातेल्यात साठविण्यात येत असे. अनेक मणांचा शिजवलेला भात या रक्तामध्ये कालवून तो भात हवेत उडविला जात असे. विशेष म्हणजे हवेत उडविलेल्या भाताचा एक दाणाही परत जमिनीवर पडत नसे. कोणीतरी अदृश्य आत्मा तो भात वरच्यावर खात असे.

अर्थात, अशा प्रकारे रक्तामांसाचे तहानलेले अदृश्य सृष्टीतील हे आत्मे दुष्ट राक्षसांचे असतात. या आत्म्यांना कच्चे रक्तमांस खायला घालून आपण त्यांना अधिक बलवान करीत असतो, हे लोकांच्या लक्षात येत नाही.

खायला-प्यायला घालून आपण या राक्षसांना जितके पोसतो तितके ते बलवान होतात व संपूर्ण समाजावर आपली सत्ता गाजवितात. मनुष्य कधी सज्जन बनणार नाही, अशी दक्षता ते घेत असतात. माणसाला स्वार्थी, लोभी, दुष्ट, कंजूष बनविण्याचे काम वातावरणातील या दुष्ट शक्ती करत असतात.

या सर्व प्रकारातून जर मानवाची सुटका करायची असेल, तर मानवाने बळीची प्रथा बंद करायला हवी व हे लक्षात ठेवायला हवे की, कच्चे रक्तमांस खाऊन फक्त दुष्ट राक्षस आत्मे पुष्ट होतात, कुठलीही देवता प्रसन्न होत नाही. देवतेला

प्रसन्न करायचे असेल तर ईश्वरभक्ती, दान, परोपकार व मानवतेचे आचरण करायला हवे, तरच ईश्वराची प्रसन्नता प्राप्त होईल.

मानवी मन, बुद्धीवर अदृश्य सृष्टीतील दुष्टशक्तींचा, दुष्ट आत्म्यांचा व वाईट स्पंदनांचा प्रभाव सतत पडत असतो.

नैराश्य (Depression) वाईट स्पंदनांच्या संपर्कामुळे येते.

दुष्ट स्पंदनांच्या प्रभावामुळे मन अस्वस्थ-अशांत होते.

मानवी मन, बुद्धीवर जेव्हा दुष्ट आत्मे आपला प्रभाव गाजवू लागतात तेव्हा मनुष्य ईर्षा, द्वेष, मत्सर करू लागतो.

वातावरणातील दुष्ट शक्ती जेव्हा मानवी मन, बुद्धीवर आपली सत्ता गाजवू लागतात तेव्हा मनुष्य गुंड, खुनी, आतंकवादी बनतो.

या सर्व दुष्ट शक्ती पृथ्वीच्या अगदी जवळ असल्याकारणाने पृथ्वीतलावरील मानवावर या स्वत:चा प्रभाव गाजवतात.

**या दुष्ट शक्तीच्या प्रभावापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी ईश्वरभक्तीची कास धरली पाहिजे. एखाद्या स्तोत्राचे हजारो पाठ करून दुष्ट शक्तीबरोबर असणारा संपर्क आपण तोडला पाहिजे व ईश्वरी शक्तीशी संपर्क जोडला पाहिजे. ईश्वरी शक्तीशी संपर्क जोडल्यानंतर हळूहळू आत्मा**

**शुद्ध होऊ लागतो व जसजसा आत्मा शुद्ध होऊ लागतो तसतसे सद्‌गुण व सत्प्रवृत्ती निर्माण होऊ लागतात.**

ज्ञानेश्वरांनी याच उद्देशाने वारकरी संप्रदाय सुरू केला. ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत अनेक संतांनी श्रीकृष्णाची भक्ती करायला लावून वाईट शक्तींच्या प्रभावाखालील समाजाला बाजूला काढण्याचा प्रयत्न केला. हेच कार्य श्रीपाद श्रीवल्लभ, श्री नृसिंहसरस्वती, श्री अक्कलकोट स्वामी, श्री साईबाबा, श्री गजानन महाराज, श्री गोंदवलेकर महाराज यांनी केले.

**सहा**

एकदा एका घरासमोर संध्याकाळच्या वेळी दोन साधू आले. त्या घरामध्ये वृद्ध पती-पत्नी व मुलगा असे तिघे जण रहात होते. ते खूप गरीब होते.

साधूंनी त्या वृद्ध गृहस्थाला, ''आम्हाला एक रात्र राहायला द्या !'' असे सांगितले.

त्या वृद्ध गृहस्थाने दोन्ही साधूंना आदराने घरात नेले व त्यांची राहण्याची व्यवस्था केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी साधूंनी त्या वृद्ध गृहस्थाच्या मुलाला एक मंत्र दिला व या मंत्राचा जप कर, असे सांगितले. एक लाख जप पूर्ण झाल्यानंतर आम्ही तुला परत येऊन भेटू, असे सांगितले व ते निघून गेले.

साधूंनी सांगितल्याप्रमाणे त्या मुलाने साधूंनी दिलेल्या मंत्राचा

एक लाख जप पूर्ण केला.

एक लाख जप पूर्ण होताच त्या दोन साधूंपैकी एक साधू परत या मुलाला भेटण्यासाठी आले. मुलाला घेऊन ते नदीकिनारी गेले व एक विशिष्ट जागा दाखवून म्हणाले तू दररोज येथे बसून मी देतो ते पुस्तक वाच ! असे म्हणून त्यांनी एक छोटेसे पुस्तक त्या मुलाला दिले. हे पुस्तक एखाद्या छोट्याशा नोटबुकाच्या आकाराचे होते व हस्तलिखित होते. हे छोटेसे पुस्तक देऊन मुलाला ते सिद्धयोगी म्हणाले...

''तीन महिने हे पुस्तक तू या नदीच्या किनारी बसून वाच ! तीन महिन्यांत तुला चमत्कार करण्याची शक्ती प्राप्त होईल.'' असे सांगून ते साधू निघून गेले.

त्या मुलाने तीन महिने नदीच्या किनारी बसून त्या छोट्याशा पुस्तकाचे वाचन केले. ते छोटेसे पुस्तक वाचायला त्याला जेमतेम पाच-दहा मिनिटे लागत असत, म्हणून दिवसातून दहा-बारा वेळा तो ते पुस्तक नदीच्या किनारी बसून वाचत असे. तीन महिने पूर्ण झाले, परंतु या मुलाला चमत्कार करण्याची कुठलीच शक्ती प्राप्त झाली नाही, म्हणून त्याने आणखी महिनाभर त्या पुस्तकाचे वाचन केले तरीही त्याला काहीच प्राप्त झाले नाही.

चमत्कार करण्याची शक्ती प्राप्त होईल, असे आश्वासन त्या साधूने दिल्याकारणाने तो मुलगा दररोज आठ ते दहा

तास साधना करीत होता. चार महिने पूर्ण होऊन गेले, तरीही त्याला काही साध्य झाले नाही.

साधूचे वाक्य खोटे कसे झाले ? आपले काही चुकले का? असा विचार करत पुस्तक वाचत तो नदीच्या किनारी बसला होता. अचानक त्याने, ''सब झूट है !'' असे म्हणून ते छोटेसे पुस्तक फाडले व त्याचे तुकडे नदीत टाकले. इतक्यात...

''सब सच है !'' असे शब्द त्याला ऐकू आले. पुस्तकाच्या पानाचे तुकडे जे नदीच्या पाण्यात पडले होते ते पुन्हा एकमेकांना जोडले गेले व हवेतून तरंगत ते पुस्तक पुन्हा त्याच्या जवळ आले.

मुलाने हा चमत्कार पाहिला. हवेतून तरंगत येणारे पुस्तक त्याने हाताने पकडले. श्रद्धेने त्या पुस्तकाला नमस्कार केला व पुन्हा ते पुस्तक वाचायला सुरुवात केली.

अशा प्रकारे आणखी काही दिवस वाचन केल्यानंतर त्याला काही सिद्धी प्राप्त झाल्या व कालांतराने लोक त्याला सत्पुरुष मानू लागले.

**सात**

विरय्या नावाचा एक वृद्ध गृहस्थ नेहमीप्रमाणे जंगलात गुरे चारायला गेला होता. दुपारचे सुमारे चार-साडेचार वाजले होते. आंध्र प्रदेशातील जंगलातील एका दरीमध्ये विरय्याची गुरे चरत

होती व एका उंच शिळेला पाठ टेकून विरय्या पावा वाजवित होता.

अचानक त्याने पाहिले. बारा फडांचा एक विशालकाय महाभयंकर नाग फडा काढून हळूहळू पुढे येत आहे.

हा नाग इतका विशाल होता की, त्याच्या डोळ्याची बुबुळे गोटीच्या आकाराएवढी होती.

आपल्यापासून दहा-बारा फुटांवर तो महाभयंकर अजस्त्र नागराज पाहून विरय्याची भीतीने गाळण उडाली व बसल्या जागीच त्याला लघवीला व संडासला झाले.

त्याने मनात विचार केला जर मी पावा वाजविणे बंद केले, तर हा नाग मला डसल्याशिवाय राहणार नाही, म्हणून डोळे मिटून तो पावा वाजवीतच राहिला.

पाच-दहा मिनिटानंतर त्याने हळूच डोळे उघडून पाहिले. नाग निघून गेला होता. या वृद्ध गृहस्थाने तेथून धूम ठोकली. पळत-पळत जवळ असलेल्या ओढ्याजवळ तो गेला. आपले खराब झालेले धोतर-शर्ट तेथे त्याने धुतले व स्वच्छ आंघोळ केली. हे सर्व करताना तो मनात विचार करत होता...

''उद्या परत त्या जागी जायचे. आज ज्या शिळेला पाठ लावून बसलो होतो त्या शिळेवर चढायचे. शिळा चांगली पंधरा-वीस फूट उंच आहे. दोन-चार चांगले मोठमोठे दगड त्या शिळेवर चढवून ठेवायचे व पावा वाजविण्यास सुरुवात करायची.

पाव्याचा आवाज ऐकून तो नाग उद्या परत येईल. तो त्या शिळेजवळ येताच त्याच्या डोक्यात ते दगड टाकायचे व त्याला मारायचे. साल्याने मला घाबरविले काय ! उद्या बघतोच त्याच्याकडे!''

रागाच्या भरात असे विविध विचार विरय्या करत होता. इतक्यात त्याने समोरून एका साधूला येताना पाहिले.

तो साधू विरय्याच्या जवळ आला व म्हणाला,

''तू कसला विचार करतोस ?''

विरय्या म्हणाला, ''नाही ! मी कसलाच विचार करत नाही !''

यावर त्या साधूने विरय्याने जे जे विचार केले ते ते सर्व त्याला सांगितले व म्हणाला, ''असे वेडेवाकडे विचार करू नकोस ! तो बारा फडांचा नाग देव आहे व तोच मी आहे !'' असे म्हणून तो साधू अदृश्य झाला.

त्यानंतर बऱ्याच वर्षांनी विरय्याने जेथे नागाचे दर्शन झाले, त्या जागी एक छोटेसे मंदिर बांधले.

देव कोणाला कसा भेटेल हे काही सांगता येत नाही, हे वरील उदाहरणांवरून सिद्ध होते.

❁ ❁ ❁

# ३. सिद्धपुरुष

**श्री ब्रह्मेंद्रस्वामी**

सुमारे साडेचारशे वर्षांपूर्वी सोळाव्या शतकामध्ये ब्रह्मेंद्रस्वामी नांवाचे एक सिद्धपुरुष होऊन गेले. या सिद्धपुरुषानी असे लिहिले आहे की...

''कलियुगाची पाच हजार वर्षे पूर्ण झाल्यानंतर म्हणजे १९०१ नंतर समाजामध्ये खोटेपणा वाढेल, व्यापारी प्रवृत्ती वाढेल, लोक पराकोटीचे स्वार्थी बनू लागतील. माणुसकीचे प्रमाण कमी होईल, दंगेधोपे वाढतील, गुन्हेगारी वाढेल. जे साधू लुच्चे व भोंदू असतील व समाजाला उल्लू बनविणारे असतील अशा साधूंच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने लोक जातील व जो खरा साधू असेल, पवित्र आत्मा असेल त्याच्या जवळ दहा-वीस खरे भक्त असतील. हजारातील जेमतेम दहा माणसे नि:स्वार्थी असतील, नऊशे नव्वद लोक स्वार्थी व पैशाच्या मागे लागलेले असतील. सत्ताधारी लोक जनतेला

खोटी आश्वासने देऊन फसविण्याचे काम करतील. दुष्ट शक्तींची वाढ होईल, रोगराई वाढेल. सुखाची साधने वाढतील, पण माणसाचे मन मात्र अशांत व अस्वस्थ राहील. सर्व काही आहे पण सुख नाही, अशी माणसाची अवस्था होईल. १२४ वर्षे म्हणजे सुमारे इ. स. २०२५ पर्यंत असा काळ आहे. २०२५ नंतर हळूहळू परिस्थिती बदलू लागेल. चांगले लोक सत्तेवर येतील. समाजात नव्वद टक्के लोक सज्जन असतील !''

ब्रह्मेंद्रस्वामींनी जे काही लिहिले आहे त्याचा अनुभव येत आहे. माणसाला सर्व सुखे मिळाली आहेत; पण त्याच्यातील **माणूस** हरवला आहे.

ब्रह्मेंद्रस्वामी त्रिकालज्ञानी संत होते. आंध्र प्रदेशामध्ये त्यांनी सुमारे १७५ वर्षे कार्य केले व कंदेमल्लय्यापल्ली येथे समाधी घेतली.

### श्री चिदंबर दीक्षित

कर्नाटकामध्ये चिदंबर दीक्षित नावाचे एक थोर सिद्धपुरुष सतराव्या शतकात होऊन गेले. कर्नाटकातील हजारो लोकांना त्यांनी ईश्वरभक्तीला लावले.

एकदा त्यांच्याकडे, गरीब मनुष्य आला व त्याने आपले दारिद्र्य दूर व्हावे म्हणून चिदंबर दीक्षितांची प्रार्थना केली.

श्री चिदंबर दीक्षितांनी ओंजळभर माती त्याला प्रसाद म्हणून दिली. ती माती घेऊन तो घरी गेला. घरी जाऊन पाहतो, तर त्या मातीचे सोने झाले होते.

भारतातील राजे उन्मत्त झालेले असून, संपूर्ण भारतावर इंग्रजांचे राज्य येईल, असे श्री चिदंबर दीक्षितांनी इंग्रज येण्यापूर्वी सांगितले होते. समाज जेव्हा चुकीच्या पद्धतिने वागू लागतो, तेव्हा देशावर परचक्र येते किंवा देश पारतंत्र्यात जातो.

सिद्धपुरुष समाजाला सन्मार्ग दाखविण्याचे कार्य करतात. माणसांची मने मोठी व्हावीत, म्हणून प्रयत्न करतात. समाजातील कुप्रथा नष्ट व्हाव्यात म्हणून सिद्धपुरुष प्रयत्न करीत असतात. सिद्धपुरुष सदेह असताना जितके कार्य करतात तितकेच कार्य देहपातानंतरही करतात. सुमारे ३०० वर्षांपूर्वी श्री चिदंबर दीक्षितांनी केंगेरी येथे समाधी घेतली. समाधी घेतल्यानंतरही गेली ३०० वर्षे ते लोकांना आपल्या जागृततेचे अनुभव देत आहेत.

**श्री बसवेश्वर**

भारतातील जातिप्रथा नष्ट होऊन संपूर्ण समाज एकसंघ झाला नाही, तर संपूर्ण भारत परकीय आक्रमणाखाली भरडला जाईल. भारतावर मुसलमानांचे राज्य येईल.

इतकेच नव्हे, तर भारतातील कोट्यावधी हिंदुंना मुस्लीम

केले जाईल, मुस्लीम झालेले हे हिंदू आपल्याच बांधवांना ठार मारायला कमी करणार नाहीत, हे ओळखून बसवेश्वरांनी जातिप्रथा समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न सुमारे बाराशे वर्षांपूर्वी केला.

त्यांनी आपल्या एका मुलीचे लग्न महार जातीमधील मुलाबरोबर करून दिले, तर दुसऱ्या मुलीचे लग्न चांभार जातीतील एका तरुणाबरोबर लावून दिले.

सुमारे बाराशे वर्षांपूर्वी जातिप्रथा मोडण्याचा त्यांनी अतिशय क्रांतिकारी प्रयत्न केला.

कुडलसंगम, कर्नाटक येथे त्यांनी तपश्चर्या केली व आत्मज्ञान प्राप्त करून घेतले. संपूर्ण चराचरात एकच परमेश्वर भरून राहिलेला आहे. त्यामुळे सर्वांशी समानतेने वागणे व परोपकार करणे हाच मानवाचा खरा धर्म होय, असे ते लोकांना सांगत असत.

जातिभेदासारख्या वाईट प्रथा, उच्च-नीच भाव, स्त्रिया व बलहीन लोकांवर केले जाणारे अन्याय या सर्व गोष्टींना तिलांजली जर दिली नाही, तर सामूहिक प्रारब्धाचा परिणाम म्हणून राक्षसी प्रवृत्तीच्या मुस्लीम राजांचे आक्रमण हिंदुस्थानवर होईल व संपूर्ण हिंदुस्थानाला शेकडो वर्षे मुस्लीम राज्यकर्त्यांचा जुलूम सहन करावा लागेल, असे भविष्य त्यांनी वर्तविले होते.

## श्रीअल्लमप्रभू

सुमारे एक हजार वर्षांपूर्वी श्री अल्लमप्रभू नावाचे एक महान सिद्धपुरुष कर्नाटकात होऊन गेले.

संपूर्ण हिंदुस्थानामध्ये मुसलमानांचे राज्य पूर्ण उत्कर्षाप्रत पोहोचलेले होते. लाखो लोकांना दररोज मुस्लीम बनविले जात होते. मुल्ला, मौलवी, काजी यांचे जुलूम खेड्यापाड्यातील गोरगरीब जनता सहन करत होती. मुस्लीम होण्यापेक्षा मेलेले बरे म्हणून शेकडो हिंदू दररोज आत्महत्या करत होते.

अशा भयाण काळामध्ये या महान सिद्धपुरुषाने मुस्लीमांचा अल्ला व हिंदूंचा प्रभू एकच आहे, असा संदेश दोन्ही धर्मांतील लोकांना दिला. त्यामुळे लोक त्यांना **श्री अल्लमप्रभू** म्हणू लागले. मुस्लीम लोक त्यांना अल्ला मानत व हिंदू लोक त्यांना प्रभू म्हणत.

श्री अल्लमप्रभू महान सिद्धयोगी होते. मुस्लीम लोक त्यांना मुस्लीम समजत तर हिंदू लोक त्यांना हिंदू समजत; परंतु ते कोण होते व त्यांचा जन्म कोठे झाला हे काहीच कळायला मार्ग नाही.

कर्नाटकामध्ये अल्लमप्रभूंच्या नावाने अनेक मंदिरे आहेत व दर्गेही आहेत. आजही हिंदू लोक त्यांना परमेश्वर मानतात व मुस्लीम लोक त्यांना अल्ला मानतात. हिंदू व मुस्लीमांना

ईश्वरभक्तीला लावून सज्जन बनविण्यासाठी त्यांनी अनेक चमत्कार केले व असंख्य हिंदू-मुस्लीमांना भक्तिमान बनविले.

### श्री तैलंगस्वामी

श्री तैलंगस्वामींचा जन्म आंध्र प्रदेशातील तेलंगणा प्रांतात झाला; परंतु त्यांनी बनारस येथे वास्तव्य केले. लोक त्यांना तैलंगस्वामी म्हणत. तीनशे वर्षांहून अधिक काळ त्यांनी लोकोद्धाराचे कार्य केले. श्री गोंदवलेकर महाराज व श्री लाहिरी महाशय यांनाही तैलंगस्वामींचा सहवास घडला.

इ. स. १८८७ मध्ये त्यांनी समाधी घेतली.

हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन या तीनही धर्मातील लोक स्वामीजींची सेवा करत असत. या तीनही धर्मांतील लोकांना ऐक्याने राहण्याचा उपदेश स्वामीजी करीत असत.

संपूर्ण उत्तर भारतामध्ये श्री तैलंगस्वामींना लोक भगवान् बाबा विश्वनाथ म्हणून मान देत.

लोकांच्या आधी-व्याधी दूर करण्यासाठी व लोकांना भक्तिमार्गाला लावण्यासाठी श्री तैलंगस्वामींनी हजारो चमत्कार केले.

अशा प्रकारे भारतातील हजारो सिद्धपुरुषांनी समाजाला सन्मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्ञानेश्वरांपासून शिर्डीच्या साईबाबांपर्यंत सर्व सिद्धपुरुषांनी समाजाला ईश्वराच्या

दिशेने पुढे नेण्यासाठी कार्य केले.

सिद्धपुरुषांची मनोभावे सेवा केली असता, आध्यात्मात प्रगती होते म्हणून सिद्धपुरुषांची जास्तीतजास्त सेवा करणे आवश्यक आहे. आजकाल सिद्धपुरुषांचे दर्शन दुर्मिळ झाले आहे.

समाजामध्ये स्वार्थ व व्यापारी वृत्ती यांची वाढ झाल्याकारणाने सिद्धपुरुषांनी अवतार घेणे थांबविले आहे की काय, असे वाटावे इतपत परिस्थिती गंभीर झाली आहे आणि ज्यांना आध्यात्माचा गंधही नाही किंवा ज्यांनी साधना व तपश्चर्या करून ईश्वरप्राप्ती केलेली नाही व फक्त प्रसिद्धी हेच ज्यांचे धोरण आहे, अशा लोकांकडे वाढत जाणारी गर्दी पाहून पुष्कळवेळा या समाजाचे काय होईल असे वाटते.

सध्याच्या काळामध्ये परमेश्वरस्वरूप सिद्धपुरुषांचे अस्तित्व नगण्य असल्याने लोकांनी आपल्याच घरी बसून दररोज तास-दीड तास नामस्मरण करावे असे माझे मत आहे.

❋❋❋

## ४. आजही अशा घटना घडतात.

भक्तिविजय नावाच्या ग्रंथामध्ये अनेक संतांच्या कथा असून, या संतांनी ईश्वराची कृपा व्हावी म्हणून कसे कष्ट केले व ईश्वराची प्रसन्नता प्राप्त झाल्यानंतर ईश्वराने त्यांच्यासाठी कशा लीला केल्या यांची वर्णने आहेत.

कबीराचे शेले ईश्वराने विणले. कबीर 'राम' नामस्मरणात दंग झालेला होता. मेलेली गुरे-ढोरे वाहून नेण्याचे काम चोखामेळा करीत असे व या कामात विठ्ठल त्याला मदत करीत असे.

जनाबाईला दळण दळताना विठ्ठल तिला मदत करीत असे. एकनाथांच्या घरी श्रीखंड्या या नावाने भगवान् श्रीकृष्ण पाणी भरत होते. मंगळवेढ्याच्या दामाजीपंतानी बिदरच्या बादशहाचे अन्नधान्याचे भांडार गोरगरिबांना वाटून टाकले.

बिदरच्या राजाने दामाजीपंताना अटक करण्याचा हुकूम सोडला.

पंढरीच्या विठोबाने विठू महाराचे रूप घेऊन लुटविलेल्या सर्व धान्याच्या पैशाचा भरणा केला व भक्तांचे रक्षण केले. अशी अनेक वर्णने भक्तिविजय ग्रंथात आहेत. अर्थात, भक्तांनी ईश्वराची कृपा प्राप्त होण्यासाठी किती कष्ट केले याचीही वर्णने आहेत.

सध्याच्या कलियुगामध्ये मनुष्य स्वार्थी, कंजूष व फक्त स्वत:पुरताच विचार करणारा असा झालेला असल्याने, त्याच्या हातून भक्ती, परोपकार व दानधर्म या गोष्टी घडत नाहीत. त्यामुळे ईश्वराची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी लागणारे कष्ट करणे हे दहा लाखांतील एखाद्यालाच जमेल.

प्रश्न असा निर्माण होतो की, ईश्वराने पूर्वीच्या संतांसाठी जसे चमत्कार केले तसे चमत्कार सध्याच्या काळात कुठे घडले असतील काय ?

याचे उत्तर मी होय असे देईन ! यांतील काही चमत्कार मी स्वतः अनुभविलेले आहेत, ते पुढे देत आहे.

## औदुंबरी नित्य वसे

पंचवीस वर्षांपूर्वी मी श्रीक्षेत्र औदुंबर येथे साधना करीत होतो. त्यामुळे साहजिकच काही लोकांच्या ओळखी झाल्या होत्या. त्यानंतर श्रीगुरुंच्या आज्ञेने मी कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांना प्रदक्षिणा करण्यासाठी म्हणून चालत प्रवास करण्यास सुरुवात केली. माझी पदयात्रा चालूच होती; परंतु कृष्णा नदीला प्रदक्षिणा करत-करत मी पुन्हा औदुंबरला आलो. त्यावेळी हनुमंत

पाटील नावाच्या एका मुलाने मला पुढील प्रश्न विचारला.

स्वामीजी आपण पट्टणकोडोलीला कधी गेला होता काय?

मी म्हणालो, ''या गावाचे नाव मी प्रथमच ऐकत आहे. मी कधीही या गावी गेलेलो नाही !''

हे ऐकून हनुमंत पाटील विचारात पडला. त्याला काय बोलावे सुचेना म्हणून मी विचारले, ''का ? काय झाले ?''

हनुमंत पाटील म्हणाला...

''काही दिवसांपूर्वी पट्टणकोडोली गावाहून माझा मामा आला होता. तो तुमची चौकशी करत होता. त्याला तुम्हाला भेटायचे होते.''

आम्ही त्याला सांगितले...

''सुमारे तीन वर्षांपूर्वी ते तुंगभद्रा व कृष्णा नदीला प्रदक्षिणा करण्यासाठी येथून चालत निघाले आहेत, ते अद्याप परत आले नाहीत.''

यावर मामा म्हणाला...

''दोन महिन्यांपूर्वी स्वामीजी आमच्या गावात आले होते. त्यांनी सर्वांना दत्तभक्ती करण्याचा उपदेश केला. मी औदुंबरला राहतो असे म्हणाले व बसमध्ये बसून ते निघून गेले. आमच्या गावामध्ये ते चार दिवस राहिले होते. जाताना त्यांना निरोप देण्यासाठी बस स्टँडवर सुमारे दोनशे लोक गोळा झाले होते. त्यात मीसुद्धा होतो.''

मामाने जे काही सांगितले ते ऐकून आम्हाला अतिशय आश्चर्य वाटले, तरीपण आम्ही असा विचार केला की...

''बहुतेक स्वामीजींची प्रदक्षिणा भंग पावली व त्यामुळे त्यांनी गाडीमध्ये बसून फिरण्यास सुरुवात केली असावी व फिरत-फिरत पट्टणकोडोलीला गेले असावेत !''

हनुमंत पाटीलने सांगितलेली सर्व हकीकत ऐकून मी हतबद्ध झालो. मला काहीच सुचेना. मी क्षणभर ध्यान केले. घडलेला सर्व प्रकार माझ्या लक्षात आला व मी हनुमंत पाटीलला म्हणालो,

''गेल्या तीन वर्षांपासून मी प्रदक्षिणेचे व्रत घेतले आहे. अद्याप मी कुठल्याही वाहनात बसलेलो नाही. अजून माझा चालत प्रवास बाकी आहे. अजून माझी प्रदक्षिणा पूर्ण व्हायची आहे व या औदुंबर क्षेत्रातच माझी प्रदक्षिणा पूर्ण होईल व येथेच मी वाहनात बसेन. याशिवाय पट्टणकोडोली गावाचे नाव मी प्रथमच ऐकत आहे. त्यामुळे त्या गावी जाण्याचा प्रश्नच येत नाही. इतकेच नव्हे, तर ते गाव कोठे आहे व त्या गावी जायचे कसे हेही मला माहीत नाही; परंतु हा जो चमत्कार घडला, तो कसा घडला हे मात्र मी तुला सांगतो.''

**''या औदुंबर क्षेत्रात राहणाऱ्या भगवान् श्री दत्तात्रेयांनी हा चमत्कार घडविला आहे. माझे रूप घेऊन ते पट्टणकोडोली गावात गेले व गावातील लोकांना त्यांनी दत्तभक्ती करण्यास प्रवृत्त केले !''**

''आता श्री दत्तमहाराजांनी माझेच रूप कां घेतले, हे त्यांचे त्यांना माहीत !''

माझ्या आयुष्यामध्ये ईश्वराने माझे रूप घेऊन फिरण्याची ही पहिली घटना आहे. या पहिल्या घटनेनंतर ईश्वराने अनेकवेळा माझे रूप घेऊन अनेकांना सहकार्य केले व मला मात्र फुकटचे क्रेडिट दिले. अशा अनेक घटनांपैकी एक-दोन घटना पुढे देत आहे.

### सुजाता

सुजाता नावाची एक मुलगी एक दिवस माझ्याकडे आली व मला तिने पुढीलप्रमाणे हकीकत सांगितली.

''गेल्या वर्षी मी खूप आजारी होते. खूप औषधोपचार करूनही ताप उतरत नव्हता. पंधरा दिवस मी अंथरुणाला खिळून होते.''

''एक दिवस दुपारच्या वेळी मी अंथरुणावर बसलेली असताना अचानक तुम्ही प्रगट झालात व म्हणालात...

''सुजाता तू आजारी आहेस का? तुला आता बरे वाटेल!'' असे म्हणून तुम्ही डोक्यावर हात ठेवलात. त्याच क्षणी मी ठणठणीत बरी झाले ! या घटनेला चार वर्षे पूर्ण झाली. त्या क्षणापासून आजपर्यंत मी परत कधीही आजारी पडले नाही.''

''सतपुरुष चमत्कार करीत नाहीत, तर त्यांच्या हातून चमत्कार

घडतात !'' असे मी लहानपणी कोठेतरी वाचलेले होते. ते कसे घडतात, याचा प्रत्यक्ष अनुभव या मुलीच्या मुखाने मी स्वत:च ऐकत होतो. अर्थात, वाचकांना हे सांगायची आवश्यकता नाही की, हा चमत्कार भगवान् श्री दत्तात्रेयांनी घडविला.

## एका आदिवासी स्त्रीचा अनुभव

एक आदिवासी स्त्री एक दिवस हिल कॉलनी (आंध्र प्रदेश) येथील माझ्या निवासस्थानी येऊन तेथे राहणाऱ्या कुमारस्वामी व गुंडू नरसिंहा यांना सांगू लागली...

''स्वामीजी खाली जंगलामध्ये फिरत आहेत आणि तुम्ही येथे बसून काय करताय?''

यावर गुंडू नरसिंहा म्हणाला, ''स्वामीजी साधनेकरिता दूर कोठेतरी उत्तर हिंदुस्थानात गेलेले आहेत, त्यांना जाऊन वर्ष झाले. ते येथे येतीलच कसे ! तुला जे कोणी दिसले ते स्वामीजी नव्हेत !''

यावर ती आदिवासी स्त्री म्हणाली, ''खाली शेतामध्ये मी काम करीत होते. अचानक मला चक्कर आली; तसेच ताप आल्यासारखे वाटू लागले, म्हणून मी शेतामध्ये स्वामीजींची जी झोपडी आहे त्या झोपडीच्या बाहेर सावलीत बसले. इतक्यात...

स्वामीजी आले. त्यांनी माझी चौकशी केली. झोपडीचा

दरवाजा उघडून आत गेले. मला औषधाची गोळी दिली. पैसे दिले. झोपडीत थोडा वेळ विश्रांती घे ! असे सांगितले व आपण बाहेर निघून गेले.''

''थोडा वेळ मी विश्रांती घेतली. मला खूप बरे वाटले व तुम्हाला हे सर्व सांगण्यासाठी मी वर आले.'' (स्वामीजींचे निवासस्थान टेकडीवर आहे व शेत खाली आहे. म्हणून या गोष्टीमध्ये 'वर' 'खाली' असे शब्द आलेले आहेत.)

तिची सर्व हकीकत ऐकून गुंडू नरसिंहा व कुमारस्वामीने सांगितले, ''स्वामींजींच्या रूपात तुला ईश्वराने दर्शन दिले आहे. त्या ईश्वराचे तू आभार मान !''

सुमारे एक वर्षानंतर मी जेव्हा हिल कॉलनी येथे आलो, तेव्हा मला ही हकीकत समजली. तेव्हा माझे रूप घेऊन दर्शन देण्याचा पराक्रम कोणी केला याचा शोध मी ध्यानाद्वारे घेतला. तेव्हा मला असे कळून आले की...

''खाली दरीमध्ये एक आत्मा रहात असून, त्या आत्म्याने माझे रूप घेऊन त्या आदिवासी स्त्रीला मदत केली.''

अदृश्य सृष्टीमधील अनेक आत्मे वातावरणात फिरत असतात व अडलेल्या लोकांना मदत करत असतात. यांना अदृश्य मदतनीस किंवा Invisible Helpers असे म्हणतात.

जे लोक मनाने स्वच्छ असतात, सरळ असतात किंवा ईश्वरभक्ती करणारे असतात अशा लोकांना अदृश्य सृष्टीतून

सर्व प्रकारची मदत केली जाते. वातावरणामध्ये असंख्य आत्मे फिरत असतात व सज्जन व्यक्तींना मदत करण्याचे कार्य करत असतात. जंगलामध्ये वाट चुकलेल्या एखाद्या वाटसरूला वाट दाखविण्याचे कार्यही असे आत्मे करत असतात.

### सुनीताचा अनुभव

सुनीता नावाची मुंबईची एक मुलगी एकदा माझ्याकडे आली व मला म्हणाले, ''आध्यात्मात प्रगती व्हावी म्हणून मी काय करावे ?''

मी तिला म्हटले...

''वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये बसत जा. पुढचे काय ते देव बघेल !''

मी सांगितल्याप्रमाणे ती दररोज वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये जाऊन बसू लागली. काही दिवस वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये बसल्यानंतर तिला पुढीलप्रमाणे अनुभव आला.

वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये ती बसली होती, एवढ्यात तिच्या घरून तिला फोन आला व पुढीलप्रमाणे हकीकत समजली.

तिचा मावस भाऊ प्रतीक हा अंगणात खेळत होता. त्याने पाहिले की, सुनीता फियाट गाडी चालवत त्याच्या जवळ आली व त्याला म्हणाली...

''चल प्रतीक आपण फिरायला जाऊ !''

प्रतीक गाडीत बसला. त्याला आपल्या ताईकडे बघून खूपखूप आनंद होत होता. ताईने छानपैकी पंजाबी ड्रेस घातलेला होता.

सुमारे अर्धा तास प्रतीकला त्याच्या सुनीतातार्इने आपल्या फियाट गाडीने फिरविले, खाऊ-पिऊ घातले, घराजवळ आणून सोडले व मी लायब्ररीत जाते सांगून ती गाडीत बसून निघून गेली. प्रतीकने घरात प्रवेश केला व तो आपल्या मावशीला म्हणजे सुनीताच्या आईला सांगू लागला...

''मावशी ! मावशी ! आज ताईने मला खूपखूप फिरविले, भरपूर खायला दिले, ताईने छानपैकी पंजाबी ड्रेस घातला होता. मला खूपच आनंद झाला.''

प्रतीकचे हे उद्‌गार ऐकून त्याची मावशी विस्मित झाली, तिने त्याचा हात धरून त्याला स्वत:च्या जवळ बसविले व विचारले...

''तू कोणाबरोबर कोठे गेला होतास ?''

प्रतीक म्हणाला...

''मी सुनीताताई बरोबर फियाट गाडीतून फिरायला गेलो होतो. तिने छानपैकी पंजाबी ड्रेस घातला होता, मला खूप खायला दिले व खूपखूप फिरविले !''

सुनीताच्या आईने विचारल्यावरून प्रतीकने गाडीचा रंग, सीट कव्हरचा रंग, गाडीचा नंबर, सुनीताने घातलेल्या पंजाबी ड्रेसचा रंग इत्यादी सर्व गोष्टी व्यवस्थित सांगितल्या.

सुनीताच्या आईला आता आश्चर्याबरोबरच भीतीही वाटू लागली; कारण प्रतीक जे काही सांगत होता ते सर्व अचूक होते. गाडीचा रंग, सीटकव्हरचा रंग, गाडीचा नंबर सर्व बरोबर होते, फक्त सुनीताने पंजाबी ड्रेस घातलेला नव्हता. सकाळी बाहेर पडताना ती साडी नेसून बाहेर पडली होती. त्यामुळे नेमका प्रकार काय घडला आहे हे समजायला मार्ग नव्हता, म्हणून तिने वनिता बुक्सच्या ऑफिसला फोन केला व सुनीताला ही सर्व हकीकत सांगितली. सर्व हकीकत ऐकून सुनीता म्हणाली...

''मी सकाळी घरातून बाहेर पडले ती सरळ वनिता बुक्सच्या ऑफिसमध्ये आले व अजूनही मी येथेच आहे व माझी फियाट गाडी पण येथेच आहे !''

सुनीताने घरी आल्यानंतर प्रतीकला सर्व गोष्टी परत विचारल्या, तेव्हा पुन्हा-पुन्हा तो तेच सांगत होता. ताई तू मला फिरविलेस.

काही दिवसांनंतर ही हकीकत मला कळली.

''वातावरणातील देवदेवतांनी हा चमत्कार घडविला होता. एखाद्या सत्पुरुषाच्या आज्ञेचे पालन श्रद्धेने केल्यानंतर कसे दिव्य अनुभव येतात त्याचे हे जिवंत उदाहरण आहे !''

## एका मोलकरणीचा अनुभव

घाटकोपर येथील वनिता दीक्षित यांच्या घरी जोत्स्ना नावाची एक मुलगी घरकाम करण्यासाठी दररोज येत असे. भांडी घासणे, कपडे धुणे, लादी पुसणे इत्यादी कामे करून ती आपल्या घरी परत जात असे. सुमारे सोळा-सतरा वर्षे ती त्यांच्याकडे काम करत होती. ध्यानमार्गामध्ये सौ. वनिता दीक्षित यांनी खूपच प्रगती केली होती. अशा ध्यानमार्गी व्यक्तीच्या सहवासात राहिल्याकारणाने ज्योत्स्नाचीही आपोआप आध्यात्मात प्रगती झाली.

तिलाही दिव्य अनुभव येऊ लागले. पुष्कळवेळा तिला देवीचा आवाज ऐकू येई. तिला देवीकडून मार्गदर्शन मिळत असे. इतकेच नव्हे तर पुष्कळवेळा ती काम करीत असताना एक दिव्य स्त्री प्रगट होत असे व तिच्या कामात तिला मदत करीत असे.

सर्व काम आटोपल्यानंतर ती दिव्य स्त्री तिला कुंकू लावीत असे व ज्योत्स्नाही तिला कुंकू लावीत असे.

## संगीताचा अनुभव

संगीता नावाच्या एका स्त्रीला सौ. वनिता दीक्षित यांनी देवीसूक्त दररोज पाच वेळा वाचायला सांगितले.

स्वामी दत्तावधूत विरचित श्री दुर्गासप्तशती या ग्रंथाच्या

पाचव्या अध्यायात हे देवीसूक्त आहे. देवीसूक्ताचे हजार पाठ पूर्ण झाल्यानंतर संगीताला स्वप्नामध्ये देवीने दर्शन देऊन कुंकू लावले.

### स्मिताचा अनुभव

अगदी लहानपणापासूनच स्मिताला सौ. वनिता दीक्षित यांचा सहवास मिळाला. त्यांच्या सहवासाने तिला ध्यान लागू लागले. त्यांनी सांगितलेल्या उपासना तिने श्रद्धेने केल्या. देवीसूक्ताचे पाच हजार पाठ, गणपती स्तोत्राचे एकवीस हजार पाठ, याशिवाय ज्योति त्राटक साधना, फोटो त्राटक साधना अशा साधनाही तिने केल्या. या साधनांमुळे तिला अनेक दिव्यशक्ती प्राप्त झाल्या. ध्यानामध्ये तिला देव-देवतांची दर्शने होऊ लागली. सिद्धपुरुषांची दर्शने होऊ लागली. त्यांच्याकडून मार्गदर्शन होऊ लागले. ती सर्व बाजूने सुखी व संपन्न झाली.

वातावरणात फिरणाऱ्या देवदेवता व अदृश्य आत्मे कशा प्रकारे मदत करीत असतात याची अनेक उदाहरणे वर दिली आहेत. आणखी काही अनुभव देऊन हा अध्याय संपवितो.

### माझे बालपणातील अनुभव

### मी जिवंत झालो

सप्टेंबर १९५३ मधील माझा जन्म. नंतर दोन महिन्यांनी दिवाळीच्या सुमारास मी आजारी पडलो व **मृत** झालो. डॉक्टरांनी

मला मृत घोषित केले. घरात सर्वत्र रडारड सुरू झाली. वडिलांच्या मांडीवर माझे प्रेत होते, अनेक लोक गोळा झाले होते, अंत्यविधीची तयारी सुरू झाली होती. इतक्यात...

सहा फूट उंचीचे एक साधू अंगणामध्ये अचानक प्रगट झाले व ''छोकरा किधर है ! छोकरा किधर है !'' असे म्हणत घरात शिरले. वडिलांच्या मांडीवर निष्प्राण अवस्थेत माझा देह पडलेला होता. त्यांनी त्या मृत शरीराला उचलले व ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी जोराने मारले. मी जिवंत झालो.

आपल्या झोळीतून त्यांनी भस्म काढून ते माझ्या कपाळाला लावले. मला वडिलांच्या हातात दिले व अदृश्य झाले. ते कोठून आले, कोठे गेले कोणालाच कळले नाही.

**'ते साक्षात् भगवान् दत्तात्रेय होते !'**

## तू माझा सांगाती

ही घटना १९५८ मधील आहे. त्यावेळी माझे वय सुमारे पाच वर्षांचे होते. घरातून पळून जाणे हे नित्याचेच झाले होते. मी नेहमी घरातून पळून जात असे. ओळखीचे लोक पकडून आणत, वडिलांच्या हातात सोपवीत व नंतर वडिलांच्या हातचा भरपूर प्रसाद खावा लागत असे, परंतु त्या दिवशीचा प्रसंग वेगळा होता. माझ्या मोठ्या बहिणीच्या पोटात दुखत होते व ती जोरजोराने रडत होती.

आम्ही शीळ गावात रहात होतो. चारही बाजूने डोंगर असलेल्या त्या गावात एकविसाव्या शतकातही पायवाटेशिवाय जाण्याचे साधन नाही. सायकलही जाऊ शकत नाही, अशी परिस्थिती होती.

वडील राजापूरला गेले होते. आमच्या घरापासून राजापूर सुमारे साडेचार-पाच मैल दूर होते. वडिलांबरोबर अनेकवेळा राजापूरला गेलेलो असल्याने मला राजापूरची चांगली माहिती होती. आईने मला राजापूरला जाऊन वडिलांना भेटून डॉक्टरला घेऊन येण्यास सांगितले. मी पळतच निघालो.

वाटेमध्ये नदी लागली. थोड्याच वेळापूर्वी खूप पाऊस पडला होता. त्यामुळे नदीला खूप पाणी होते, परंतु माझ्या मनात नदीच्या पाण्याचा विचारही आला नाही. कसलाही विचार न करता मी पाण्यातून चालायला सुरुवात केली.

इतक्यात ''अरे मुला थांब !'' अशी हाक पाठीमागून ऐकू आली. मी पाठीमागे वळून बघितले.

एक उंच मनुष्य येत होता. माझ्या जवळ येऊन, त्याने माझा हात पकडला व मला म्हणाला...

''कुठे राजापूरला जात आहेस काय?''

मी म्हणालो,''होय !'' त्याला सर्व हकीकत सांगितली.

त्याने माझा हात पकडला व आम्ही दोघांनी नदी

ओलांडण्यास सुरुवात केली. नदीचे पाणी जेमतेम माझ्या मांड्यांपर्यंत पोहोचले. परंतु त्याच वेळी त्या धिप्पाड माणसाच्या छातीपर्यंत पोहोचले होते. बालवयामुळे हा फरक माझ्या लक्षात आला नाही.

नदी ओलांडल्यानंतर तो मनुष्य कोठे गेला कळले नाही.

पळत-पळत मी जाऊ लागलो. सुमारे दोन-अडीच मैल पळत गेल्यानंतर एक वडाचे झाड होते. या वडाच्या झाडाखाली एक लंगोटी लावलेला म्हातारा बसलेला असायचा. आमचे वडील त्या म्हाताऱ्याची सेवा करायचे. वडील त्या म्हाताऱ्याजवळ बसलेले होते. मी तेथे जाऊन पोहोचलो. वडिलांना सर्व हकीकत सांगितली.

यावर तो म्हातारा साधू म्हणाला, ''तू घरी जा ! डॉक्टरांची काही गरज नाही. तू घरी जाईपर्यंत तुझी बहीण बरी झालेली असेल!'' वडिलांना त्याने राजापूरला जाण्यास सांगितले.

वडील राजापूरला निघून गेले व मी पुन्हा पळत-पळत घरी यायला निघालो. नदीचा पूर पूर्णपणे ओसरला होता. मी सहजगत्या नदी पार केली व घरी आलो. बहीण ठणठणीत बरी झालेली होती.

मला नदीच्या पार घेऊन जाणारा तो गृहस्थ कोण होता हे त्यावेळी माझ्या लक्षात आले नाही. पाच-दहा घरांच्या त्या

छोट्याशा गावातील प्रत्येकाला मी ओळखत होतो व प्रत्येक जण मला चांगले ओळखत होते. हा अनोळखी गृहस्थ आला कोठून व गेला कोठे काहीच समजले नाही. ध्यानमार्गात प्रगती झाल्यानंतर लक्षात आले की

**'ते भगवान् दत्तात्रेय होते !'**

**श्रीगुरुचरित्र**

ही घटना माझ्या बालपणाची आहे. श्रीगुरुचरित्र प्रसिद्ध झाले होते. रत्नागिरीतील एका ब्राह्मणाकडे श्रीगुरुचरित्राची एक प्रत होती. या ब्राह्मणाची व आमच्या वडिलांची चांगली मैत्री होती. वडिलांना श्रीगुरुचरित्र वाचण्याची खूप इच्छा होती. त्यांनी या ब्राह्मणाकडे श्रीगुरुचरित्र अनेक वेळा मागितले, परंतु त्याने देण्यास नकार दिला व शेवटी एक दिवस तो म्हणाला...

''ब्राह्मणांशिवाय इतर जातीतील लोकांना श्रीगुरुचरित्र वाचण्याचा अधिकार नाही.'' हे ऐकून वडिलांना राग आला व वडील म्हणाले, ''आजपर्यंत मी श्रीगुरुचरित्राच्या मागे लागलो. आता श्रीगुरुचरित्र माझ्या मागे येईल !''

वडील असे म्हणाले व विसरूनही गेले, त्यानंतर...

गुरुवारचा दिवस होता. दुपारची वेळ होती. आमच्या आईने वडिलांसाठी जेवणाचे ताट वाढले होते. इतक्यात...

'**गुरुदेव दत्त**' असा ध्वनि ऐकू आला. वडील उठले.

त्यांनी दरवाजा उघडला. बाहेर एक साधू उभा होता. त्या साधूच्या अंगावर रेशमी वस्त्रे होती. ते सडपातळ व उंच होते.

वडिलांनी त्यांना नमस्कार केला व म्हणाले...

''आत या ! जेवण तयार आहे !''

वडिलांनी त्यांना हात, पाय, तोंड वगैरे धुण्यासाठी पाणी दिले व त्यांची थोडीफार चौकशी केली.

साधू म्हणाले, ''मी गाणगापूरहून आलो व नेहमी गाणगापूरलाच असतो.''

गाणगापूरसारख्या दत्त क्षेत्रांत राहणारे महात्मा आपल्या घरी आले म्हणून वडिलांना अतिशय आनंद झाला. दोघांचे जेवण झाल्यानंतर दोघे गप्पा मारीत बसले. साधू म्हणाले...

''गाणगापूरच्या दत्तात्रेयांची तुमच्यावर खूपच कृपा आहे. त्यांच्या इच्छेप्रमाणे मी तुम्हाला एक भेट देत आहे. ही भेट गाणगापूरच्या दत्तमहाराजांनी दिली असे समजून ठेवून घ्या !'' असे म्हणून त्यांनी आपल्या झोळीतून रेशमी वस्त्रात गुंडाळलेला एक ग्रंथ बाहेर काढला व वडिलांच्या हातात दिला !

वडिलांनी तो रेशमी कापडात गुंडाळलेला ग्रंथ हातात घेतला. भाळी लावला व जवळच असणाऱ्या टेबलावर ठेवून दिला.

''मी निघतो !'' ते साधू म्हणाले.

ते दरवाजा उघडून जेमतेम बाहेर पडले असतील इतक्यात...

माझा मोठा भाऊ बाळ याने तो ग्रंथ उघडला व वडिलांना म्हणाला..

''आबा ! **श्रीगुरुचरित्र** ग्रंथ आहे ! ''

श्रीगुरुचरित्र असे शब्द ऐकताच वडिलांना सुमारे चार-पाच दिवसांपूर्वी घडलेला प्रसंग आठवला. त्यांनी ताबडतोब भावाला त्या साधूंना शोधून आणण्यास सांगितले.

त्या साधूंना घराबाहेर पडून अर्धे मिनिटही झाले नव्हते. त्यांना शोधून भाऊ हात हलवत परत आला. ते कोठेच सापडले नाहीत. सापडणार तरी कसे ?

**''ते भगवान् दत्तात्रेय होते !''**

## गणपतीचा संदेश

ही गोष्ट सुमारे बत्तीस वर्षांपूर्वीची आहे. माझ्यावर पुत्रवत प्रेम करणारे श्री. रामचंद्र नारायण टकले ऊर्फ भाऊ टकले यांच्याबरोबर मी गणपतीपुळ्याला गेलो होतो. हाफ पॅन्ट व शर्ट असा माझा वेश होता. त्यावेळी माझे वय सोळा-सतरा होते.

समुद्रात आंघोळ करून आम्ही गणपतीचे दर्शन घेतले. पूजा, अभिषेक केला व नंतर तेथून निघालो. भाऊ टकलेंच्या ओळखीचे कोणीतरी एक ब्राह्मण पुजारी होते. त्यांच्या घरी

आम्ही गेलो. आम्हाला पाहिल्यावर ते म्हणाले...

''तुम्ही येण्यापूर्वी मी झोपलो होतो. स्वप्नामध्ये मला गणपतीने सांगितले. थोड्या वेळाने तुझ्या घरी टकले येतील. त्यांच्याबरोबर एक मुलगा आहे. हा मुलगा दत्तात्रेयाचा अंश आहे. तू त्या मुलाचा चांगला आदरसत्कार कर !''

पुजाऱ्याचे हे उद्‌गार ऐकून काय बोलावे हे मला काहीच सुचेना; परंतु ती बाजू भाऊ टकले यांनी सांभाळली व माझ्याविषयी बरीच माहिती त्यांना दिली. नंतर आम्ही दोघे तेथे जेवलो. त्या पुजाऱ्याने आमच्यासाठी गणपतीचा प्रसाद म्हणून खास मोदक बनविले होते व दत्ताला आवडणारी पुरणपोळीही बनविली होती. जेवण झाल्यानंतर त्याने विडा, दक्षिणा व वस्त्र मला दिले व पुन्हा येण्याचे निमंत्रण दिले.

मान खाली घालून निमूटपणे मी सर्व गोष्टींचा स्वीकार करत होतो; परंतु मला गुदमरल्यासारखे होत होते व केव्हा एकदा तेथून बाहेर पडतो असे झाले होते. शेवटी भाऊ व मी त्यांच्या घरातून बाहेर पडलो व मी सुटकेचा निःश्वास टाकला.

सध्याच्या या कलियुगामध्येसुद्धा ग्रामदेवता, वातावरणातील आत्मे समाजामध्ये श्रद्धेची जोपासना व्हावी म्हणून सतत प्रयत्न करीत असतात. त्यांचे हे प्रयत्न कसे असतात याची थोडीशी झलक या प्रकरणामध्ये दाखवून दिली आहे. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, श्रद्धा वाढविणे,

चुकीच्या प्रथांचे निर्मूलन करणे, अंधश्रद्धेचे निर्मूलन करणे, लोकांना सरळ मार्ग दाखविणे या सर्व गोष्टी ईश्वराची सेवा आहे.

पिशाच्च योनीतील अनेक आत्मे पृथ्वीतलावर जन्म मिळावा म्हणून वातावरणामध्ये भटकत असतात, यातना व दुःख भोगत असतात. शेवटी ईश्वर त्यांच्यावर कृपा करतो व परोपकार करण्याची संधी त्यांना उपलब्ध करून देतो. असे आत्मे ईश्वराची सेवा म्हणून पृथ्वीतलावरील लोकांच्या मनातील श्रद्धा जोपासण्याचे कार्य करतात.

# ५. चार अवस्था

## जागृती

**'पुनरपि जननम् पुनरपि मरणम्'** जन्म-मरणाच्या चक्रामध्ये आत्मा लाखो-करोडो वर्षे फिरत असतो. विविध योनींमधून फिरत असतो. आहार, निद्रा, भय आणि मैथुन या चार गोष्टींमध्ये त्याचे मन सदैव अडकलेले असते. त्याला जेव्हा मनुष्य जन्म मिळतो, तेव्हा या चार गोष्टीं व्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींची भर पडते. त्याचा व्याप अतिशय वाढतो. मरेपर्यंत त्याला क्षणाचीही उसंत मिळत नाही.

जन्माला आल्याबरोबर त्याच्यावर धर्म व जात यांचे लेबल चिकटते. विविध प्रकारच्या आजारपणांना तोंड देत तो थोडा मोठा होतो. तोच त्याच्या पाठीमागे शाळा व शिकवण्या लागतात. विविध प्रकारचे खेळ खेळण्यात त्याचा वेळ जाऊ लागतो. आणखी थोडे मोठे झाल्यावर अभ्यासाबरोबरच खेळ व मनोरंजन यात त्याचा दिवस व्यतीत होऊ लागतो.

आता तो चोवीस-पंचवीस वर्षाचा युवक झालेला असतो. शिक्षण पूर्ण झालेले असते. खेळ, मनोरंजन, नोकरी किंवा धंदा यात त्याचा दिवस व्यतीत होत असतो. अधून-मधून

देवाला नमस्कार करणे, एखाद्या मंदिरात जाणे, एखादे स्तोत्र वाचणे हेही चालू असते. याच वयात त्याचे लग्न होते. संसारी जबाबदाऱ्या वाढतात. मुले होतात. मुलांचे संगोपन करणे, त्यांना मोठे करणे, शिकविणे या सर्व जबाबदाऱ्या वाढत जातात. खर्च वाढत असतो. त्यामुळे नोकरी, धंदा, उद्योगात कष्टही वाढत जातात. हळूहळू शरीर थकू लागते व एक दिवस मृत्यू येतो. अशा प्रकारे जन्म मरणाच्या चक्रात आत्मा पुन्हा अडकतो.

वरील वर्णन हे एका सुखी व अतिशय सज्जन आत्म्याचे आहे. ईर्षा, द्वेष, मत्सर, कपट, कारस्थान, राजकारण करणाऱ्या लोकांचा; तसेच दुष्ट-दुर्जनांचा येथे विचारही केलेला नाही. असा हा सज्जन आत्मा पुन्हा-पुन्हा जन्माला येतो व पुन्हा-पुन्हा मरतो. तो अतिशय सज्जन असल्याने त्याला मनुष्य जन्म मिळत राहतो. जन्मोजन्मी केलेली ईश्वरभक्ती, दान, परोपकार यांची पुण्याई हळूहळू वाढत असते. अशा अनेक जन्मांनंतर परमेश्वराच्या कृपेने हा आत्मा **जागृत** होतो. त्याला जागृती ही अवस्था प्राप्त होते.

जागृती ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर तो विचार करू लागतो. माझा हात, माझे पाय, माझे डोळे, माझे पोट, पण **मी कोण ?**

मनोरंजन करण्यासाठी मी सिनेमा नाटक पाहतो; पण मन म्हणजे काय ?

मनामध्ये जेव्हा अशा प्रकारचे प्रश्न उठू लागतात व जेव्हा

सतावू लागतात; तेव्हा आत्म्याला जागृती ही अवस्था प्राप्त होते. ही अवस्था प्राप्त होण्यास अनेक जन्मांची पुण्याई व ईश्वरीकृपा फळाला आलेली असते. ईश्वरी कृपेने जागृत झालेला हा आत्मा मी कोण आहे याचा शोध घेण्यास सुरुवात करतो.

अखंड नामस्मरण करू लागतो. एकाच आसनावर बसून जप करू लागतो. त्याचे नामस्मरण व जप सात्त्विक देवतांचे असतात. सात्त्विक देवतांच्या स्तोत्रांचे लाखो पाठ करून तो देवतांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतो. एकाच आसनावर बसून श्वासावर लक्ष ठेवून तो ध्यान करू लागतो. बरीच वर्षे अशा प्रकारे साधना केल्यानंतर; त्याला **स्वप्न** ही अवस्था प्राप्त होते.

**स्वप्न**

मनुष्य जेव्हा ध्यानमार्गात प्रगती करतो तेव्हा त्याला स्वप्न ही अवस्था प्राप्त होते. त्याला ध्यानामध्ये विविध प्रकारची दृश्ये दिसू लागतात. विविध प्रकारच्या देव-देवतांची, ऋषि-मुनींची दर्शने त्याला ध्यानामध्ये होतात. रात्री अथवा दुपारी निद्रावस्थेमध्येही त्याला देवदेवतांची दर्शने होतात.

स्वर्गलोकातील दृश्येही पाहायला मिळतात. स्वर्गलोकाहूनही उच्चतम अशा लोकांचे दर्शन त्याला होते. दिव्य आत्मे ध्यानामध्ये किंवा निद्रा अवस्थेमध्ये त्याला फिरायला घेऊन जातात व विविध लोकांमध्ये फिरवितात. या

अवस्थेला **स्वप्न** असे म्हणतात. स्वप्नावस्थेमध्ये बरीच वर्षे साधना केल्यानंतर साधकाला **सुषुप्ती** ही अवस्था प्राप्त होते.

### सुषुप्ती

सुषुप्ती या शब्दाचा अर्थ गाढ झोप असा आहे; पण ध्यानामध्ये स्थळ काळाचा विसर पडू लागला की, सुषुप्ती अवस्था प्राप्त झाली असे समजावे. ध्यानामध्ये दिसणारी दृश्ये बंद होतात व साधकाला देहाचा विसर पडू लागतो. प्राणाचा प्रवाह सुषुम्ना नाडीतून होऊ लागतो. ध्यानदृश्ये दिसणे बंद होऊन प्रगाढ ध्यान लागू लागते. ध्यानामध्ये किती काळ गेला हे समजेनासे होते. या अवस्थेला **सुषुप्ती** अवस्था असे म्हणतात.

सुषुप्ती अवस्थेमध्ये ध्यान करणाऱ्या साधकाला प्रचंड उत्साह प्राप्त होत असतो व हळूहळू साधक **तुर्या** अवस्थेमध्ये प्रवेश करतो. बरीच वर्षे सुषुप्ती अवस्थेमध्ये साधना केल्यानंतरच तुर्या अवस्था प्राप्त होते.

### तुर्या

तुर्या अवस्थेमध्ये साधक सिद्धावस्थेच्या जवळपास पोहोचलेला असतो. विविध प्रकारचे ज्ञान त्याला आपोआप होत असते. ज्ञानासाठी त्याला ग्रंथांकडे, पुस्तकांकडे पाहावे लागत नाही. जीवनातील रहस्यांचे ज्ञान त्याला आपोआप होते. विविध प्रकारच्या स्थळांचे, ग्रहगतीचे, वनस्पतींचे ज्ञान, अशा प्रकारे सर्व प्रकारचे ज्ञान त्याला आपोआप होते. येथे

साधक सर्वज्ञ होतो. सिद्ध-साधक अशी अवस्था त्याला प्राप्त होते. प्रत्येक गोष्टींचे सत्यज्ञान त्याला होते. अदृश्य सृष्टीतील विविध शक्तींशी त्याचा परिचय होतो. मानवी जीवनातील गूढ रहस्ये त्याला कळू लागतात. अदृश्य सृष्टीतील अनंत प्रकारच्या शक्ती मानवी जीवनावर कसे नियंत्रण ठेवीत असतात, याचे ज्ञान त्याला होते. तो खऱ्या अर्थाने सर्वज्ञ होतो.

### उन्मनी

जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या या चारही अवस्थांमध्ये साधकाचे मन अस्तित्वात असते. नंतर त्याच्या मनाचे अस्तित्व नष्ट होते. मन उन्मन होते व परम आत्म्याशी तादात्म्य पावते. साधक सिद्ध होतो, परमहंस होतो, जीवनमुक्त होतो. जीवनमुक्त अवस्थेत वावरणारे महात्मे परमज्ञानी असतात, परंतु बाह्यात्कारी ते वेड्यासारखे वागतात. अशा उन्मनी अवस्थेत राहणाऱ्या महापुरुषांना देव मानले जाते.

### सहजावस्था

काही सिद्धपुरुष उन्मनी अवस्था पचवून अत्यंत उच्च कोटीच्या सहजावस्थेत राहतात व सामान्यातिसामान्य माणसासारखे ते वागतात; परंतु आतून साक्षात् ईश्वर असतात.

❋ ❋ ❋

# ६. आत्मसाक्षात्कार

आत्मसाक्षात्कार म्हणजे आपण आपणाला जाणणे, स्वतःच्या स्वरूपाची ओळख करून घेणे. ही साधना पुढीलप्रमाणे केली जाते.

एकांतात सहजासन घालून बसावे. डोळे मिटून भ्रूमध्यस्थानी लक्ष केंद्रित करावे व आपल्या चालणाऱ्या श्वासोच्छ्वासाकडे निरखून पाहावे. मनात एकही विचार येऊ देऊ नये. अशी ही साधना आहे.

ही साधना प्रथमदर्शनी जरी सोपी वाटत असली, तरीही तितकी सोपी नाही; कारण मनात एकही विचार येऊ न देणे हे अतिशय कठीण काम आहे. यासाठी अनेक वर्षे ही साधना करावी लागते.

अपात्र, अयोग्य, ज्याची पूर्वकर्मे दूषित आहेत, अशा एखाद्या व्यक्तीने पुस्तकात वाचून किंवा कोणाच्यातरी

सांगण्याने ही साधना केल्यास वातावरणातील दुष्ट शक्तींशी त्याचा संपर्क होऊन, पिशाच्च आत्मे शरीरात घुसण्याची दाट शक्यता असते. असे होऊ नये म्हणून ही साधना सुरू करण्यापूर्वी एखाद्या सात्त्विक देवतेच्या स्तोत्राचे सव्वा लाख पाठ करणे अतिशय आवश्यक असते म्हणजे ती देवता साधकाचे संरक्षण करते.

या साधनेला सो ऽ हम् ध्यान, सो ऽ हम् साधना किंवा ॐकार साधना, असेही म्हणतात. असे म्हणतात की, जन्मोजन्मींच्या पापराशी पुण्यमार्गाने जळून भस्म झाल्याखेरीज या साधनेत प्रगती होत नाही. जबरदस्तीने साधना करू लागल्यास मनाला दिग्भ्रमित करणारी काही दृश्ये दिसू लागतात.

वातावरणातील आत्मे कानात बोलू लागतात. पुष्कळ वेळा असे आत्मे साधकाच्या अंगातही शिरतात. हे आत्मे निरनिराळ्या सिद्धपुरुषांची नावे सांगतात किंवा देवदेवतांची नावे सांगतात. मी दत्त बोलत आहे, मी देवी बोलत आहे, मी गोरखनाथ बोलत आहे! असे काहीही हे आत्मे सांगतात व साधक आपल्याशी देवदेवता बोलतात या भ्रमात वाहत जातो व आत्मसाक्षात्कारापासून वंचित होतो. अदृश्य सृष्टीतील आत्मे काही चमत्कारही घडवितात. त्यामुळे साधक स्वत:ला महान समजू लागतो व आत्मसाक्षात्कारापासून वंचित होतो. अशी अनेक प्रकारची विघ्ने या मार्गात येत राहतात.

ही सर्व विघ्ने अदृश्य सृष्टीतून येत असल्याकारणाने, साधकाला सावध होण्यास संधी मिळत नाही व साधनेत फसगत होण्याची दाट शक्यता असते. याशिवाय माझ्याशी शिव बोलतात, दत्त बोलतात असा अहंकारही साधकाला होतो; परंतु प्रत्यक्षामध्ये या साधकाशी पिशाच्चे बोलत असतात.

ज्याने खूप परोपकार केला आहे, दान केले आहे, ईश्वरभक्ती केलेली आहे, एखाद्या स्तोत्राचे लाखो पाठ केलेले आहेत, अशा साधकाची या साधनेमध्ये प्रगती होते.

या साधनेमध्ये जसजशी प्रगती होत जाते, तसतसे दिव्य अनुभव येऊ लागतात. सूक्ष्मशरीर स्फटिकाप्रमाणे स्वच्छ व शुद्ध होते. अपवित्र वस्तूचा, व्यक्तीचा स्पर्श सहन होईनासा होतो. मनातील इच्छा पूर्ण होऊ लागतात. स्वप्नामध्ये किंवा ध्यानामध्ये देवदेवतांची दर्शने होतात, **कूटस्थ** स्थानी ज्योतिचे दर्शन होते. ध्यानामध्ये विविध प्रकारची आनंददायक दृश्ये दिसतात. चिदाकाशाचे दर्शन होते. नीलबिंदू दिसतो व कधी कधी स्वत:चेच रूप स्वत:ला दिसून येते. हळूहळू आत्मा परमात्म्यात विलीन होऊन जातो. प्राचीनकालीन ऋषि-मुनींची,सिद्ध महात्म्यांची दर्शने होतात व परमहंस अवस्था प्राप्त होते.

## ७. यज्ञ

आपल्या घरातील वातावरण शुद्ध राहावे, घरात देवदेवतांचा वास व्हावा म्हणून घरात अधून-मधून हवन करीत राहावे.

आजकाल हवनाचे भांडे बाजारात मिळते. त्याला यज्ञपात्र असे म्हणतात. बाजारातून एखादे यज्ञपात्र विकत आणावे. गाईच्या शेणी, औदुंबर, वड, पिंपळ यांची लाकडे घरी आणून ठेवावीत. बाजारातून थोडे चंदनाचे लाकूड किंवा चंदनाचा भुसा घरी आणून ठेवावा; तसेच थोडा धूपही आणून ठेवावा.

औदुंबर, वड, पिंपळ, चंदन या लाकडांचे लहान-लहान तुकडे करावेत. तांब्याच्या यज्ञपात्रामध्ये गाईच्या शेणीचा तुकडा, धूप, लाकडाचे तुकडे, कापूर हे ठेवून कापूर पेटवावा व मंत्र म्हणून गाईच्या तुपाने आहुत्या द्याव्यात.

आपल्याला आवडेल तो मंत्र म्हणून पळीने तुपाच्या आहुत्या द्याव्यात. अशा प्रकारे एकवीस, चौपन्न, एकशेआठ,

एक हजार आठ अशा कितीही आहुत्या द्याव्यात.

अशा प्रकारे घरामध्ये हवन केल्याने देवदेवतांचा वास होतो. घरातील वाईट शक्ती निघून जातात. घरात सुखसमृद्धी येते. या साधनेबरोबर घरामध्ये तुपाचा दिवा देवासमोर अवश्य लावावा.

या साधनेने घरातील दारिद्र्य व मूढता नष्ट होते. शरीर शुद्ध होते. चांगली स्वप्ने पडू लागतात. वाईट स्वप्ने पडणे बंद होतात. घराला बरकत येते. पैसे शिल्लक राहू लागतात. घरात भूत पिशाच्च रहात नाही. साडेसाती ग्रहपीडा दूर होतात.

दररोज एक तास याप्रमाणे सुमारे तीन वर्षे ही यज्ञ साधना केली असता खूप दिव्य अनुभव येतात.

❁❁❁

# ८. तांत्रिकांच्या कथा

**खरे सत्पुरुष** लोकांचा उद्धार करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म घेतात. त्यांच्या हातून अनेक चमत्कार घडतात, परंतु चमत्कार करावा अशी त्यांना मुळीच इच्छा नसते. ईश्वरी शक्ती त्यांच्यासाठी चमत्कार घडवीत असतात. वातावरणातील देवदेवता सत्पुरुषांचा महिमा वाढवीत असतात. असे सत्पुरुष समाजामध्ये ईश्वरभक्ती, ज्ञान, योग यांचा प्रसार करतात व हजारो लोकांना ईश्वराच्या दिशेने पुढे नेतात.

काही साधू असे असतात की, समाजाला भुलविण्यासाठी ते नजरबंदी, चमत्कार करणाऱ्या पिशाच्चशक्ती वश करून घेतात व त्याद्वारा आयुष्यभर समाजावर हुकमत गाजवीत राहतात. पिशाच्चशक्तीच्या बळावर संपूर्ण समाजाला ते आपल्या मुठीत ठेवू शकतात. त्यांचे कोणीच काही वाकडे करू शकत नाही. इतकेच नव्हे, तर त्यांच्यावर कोणी टीकाही

करू शकत नाहीत. त्यांच्यावर टीका केल्यास पिशाच्चशक्तीद्वारा ते टीका करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा करतात, असा त्यांचा प्रभाव असतो. लोकांचे कल्याण करणे त्यांना जमत नाही. लोकांना सन्मार्गाला लावणे त्यांना शक्य होत नाही. त्यांचे चमत्कार बघून लोक त्यांच्याभोवती गोळा होत असतात व त्यांच्याजवळ गेलेल्या प्रत्येकाला आपल्या विद्येच्या बळावर ते आपलेसे करून टाकतात.

राजे, महाराजे, श्रीमंत लोक अशा साधूंचे भक्त असतात. खऱ्या सद्‌भक्ताला अशा साधूंच्या जवळ काहीच किंमत नसते व खऱ्या सद्‌भक्तांनी अशा साधूंच्या जवळ जाऊही नये; कारण सद्‌भक्तांची पुण्याई ते खेचून घेतात. समाजातील धूर्त, कपटी व गुंड प्रवृत्तीचे लोक अशा साधूंचे भक्त असतात. असे साधू जेथे राहतात ती सर्व स्थाने पिशाच्चशक्तीने भरलेली असतात. अशा स्थानांमध्ये राहणाऱ्या लोकांना सद्‌बुद्धी होणे अतिशय कठीण असते.

माझ्या प्रवासी जीवनामध्ये अशा काही लोकांच्या गाठीभेटी झाल्या; तसेच तामसी, अघोरी साधना करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या बऱ्याच कथा मला ऐकायला मिळाल्या. त्यातील काही येथे देत आहे.

**एक**

सुमारे चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी डांग अरण्यामध्ये चेटूक विद्या

करणारे अनेक स्त्री-पुरुष रहात असत. डांग भागातील स्त्रिया तर चेटूक विद्येत खूप प्रवीण होत्या. एकदा दोन युवक डांगच्या अरण्यात फिरायला गेले होते. अरण्यात फिरत असताना ते वाट चुकले. संध्याकाळ झाली. अरण्यातून बाहेर पडण्याची वाट त्यांना सापडेना. त्यांना एक झोपडी दिसली. झोपडीच्या बाहेर एक स्त्री काही काम करत होती.

या तरुणांनी त्या स्त्रीला सांगितले, ''आम्ही रस्ता चुकलो आहोत, आम्हाला आजची रात्र येथे राहायला जागा द्या !''

त्या स्त्रीने राहायला परवानगी दिली. झोपडीच्या बाहेर अंगणामध्ये चार म्हशी होत्या. त्या स्त्री व्यतिरिक्त आणखी तेथे कोणीही नव्हते. रात्र झाली, त्या स्त्रीने या दोन्ही मुलांना एक-एक भाकरी खायला दिली. दिवसभर अरण्यात फिरल्याने दोघेही खूप थकले होते. दहाच्या सुमारास दोघांनाही गाढ झोप लागली.

रात्री बाराच्या सुमारास त्या दोन युवकांपैकी एकाला जाग आली. अंथरुणावर पडल्या-पडल्या तो कसलातरी विचार करत होता. इतक्यात त्याला आठवले की, या डांग भागामध्ये चेटूक विद्या करणाऱ्या स्त्रिया आहेत. हा विचार मनात येताच त्याची झोप उडाली.

इतक्यात त्याने पाहिले की...

हातात दिवा घेऊन ती स्त्री झोपडीच्या स्वयंपाकघरातून

बाहेर येत आहे. झोपेचे सोंग करून त्या तरुणाने ती काय करते हे पाहायचे ठरविले.

ती स्त्री त्या दोघांजवळ आली. खाली बसून तिने त्या दोन्ही तरुणांच्या पायाच्या आंगठ्याला एक-एक दोरा बांधला व ती पुन्हा स्वयंपाकघरात निघून गेली.

ही स्त्री चेटूक विद्या करणारी असून, काहीतरी प्रयोग ही आपल्यावर करणार आहे, याची जाणीव झोपेचे सोंग घेणाऱ्या तरुणाला झाली. तो गुपचूप उठला.

प्रथम त्याने आपल्या पायाचा दोरा सोडला व नंतर त्याने मित्राच्या पायाचा दोरा सोडला. हळूच मित्राला उठविले व त्याच्या कानामध्ये सर्व प्रकार सांगितला. ते दोघेही धाडसी होते. त्या स्त्रीने बांधलेले धागे हातात घेऊन दोघेही अलगद पावलाने बाहेर आले.

हातातील दोन्ही धागे त्यांनी दोन म्हशींच्या शिंगांना बांधले व अलगद पावलांनी ते झोपडीच्या मागच्या बाजूला गेले व फटीतून ती स्त्री स्वयंपाकघरात काय करते ते पाहू लागले.

स्वयंपाकघरातून प्रकाश बाहेर येत होता. चूल पेटलेली होती. चुलीवरती एक कढई ठेवलेली होती.

कढईमध्ये तेल होते व हातात झारा घेऊन ती स्त्री तेल ढवळत होती व तोंडाने मंत्र पुटपुटत होती. दोन-चार मिनिटे

असा प्रकार त्यांनी पाहिला. इतक्यात फट् असा आवाज झाला व त्या कढईमध्ये दोन काळीज (हृदय) तरंगू लागली.

हा एकंदर प्रकार व त्याचा अर्थ दोन्ही युवकांच्या लक्षात आला. अलगद पावलाने दोघेही पुन्हा झोपडीच्या समोर आले. चंद्रप्रकाशात त्यांनी पाहिले, दोन म्हशी मरून पडल्या होत्या.

**दोन**

असे म्हणतात की, चेटूक विद्या शिकविणारे लोक डांग भागात खूप होते. डांग अरण्याचा परिसर धुळे व नाशिक यांच्या सीमेवर आहे. या भागातील स्त्रिया पूर्वीच्या काळी चेटूक विद्या शिकत असत. हल्ली हे सर्व प्रकार बंद झाले असून, लोक हळूहळू सुशिक्षित होत आहेत.

चेटूक विद्या शिकणारी स्त्री अनेक प्रकारच्या अति क्षुद्र शक्तींना, तामसी शक्तींना विविध मार्गांनी वश करून घेते. या भयंकर शक्तींना प्रसन्न करण्यासाठी अनेक बळी द्यावे लागतात. पुष्कळ वेळा स्वत:चेच रक्त द्यावे लागते, तर पुष्कळ वेळा स्वत:च्या नवऱ्याचा अथवा मुलाचा बळी द्यावा लागतो. अशी भयंकर कर्मे करून क्षुद्र शक्तींना वश केले जाते. या भयंकर साधना करणारे स्त्री-पुरुष भयंकर अशा पिशाच्च योनीत लाखो वर्षे अडकून पडतात.

एक स्त्री चेटूक विद्या शिकत होती. कालांतराने ती चेटूक विद्येमध्ये पारंगत झाली. तिला एकुलता एक मुलगा होता.

मुलाचे लग्नही झाले होते. चेटूक विद्येच्या महाभयंकर शक्तींनी त्या स्त्रीकडे तिच्या मुलाचा बळी मागितला. त्या स्त्रीने आपल्या मुलाचा बळी देण्याचे ठरविले.

चेटूक विद्या करणारे साधक जेव्हा शक्तीला बळी देतात, तेव्हा ते त्या बळीची मान कापत नाहीत किंवा त्याला मारतही नाहीत. असे म्हणतात की, चेटूक विद्या करणारे लोक हिंस्त्र श्वापदाची रूपे धारण करतात व बळीवर हल्ला चढवतात व स्वत:च त्या बळीला खाऊन टाकतात. यात खरे किती व खोटे किती ते ईश्वराला माहीत; परंतु प्राण्यांचे रूप घेऊन फिरणाऱ्या तांत्रिकांच्या अनेक जागा मी पाहिलेल्या आहेत. सध्या मात्र असे तांत्रिक अस्तित्वात नसावेत, असे वाटते. आपली सासू आपल्या नवऱ्याचा बळी घेणार आहे, हे त्या स्त्रीच्या सुनेच्या लक्षात आले. तिने आपल्या नवऱ्याला, ''तुझी आई चेटूक विद्येमध्ये पारंगत असून, ती तुझा बळी घेणार आहे !'' असे सांगितले. परंतु मुलाचा विश्वास बसला नाही. एक दिवस एका मांजराने त्या मुलावर हल्ला चढविला व त्याला ओरबाडून ठार मारले.

### तीन

आंध्र प्रदेशात एक आदिवासी अनेक चमत्कार करीत असे. तो जंगलात जाई व हाक मारून वाघाला बोलवीत असे व नंतर वाघावर बसून फिरत असे. बैलाच्या गुदद्वारातून आत

जाऊन तोंडाने बाहेर पडत असे.

बोटाने ऑपरेशन करीत असे. कपडा तोंडाने गिळून गुदद्वाराने बाहेर काढत असे.

हे सर्व नजरबंदीचे खेळ तो चेटूक विद्येच्या आधाराने करीत असे. सर्व लोक त्याला भिऊन असत.

एखाद्याला चोपून काढायचे असल्यास तो आपल्याजवळ असणाऱ्या पिशाच्चाला ते काम सांगत असे. मार खाणाऱ्याला भरपूर मार मिळत असे; पण कोण मारत आहे हे कळत नसे.

एकदा त्याच्याच एका मित्राने त्याला सहज म्हटले, ''तू बोटाने लोकांची पोटे फाडतोस व हात फिरवून पुन्हा ती जशी होती तशी करतोस. खरे म्हणजे तू हातात सुरी घेऊन लोकांची पोटे फाडायला पाहिजे, तर लोक तुला खरा डॉक्टर मानतील.''

हा लमाणी जादूगार अशिक्षित होता व त्याला गर्वही खूप झालेला होता. तो म्हणाला, ''त्यात काय मोठेसे, मी सुरीने पोट फाडून पुन्हा जोडून दाखवीन!''

असे म्हणून त्याने एका माणसाचे पोट सुरीने फाडले. या प्रकरणात त्या माणसाचा जीव गेला व या जादूगाराला पोलिसांनी पकडून नेले. नजरबंदीचे हे चमत्कार क्षुद्र विद्येच्या आधाराने करता येतात. अधांतरी राहणे, एका जागी गुप्त होऊन दुसऱ्या जागी प्रगट होणे, वाघावर बसून फिरणे, डोळा काढून हातात घेणे व तो पुन्हा जागेवर बसविणे, पोटातून आतडी बाहेर

काढणे, हवेतून वस्तू काढणे, शरीर कापणे व पुन्हा जोडणे, मान कापून ती खाली पडलेली दाखवून ती पुन्हा जोडणे, बंद खोलीतून बाहेर पडणे, शरीराचे अवयव वेगळे करणे व पुन्हा जोडणे, दोरीचा साप बनविणे, असे कितीतरी चमत्कार तांत्रिक लोक करतात. या सर्व गोष्टी पिशाच्च विद्येने साध्य करता येतात. आध्यात्म, ईश्वरप्राप्ती यांचा या विद्येशी काहीही संबंध येत नाही.

'**चमत्कार तेथे नमस्कार**' या न्यायाने अशा लोकांकडे खूप गर्दी असते; परंतु अशा तांत्रिकांच्या सहवासाने आध्यात्मात प्रगती होत नाही व ईश्वरीकृपाही प्राप्त होत नाही.

सुमारे शंभर वर्षांपूर्वी बनारसमध्ये एक खूप मोठे तांत्रिक होऊन गेले. त्यांनी असंख्य चमत्कार केले.

तेथे त्यांनी एक शक्तिपीठ तयार केले. या शक्तिपीठामध्ये नऊ प्राण्यांची मुंडकी पुरलेली आहेत. लोक तेथे जाऊन दर्शन घेतात. त्यांना काय अनुभव येतात ते ईश्वरालाच माहीत. मला मात्र अतिशय विचित्र व भयानक अनुभव आला. आपल्यातील सर्व शक्ती कोणीतरी खेचून घेत आहे, असे वाटू लागले व एका क्षणामध्ये हातपाय हलविण्याचीसुद्धा ताकद राहिली नाही. कसेतरी बळ एकवटून मी त्या शक्तिपीठातून बाहेर पडलो.

तंत्रविद्या शिकणाऱ्या लोकांची अनेकदा फसगत होते. पुष्कळ वेळा तांत्रिक गुरू शिष्यांचा बळीही देतात. तांत्रिक लोक कसे

फसवितात याची एक ऐकलेली हकीकत सांगतो.

एकदा एका तांत्रिकाने तंत्रसाधना केली. या साधनेमुळे उग्र व भयंकर स्वरूपाचा एक राक्षस त्याच्यासमोर प्रगट झाला व त्याने त्याच्याकडे नरबळी मागितला.

तांत्रिकाचे अनेक भक्त होते. त्यांपैकी एकाला त्याने विचारले, ''तुला ही चमत्कार करणारी विद्या शिकायची आहे काय?''

त्यावर तो भक्त ''हो'' म्हणाला!

अमावास्येच्या रात्री या भक्ताला घेऊन तांत्रिक स्मशानात गेला. या भक्ताच्या पायाच्या अंगठ्याला एक दोरा बांधला व भक्ताला एका जागी बसविले. दोऱ्याचे दुसरे टोक आपल्या हातात घेऊन तांत्रिक सुमारे १०० ते १५० फूट दूर गेला व तेथे बसून त्याने दोऱ्याचे दुसरे टोक आपल्या पायाच्या अंगठ्याला बांधले. नंतर त्याने दुष्ट राक्षस आत्म्याचे आवाहन केले. तात्काळ तो जीन प्रगट झाला.

तांत्रिकाने, ''तुझे खाद्य तेथे ठेवले आहे, बघ ''असे म्हणून आपल्या भक्ताकडे बोट दाखविले. तांत्रिकाने बांधलेल्या पायाच्या दोऱ्यातून राक्षसाने त्या भक्ताच्या शरीरात प्रवेश केला व त्याला ठार मारले. सगळेच तांत्रिक वाईट असतात असे नाही, परंतु तंत्रविद्या ही भूत पिशाच्चांच्या साधनेवर आधारित असल्याने अशी साधना करणारे साधक मरेपर्यंत असमाधानी, अशांत,

अस्वस्थ असतात व मृत्यूनंतर अंध:कारमय अशा पिशाच्चलोकात अडकून पडतात, एवढे मात्र निश्चित !

चेटूक विद्या, काळी विद्या या विद्यांमध्ये फक्त इतरांचे वाईट करणे एवढेच साध्य होते, चांगले काहीही साध्य होत नाही. असे लोक सैतानाची साधना करतात. यांच्यामुळे जगात वाईट गोष्टींची वाढ होते.

स्मशानाच्या आसपास राहिल्याने चांगल्या माणसाचा आत्माही खराब होतो. म्हणून कधीही स्मशानाच्या आसपास राहू नये. स्मशानाच्या, कबरस्थानाच्या आसपास राहणाऱ्या लोकांवर पिशाच्चशक्ती आपला प्रभाव गाजवितात व मृत्यूनंतर त्यांना पिशाच्चलोकात जाणे भाग पडते.

तांत्रिक, अघोरी, कापालिक या मार्गाने दुष्ट शक्तींच्या साधना करणारे लोक स्मशानाच्या जवळ राहतात व स्मशानात बसून साधना करतात. अनेक पिशाच्चांना वश करून घेतात व त्या आधाराने अनेक चमत्कार करतात. अशा साधकांच्या विरोधात कोणी जाऊ शकत नाही. असे साधक चांगली कामे क्वचितच करतात; परंतु लोकांवर हे प्रभाव पाडू शकतात व हजारो-लाखो लोकांना आपल्या मुठीत ठेवू शकतात. सामान्य माणसाने अशा लोकांपासून दूर राहणे चांगले असते; परंतु हजारातील नऊशे नव्याण्णव लोक अशाच लोकांच्या नादी लागलेले असतात; कारण लोकांना काहीतरी झटपट मिळवायचे

असते.

क्षुद्र विद्येची उपासना करणारे तांत्रिक, मांत्रिक, अघोरी, स्मशानात राहणारे, भूतपिशाच्चांना वश करण्यासाठी साधना करणारे असे जे लोक असतात त्यांच्यापासून सामान्य माणसांनी दूर राहावे, असे मला वाटते; परंतु दुर्दैवाने अशा लोकांकडेच माणसांची गर्दी असते. आपल्याकडे येणाऱ्या माणसांचे पुण्य, तेज व शक्ती हे साधक खेचून घेतात व त्यांच्या जीवावर हे स्वार्थी साधू मजेत राहतात.

मला असे बरेच साधू भेटले, ज्यांनी माझ्यातील शक्ती व पुण्य खेचून घेतले; परंतु त्या काळामध्ये माझे वय लहान होते. परमेश्वराचे अखंड नामस्मरण करणे व दिसेल त्या साधूची सेवा करत राहणे असे मी करत असे. साधू म्हणजे साक्षात् परमेश्वर असे मला वाटत असे, परंतु हळूहळू ईश्वराची कृपा होऊ लागली व खरे साधू व संधिसाधू यांच्यातील फरक ओळखता येऊ लागला.

मी असेही साधू पाहिले की, जे स्मशानात रहात असत व नरमांस खात असत. सर्वच साधू वाईट असतात असे नव्हे. आजही खूप उच्च कोटीचे सिद्धपुरुष, सत्पुरुष, संत जगाच्या कल्याणाचे कार्य करीत आहेत. परंतु हजारो साधूंमध्ये असा एखादाच सत्पुरुष असतो.

अशा एखाद्या खऱ्या सत्पुरुषाची गाठ पडेपर्यंत सामान्य माणसांनी आपल्या घरीच राहून रोज तास दोन तास ईश्वराचे नामस्मरण करावे व स्वामी विवेकानंदांची पुस्तके वाचावीत. सत्पुरुषांची चरित्रे वाचावीत, श्रीगुरुचरित्र, नवनाथ, श्री समर्थ सप्तशती यांसारख्या ग्रंथांची पारायणे करावीत, योगी कथामृत वाचावे, परमहंस स्वामी योगानंदांची पुस्तके वाचावीत, असे मला वाटते.

तांत्रिक-मांत्रिक सिद्धी कशा मिळवितात याविषयी मी **भारतीय गूढ विद्या** या पुस्तकात लिहिलेले आहे; तसेच योग्यांच्या साधना कशा असतात व ते कशी सिद्धी मिळवितात यांची माहिती **जीवनमुक्तीचा मार्ग** या पुस्तकात दिलेली आहे.

तांत्रिक-मांत्रिकांचे सर्व चमत्कार हे क्षुद्र शक्ती व पिशाच्च यांच्यावर अवलंबून असतात. त्यांच्या या शक्तींनी त्यांच्या आत्म्याची अधोगती होत असते व त्यांच्याबरोबर इतर अनेकांची ते अधोगती करत असतात.

योग्यांचे चमत्कार हे प्राणशक्ती व ईश्वरशक्ती यावर अवलंबून असतात. योग्यांच्या दर्शनाने मनुष्याला सद्गती प्राप्त होते, मनुष्याच्या आत्म्याचा उद्धार होतो. योगी योगसाधना करून ईश्वराशी एकरूप होतो व असंख्य जीवांचा उद्धार करतो. **अमरत्वाकडे वाटचाल** या माझ्या पुस्तकात चमत्काराचे

शास्त्र या प्रकरणात विविध प्रकारचे चमत्कार कशा पद्धतिने घडविले जातात, याचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

## चार
## शक्तिपात खरा व खोटा

एखादा पुण्यवान मनुष्य खूप ईश्वरभक्ती करतो. एका जागेवर बसून दोन-दोन तास जप करतो. ईश्वराच्या एखाद्या स्तोत्राचे हजारो पाठ करतो. गाणगापूर, औदुंबर, नरसोबावाडी अशा तीर्थक्षेत्री जाऊन श्रीगुरुचरित्राची पारायणे करतो. अशा पुण्यवान सद्भक्ताला रामकृष्ण परमहंस, लाहिरी महाशय, भगवान् नित्यानंद, श्री अक्कलकोटस्वामी, साईबाबा अशा एखाद्या जगत्कल्याणार्थ अवतरलेल्या महान सिद्धपुरुषाचे दर्शन होते.

ईश्वरभक्तीने साधकाचे चित्त शुद्ध झालेले असते. सूक्ष्मशरीर तेजस्वी झालेले असते व महान सद्गुरुचे दर्शन झाल्यानंतर तो सर्व भावाने सद्गुरुंची सेवा करू लागतो. काही काळ सेवा केल्यानंतर सद्गुरु त्याच्यावर शक्तिपात करतात.

स्वत:तील शक्ती त्याच्यामध्ये संक्रमित करतात. यामुळे या भक्ताची आध्यात्मात वेगाने प्रगती होऊ लागते व हा सद्भक्त शक्तिपात झाल्यावर साधक होतो व पुढील दहा-वीस वर्षांत ईश्वराशी एकरूप होऊन सिद्ध होतो.

खरा शक्तिपात हा असा असतो.

काही वर्षांपूर्वी शक्तिपाताच्या काही जाहिराती वाचल्या.

आम्ही कोणावरही शक्तिपात करतो, असे त्यांचे म्हणणे होते.

खरा प्रकार काय आहे हे पाहण्यासाठी शक्तिपात करणाऱ्या या साधूंच्या मी गाठीभेटी घेतल्या. यातील कोणीही ईश्वराशी एकरूप झाले नव्हते. हे सगळे क्षुद्र विद्येचे उपासक होते.

शक्तिपात करतो असे सांगून लोकांच्या शरीरात ते वातावरणातील भूतात्मा घुसवून देत असत. त्यामुळे भक्ताला अंगात संचार झाल्यासारखे वाटे, आपल्यावर शक्तिपात झाला, गुरुने आपल्यावर कृपा केली असे समजून भक्त आनंदित होत असे.

अशा प्रकारे हजारो लोकांवर खोटे शक्तिपात करण्यात आले. आजही हे प्रकार चालू आहेत. अशा प्रकारे खोटे शक्तिपात करणाऱ्या साधूंनी थोड्या बहुत विद्या साध्य केलेल्या होत्या. चौसष्ट योगिनी तंत्राचे अर्धवट साधन व अर्धवट वीर साधन, थोडे बहुत वेताळ साधन केलेले होते. अशा या अर्धवट साधनेने काही क्षुद्र शक्ती त्यांना वश झाल्या होत्या व त्या आधारावर त्यांची दुकानदारी चालू होती.

आजही असे प्रकार तुरळक प्रमाणात चालू आहेत.

## पाच

## असेही भक्त

साधू लोकांकडून समाजाचे कसे शोषण होते याविषयी आतापर्यंत बरेच सांगितले; परंतु असे का घडते याच्या मुळाशी जाऊन शोध घेतल्यास असे आढळून येते की...

'भ्रष्ट, स्वार्थी, संकुचित मनाचा समाजच भ्रष्ट साधू व भ्रष्ट राज्यकर्ते यांना निर्माण करतो !' हा विषय अतिशय गुंतागुंतीचा असून सामाजिक कर्म प्रारब्धावर अवलंबून आहे. अर्थात, आपल्या पुस्तकाचा हा विषय नाही; परंतु समाजातील माणसे ईश्वराच्या दयाळू बुद्धीचा कसा गैरफायदा घेतात, याचा एक अनुभव सांगतो.

एक सत्पुरुष एकांतवासात राहतात. कोणालाही भेटत नाहीत. सतत ध्यानधारणा करत असतात.

समाजाचे कल्याण व्हावे, लोकांना सन्मार्ग मिळावा म्हणून त्यांनी आपल्या एका परिचित भक्ताला शक्ती दिली.

गुरुने दिलेल्या शक्तीने हा तथाकथित भक्त लोकांची कामे करू लागला. लोक त्याला खूप मान देऊ लागले. त्याच्यामुळे लोकांना खूप चांगले अनुभव येऊ लागले.

हळूहळू या भक्ताला गर्व होऊ लागला. आपल्या पूर्ण आयुष्यात त्याने पाच मिनिटेसुद्धा कधी जप केलेला नव्हता. शेकडो लोक गुरु मानू लागल्यानंतर त्याला आपल्या गुरुविषयी

लोकांना काही सांगणे कमीपणाचे वाटू लागले. मी स्वत:च महान आहे, मला गुरु वगैरे कोणी नाही, असे तो लोकांना सांगू लागला.

काही लोकांना त्याच्या गुरुविषयी माहिती होती व गुरुकडून मिळालेल्या शक्तीने गर्व होऊन हा मनुष्य बेताल वागत आहे, याचीही जाणीव होती. त्यांनी त्याला मार्गावर आणण्याचा प्रयत्न केला, परंतु मी माझ्या गुरुहूनही मोठा आहे, असे त्याने लोकांना सांगायला सुरुवात केली.

गुरुने काही देवता त्या भक्तामागे लोककल्याणार्थ ठेवलेल्या होत्या. त्या देवतांनी त्या सत्पुरुषाला भक्ताच्या बेताल वागण्याचा सर्व रिपोर्ट दिला व आम्ही त्याच्या पाठीशी राहणार नाही व त्याचे संरक्षणही करणार नाही, असे सांगितले.

यावर त्या दयाळू सत्पुरुषाने...

''मी त्या भक्ताला उपदेशाच्या चार गोष्टी सांगून बघतो,'' असे सांगून देवतांची समजूत काढली.

अनेक निरोप पाठवूनही तो भक्त आलाच नाही. त्याला आता गुरुची गरज नव्हती. गुरुने दिलेल्या शक्ती, आशीर्वाद व देवदेवता भक्ताच्या बेताल वागण्याला कंटाळून गुरुकडे परत आल्या.

त्याच्याकडे जाणाऱ्या लोकांना दिव्य अनुभव येणे बंद

झाले, परंतु त्याची आध्यात्मिक थापेबाजी मात्र चालू राहिली. आध्यात्मिक थापेबाजीच्या जोरावर त्याने अनेक भक्त गोळा केले . त्याच्या या अशा वागण्याने तो व त्याचे भक्त अतिशय वेगाने अधोगतीच्या दिशेने जाऊ लागले. त्याच्या या वागण्याचे सर्व रिपोर्ट वातावरणातील संदेशवाहक आत्म्यांनी त्याच्या गुरुपर्यंत पोहोचविले.

वरील सर्व हकीकत सांगून ते दयाळू सत्पुरुष मला म्हणाले,

''लोकांचे अश्रू पुसण्यासाठी म्हणून मी त्याला शक्ती दिली. त्याने त्याचा वापर स्वत:चा मोठेपणा वाढविण्यासाठी केला. दोन-तीनशे लोकांना स्वत:च्या मुठीत ठेवले. याशिवाय ईश्वराला आवडणार नाही असे तो वागला ! ''

''या सर्व गोष्टींचे अतिशय दूरगामी व गंभीर परिणाम होतील. वातावरणातील दुष्ट शक्तींनी त्याच्या मेंदूचा ताबा घेतलेला आहे. त्यामुळे तो आता सुधारणे शक्य नाही. आपल्याबरोबर अनेकांची तो अधोगती करेल. त्याला परत मनुष्य जन्म मिळणार नाही. तीच परिस्थिती त्याचे अनुकरण करणाऱ्यांची होणार आहे व या गोष्टीला इलाज नाही !''

माणसाची एकदा का अधोगती व्हायला सुरुवात झाली की, ती थांबविणे अतिशय कठीण असते. अधोगतीच्या दिशेने जाणारा मनुष्य स्वत:बरोबर आपल्या संगतीत राहणाऱ्या सर्वांची अधोगती

करतो.

आध्यात्मात प्रगती करणे हे एव्हरेस्ट शिखरावर चढण्यासारखे आहे. सिद्ध गुरुकृपा करून एखाद्याला खूप वर चढवितात; परंतु स्वार्थी-ढोंगी भक्त इतक्या उंचीवर चढल्यानंतरसुद्धा वरून उडी टाकून स्वत:चा घात करतात व स्वत:बरोबर इतर अनेकांचेही नुकसान करतात.

त्या दयाळू साधूंनी मला त्यांच्या या ढोंगी शिष्याची अवस्था काय होईल हे सांगितले; परंतु ते वर्णन इतके भयानक आहे की, त्याविषयी न लिहिणेच योग्य !

समाजातील बहुतेक लोक हे अशाच प्रकारचे असतात. त्यांना फक्त मोठेपणा हवा असतो. त्यांच्या गुरुनेही त्यांचे कौतुक करत राहायला हवे असते. समाजातील या प्रवृत्तीचा फायदा ढोंगी साधू, तांत्रिक, मांत्रिक व भूत पिशाच्च जवळ बाळगणारे लोक उठवितात, म्हणून अशा साधूंकडे खूप गर्दी असते.

खऱ्या साधूंना समाजाकडून कसलीही अपेक्षा नसते. एखाद्या व्यक्तीचे प्रारब्ध शुद्ध करण्याचे त्यांनी ठरविले, तरच ते त्या व्यक्तीकडून सेवा करून घेतात; अन्यथा ते कोणाकडूनही सेवा करून घेत नाहीत. ते सहसा समाजात येतही नाहीत. खरे साधू अतिशय एकांतप्रिय असतात. ते एकांतात राहतात व ध्यानधारणा करतात.

**सहा**

मंत्र देणे, उपदेश करणे, इतरांना उपासना करण्यास सांगणे या सर्व गोष्टी करण्यास एक विशिष्ट प्रकारचा अधिकार असावा लागतो. हा अधिकार नसताना जर कोणी लोकांना उपासना मार्ग सांगू लागला, तर किती पंचाईत होते याचे काही अनुभव खाली देत आहे.

राजेश नावाच्या एका तरुणाला एका व्यक्तीने काही मंत्र दिले व त्या मंत्राचा जप करण्यास सांगितले व हवनही करण्यास सांगितले.

राजेश श्रद्धेने सर्व गोष्टी करू लागला; परंतु त्याची आध्यात्मिक उन्नती न होता त्याला वाईट स्वप्ने पडू लागली. इतकेच नव्हे, तर ज्या जागेवर बसून तो जप, हवन करीत असे त्या जागेवर दुसरी कोणीही व्यक्ती बसली, तर त्या व्यक्तीला त्रास होऊ लागला. हे सर्व प्रकार माझ्या कानावर आल्यानंतर मी त्याला त्याची सर्व साधना बंद करायला सांगितली. त्याने मंत्रजप, हवन या गोष्टी बंद केल्यानंतर त्याला वाईट स्वप्ने पडणे बंद झाले.

सुरेश नावाच्या एका व्यक्तीला मी संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्री समर्थ सप्तशती, श्री दुर्गासप्तशती, श्रीसिद्धलीलामृत- श्रीदत्तलीलामृत असे मी स्वत: लिहिलेले ग्रंथ वाचायला सांगितले. त्याप्रमाणे सुरेश दररोज श्रद्धेने ग्रंथवाचन करीत

होता. काही दिवस ग्रंथवाचन केल्यावर त्याच्या चेहऱ्यावर तेज दिसू लागले. डोळे अतिशय तेजस्वी व भेदक झाले. त्याला अतिशय आनंद होऊ लागला. त्याची आध्यात्मात खूप प्रगती होऊ लागली. स्वप्नामध्ये देवदेवतांची दर्शने होऊ लागली आणि इतक्यात

याच पुस्तकात वर्णन केलेला तो महान (?) मनुष्य भेटला.

सुरेशची व त्या महान मनुष्याची भेट झाली. त्या महान माणसाने आपल्या वागण्याने गुरुने दिलेली सर्व शक्ती घालविलेली होती व स्वत:ला महान सिद्ध समजत तो लोकांची दिशाभूल करीत होता.

सुरेशची व त्याची गाठ पडताच त्याने सुरेशला सर्व उपासना बंद करण्यास सांगितले व वेगळ्याच काही साधना करायला सांगितल्या. स्वामीजींनी सांगितलेल्या उपासनेपेक्षा या साधना श्रेष्ठ आहेत, असेही सांगितले.

सुरेशने मी सांगितलेल्या उपासना बंद केल्या व त्या माणसाने सांगितलेल्या साधना सुरू केल्या.

काही दिवसांतच त्याला वाईट स्वप्ने पडू लागली. झोपेमध्ये आपल्या छातीवर कोणीतरी बसले आहे, असे आभास होऊ लागले. शांत झोप लागेना. रात्री अचानक जाग येत असे व घरात सर्वत्र पिशाच्च फिरत आहेत, असे दिसत असे. सर्वांवर

कळस म्हणजे खऱ्या भक्तिमान लोकांना तो भेटला की, त्यांना त्याचा खूप त्रास होऊ लागला. सर्व भक्तिमान लोक त्याला टाळू लागले. एकेकाळचा आध्यात्मिक मनुष्य चालते-बोलते जिवंत पिशाच्च झाला.

हे सर्व प्रकार मला काही माणसांनी सांगितले. मी सुरेशला तो करत असलेल्या सर्व साधना बंद करायला लावल्या. पुनश्च श्री समर्थसप्तशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीदुर्गासप्तशती, श्रीसिद्धलीलामृत, श्रीदत्तलीलामृत या ग्रंथांचे वाचन सुरू करण्यास सांगितले. हे वाचन सुरू करताच त्याला येणारे सर्व वाईट अनुभव बंद झाले व पुनश्च चांगले अनुभव येऊ लागले.

मंत्र अथवा उपासना घेताना ज्याच्याकडून आपण मंत्र उपासना घेतो ती व्यक्ती पराकोटीची आध्यात्मिक असावी लागते. आजकाल समाजात आध्यात्मिक लोक फार कमी आहेत. चालती-बोलती जिवंत पिशाच्चे लोकांकडून मोठेपणा मिळविण्यासाठी लोकांना मंत्र देणे, उपासना सांगणे असे प्रकार करत आहेत. लोकांना मंत्र उपासना देणारे हे लोक स्वत:च पिशाच्च कोटीतील असल्याकारणाने यांच्याकडून मंत्र उपासना घेतली असता घेणारेही पिशाच्च कोटीमध्ये खेचले जातात. अशी कितीतरी उदाहरणे मला माहीत आहेत.

या प्रकरणामध्ये तांत्रिकांच्या कथा सांगून तांत्रिक कसे असतात याची थोडक्यात माहिती दिली आहे.

पाचवी व सहावी कथा, सामान्य माणसे जेव्हा लोकांना आध्यात्मिक मार्गदर्शन करू लागतात तेव्हा अधिकार नसताना लोकांना उपदेश केल्यानंतर कसे नुकसान होते, हे दाखवून देतात.

## सात

## अधोगती

जे लोक स्वार्थी असतात, ईर्षा, द्वेष, मत्सर करणारे असतात. अशा लोकांभोवती पिशाच्च शक्ती वावरत असतात. हळूहळू अशी माणसे पूर्णपणे पिशाच्च शक्तींच्या अधीन होतात. त्यांचे शरीर म्हणजे पिशाच्चांचे वसतिस्थान होते. अशा माणसांच्या सहवासात राहणाऱ्यांनाही या स्वार्थी, कंजूष लोकांच्या अवतीभवती वावरणाऱ्या पिशाच्च शक्तींचा उपद्रव सहन करावा लागतो. पुष्कळ वेळा या दुष्ट शक्ती त्यांच्या संगतीत आलेल्या सज्जनांच्या मनावरही परिणाम करतात व त्यांनाही स्वार्थी बनवितात. स्वत:ची अधोगती होऊ नये असे जर वाटत असेल तर तोंडात साखर व पोटात विष अशा पद्धतिने वागणाऱ्या लोकांपासून नेहमी दूर राहावे. अशा लोकांची अधोगती होण्याची खूप दाट शक्यता असते.

काही लोक असे असतात की, त्यांच्यात फारसे दोष नसतात; परंतु थापा मारणे व लोकांना उल्लू बनविणे असा स्वभाव असतो. हे लोक स्वार्थी नसतात. लोकांचे नुकसानही

करत नाहीत; परंतु लांबलचक थापा मारण्याच्या स्वभावामुळे हे लोक स्वत:चे कसे नुकसान करून घेतात व यांच्या संगतीने इतरांचे कसे नुकसान होते याची अनेक उदाहरणे मला माहीत आहेत. त्यांतील एक-दोन उदाहरणे पुढे देत आहे.

एक व्यक्ती स्वभावाने खूप चांगली होती, नि:स्वार्थी होती, अधून-मधून माझ्याकडे येत असे. तिच्या स्वभावात एक बारीकसा दोष होता. ती व्यक्ती लोकांना थापा मारीत असे व लोकांना उल्लू बनविण्यात तिला आनंद होत असे. हळूहळू हा तिचा स्वभावच बनून गेला.

मध्यंतरी दोन-तीन वर्षे त्या व्यक्तीची व माझी भेट झाली नाही. सुमारे तीन वर्षांनंतर जेव्हा ती व्यक्ती मला भेटली तेव्हा माझ्या लक्षात आले की, ती व्यक्ती पिशाच्च शक्तीच्या पूर्णपणे अधीन झालेली होती. या व्यक्तीचे पुढे काय होईल हे ईश्वरालाच माहीत.

थोड्याशा दूषित प्रवृत्तीमुळे जर माणसांची इतकी अधोगती होत असेल, तर जे लोक वाईट प्रवृत्तींचे आहेत, त्यांचे काय होत असेल ते ईश्वरालाच ठाऊक !

एका व्यक्तीला मोठेपणाची अतिशय आवड होती. त्या मोठेपणाची आवड असणाऱ्या व्यक्तीला लोक मोठेपणा देत. अनेकांनी मोठेपणा दिल्याकारणाने त्या व्यक्तीला आपण खूप महान आहोत, असे वाटू लागले.

हळूहळू त्या व्यक्तीने लोकांना आध्यात्मिक प्रवचने द्यायला सुरुवात केली. या व्यक्तीची आध्यात्मिक प्रवचने ऐकण्यासाठी अतिशय खालच्या दर्जाचे लोक येत असत. या लोकांवर दुष्ट शक्तींचा प्रभाव होता.

दुष्ट शक्तींच्या प्रभावाखाली राहणाऱ्या लोकांची संगत केल्याकारणाने हळूहळू या माणसाच्या मनाचा तोल जाऊ लागला. अहंकार पराकोटीचा वाढला.

ज्याने संपूर्ण आयुष्यात मोठेपणाच्या अपेक्षेशिवाय दुसरे काहीही केलेले नाही, पाच मिनिटेही ज्याने कधी आसनावर बसून जप केला नाही, अशा या व्यक्तीमध्ये पिशाच्च प्रभावाखालील लोकांच्या सहवासामुळे असा काही बदल झाला की, त्याला आपण कल्की अवतार आहोत असे वाटू लागले व आपण अवतारी पुरुष असल्याचा प्रचार त्याने सुरू केला.

१९८९ मध्ये मी जेव्हा त्याला पाहिले तेव्हा मला त्याची कीव आली; पण काहीही करता येण्यासारखे नव्हते. आपण अवतारी पुरुष असल्याच्या भ्रमात तो पूर्ण बुडून गेलेला होता; परंतु प्रत्यक्षात तो पिशाच्च शक्तींच्या अधीन झालेला होता.

**'मोठेपणाच्या लालसेने त्याची अधोगती झालेली होती !'**

स्वभावातील छोटे-छोटे दोष व छोट्या-छोट्या दुष्ट प्रवृत्ती माणसाची किती अधोगती करतात हे उदाहरणासहित दाखवून

देण्यामागे माझे दोन उद्देश आहेत.

१. अशा छोट्या-छोट्या प्रवृत्तींनी जर माणसाची अधोगती होते, तर जे लोक लाचखाऊ आहेत, स्वार्थी व दुष्ट प्रवृत्तीचे आहेत, सत्तेसाठी-संपत्तीसाठी जे लोक दुष्कर्मे करतात, त्यांचे काय होत असेल, यावर वाचकांनी चिंतन करून आपले वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करावा.

२. ईश्वराचे नामस्मरण केले असता, प्रेमाने वागले असता माणसाचा आत्मा शुद्ध होतो. अशा लोकांनी संगत करताना अतिशय जपून वागले पाहिजे. स्वार्थी व दुष्ट लोकांपासून दूर राहिले पाहिजे; कारण अशा लोकांच्या संगतीने नामस्मरणाने, ईश्वरभक्तीने पवित्र झालेले आपले सूक्ष्मशरीर पुनश्च अपवित्र होते व अपवित्र झालेल्या सूक्ष्मशरीराला (जीवात्म्याला) शुद्ध करण्यासाठी पुनश्च साधना करावी लागते. दुष्ट संगतीने आध्यात्मिक प्रगतीत अडथळे निर्माण होतात.

आध्यात्मामध्ये थोडीशी प्रगती झाली की, पवित्रतेचा अनुभव येऊ लागतो व अपवित्र स्पंदनांचे ज्ञान होऊ लागते.

❋ ❋ ❋

# ९. दुर्जन संगतीचे दुष्परिणाम

**एक**

एक वृद्ध पती-पत्नी होते. पत्नीला आध्यात्माची अतिशय आवड. तिने अनेक आध्यात्मिक ग्रंथ वाचले. अनेक आध्यात्मिक पुरुषांच्या तिने गाठीभेटी घेतल्या. रेकी, प्राणिक हीलिंग, फेंगशुई असे कोर्स केले; परंतु कशानेही तिचे समाधान होईना. वेड्यावाकड्या साधना केल्याने माणसांची मुंडकी हवेतून तरंगत जात आहेत असे दिसे. कोणीतरी तिला '**स्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाच**' असे सांगितल्याने तिने माझी पुस्तके वाचली व तिला अतिशय समाधान वाटले. तिने पूर्वी करत असलेल्या सर्व साधना बंद केल्या व '**श्रीदत्त जय दत्त**' असा जप करण्यास सुरुवात केली.

दररोज सकाळी दोन तास व संध्याकाळी दोन तास एकाच आसनावर बसून ती जप करू लागली. अधून-मधून **श्री**

**समर्थ सप्तशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीदत्तलीलामृत–श्रीसिद्धलीलामृत** इत्यादी ग्रंथ तिने वाचण्यास सुरुवात केली.

काही दिवसांतच तिला दिव्य अनुभव येऊ लागले. निळी ज्योत दिसू लागली व भगवान् श्रीकृष्णाचे दर्शन झाले व इतरही अनेक दर्शने झाली. तिचा नवरा अतिशय विचित्र वागत असे व खूप भांडण करीत असे. त्याच्या विचित्र वागण्याने ती हैराण होऊन जाई. शेवटी ती नवऱ्याला घेऊन माझ्याकडे आली.

मला पाहिल्याबरोबर तिचा नवरा ढसढसा रडू लागला. तो मला म्हणाला, ''मी विचित्र वागतो हे अगदी खरे आहे; पण मी विचित्र का वागतो तेच मला कळत नाही. मला स्वप्नात सारखी भूते दिसतात. खूप वाईट स्वप्ने पडतात. देवाचे काहीही करावेसे वाटत नाही. माझ्या आसपास पिशाच्चे वावरत आहेत असे मला वाटते.''

मी विचारले, ''तुम्ही नोकरी कुठे करता ?''

त्याने मला तो ज्या फर्ममध्ये नोकरी करतो त्या फर्मचे नाव व मालकाचे नाव सांगितले.

मी त्याला विचारले, ''तुला पगार किती मिळतो ?''

तो म्हणाला, ''चाळीस हजार रुपये !''

मी त्याला म्हणालो, ''तू ज्या फर्ममध्ये नोकरी करतोस,

तेथे सर्व पापाचा पैसा गोळा होतो. तुझा मालक खूपच दुष्ट आहे, क्रूर आहे. या तुझ्या मालकाच्या संगतीमुळे तू दिवसेंदिवस दुष्ट व क्रूर बनत चालला आहेस. तुझ्या आत्म्याचे कल्याण व्हावे असे वाटत असेल, तर नोकरी सोडून दे !''

साठ वर्षांच्या त्या सज्जनाने सरळ नोकरी सोडून दिली व घरी बसून ईश्वरभक्ती करण्यास प्रारंभ केला. काही दिवसातच त्याच्या मनाला पूर्ण शांतीचा लाभ झाला. तद्नंतर परत तो मला भेटायला आला व पश्चात्तापाने पुनश्च ढसढसा रडू लागला व म्हणाला, ''माझ्या आयुष्याची साठ वर्षे फुकट गेली ! ही साठ वर्षे मी भक्ती केली असती व सज्जनांचा सहवास केला असता तर माझे खूप कल्याण झाले असते !''

या वृद्ध पती-पत्नीचे भाग्य थोर, म्हणून अधोगतीपासून त्यांचे रक्षण झाले. अर्थात, त्या वृद्ध गृहस्थाला मी वीरपुरुष म्हणेन. त्याने माझ्या एका शब्दासाठी व स्वत:च्या आत्म्याच्या कल्याणासाठी दर महिन्याला मिळणाऱ्या चाळीस हजार रुपयांवर पाणी सोडले. रुपया-दीड रुपयाच्या गोष्टी करणारे अनेक लोक मी पाहिले आहेत. फोर्टच्या बाजारात चार आण्यांत झेरॉक्स मिळते व घराशेजारी चाळीस नव्या पैशांत मिळते म्हणून फोर्टपर्यंत धावत जाणारे लोकही मी पाहिलेले आहेत. आजच्या जगामध्ये पैशाशिवाय कसलेच पान हलत नाही. अशा स्थितीमध्ये दरमहा चाळीस हजार रुपयांची नोकरी सोडण्याचे धाडस त्या वृद्धाने

केले याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच !

दुष्ट दुर्जनांची संगत सोडल्यानंतर त्या वृद्ध गृहस्थाची आध्यात्मात प्रगती झाली व ते वृद्ध पती-पत्नी पूर्ण सुखी झाले. दुर्जनांच्या संगतीचे किती दुष्परिणाम होतात याचे एक उदाहरण वर दिले आहे. आता दुसरे उदाहरण पाहा !

**दोन**

माझा सख्खा भाऊ अशोक हा पराकोटीचा सज्जन, अतिशय परोपकारी व अतिशय भक्तिमान होता. प्रकृतीने एकदम ठणठणीत व सर्वांना आनंद देणारा असा त्याचा स्वभाव असल्याने तो सर्वांनाच प्रिय होता.

श्री गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने तो माझ्याकडे आला. त्यावेळी ईश्वरी प्रेरणेनुसार मी त्याच्या मित्रांची चौकशी त्याच्याजवळ केली. त्यात त्याने एका मित्राचे नाव मला सांगितले. तेव्हा मी त्याला म्हणालो...

''या मित्रापासून तू दहा फूट दूर राहा !''

मी असे म्हणालो, हे माझ्या सख्ख्या भावाला अशोकला आवडले नाही. माझा मुद्दा पटवून सांगण्यासाठी मी त्याला म्हणालो...

''मी तुला दहा फूट दूर राहण्यासाठी सांगितले आहे. त्याला मदत करू नकोस असे म्हणालो नाही किंवा त्याच्याशी

संबंध तोड, असेही म्हणालो नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ इतकाच आहे की, त्याला बरोबर घेऊन तू मोटारसायकलने अथवा गाडीने फिरू नकोस !''

यावर अशोकने आपला मित्र किती सज्जन व चांगला आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. यामुळे मला थोडासा राग आला व मी त्याला कडक शब्दात सुनावले,

''तू सात्त्विक आहेस, खूप भक्ती करतोस, त्यामुळे तुझा आत्मा शुद्ध झालेला आहे. हा जो तुझा मित्र आहे, त्याच्यामध्ये प्रचंड दुष्ट शक्ती भरलेल्या आहेत. याच्या सहवासाने तुझा मेन्टल बॅलन्स जाईल, नर्व्हस ब्रेकडाऊन होईल, पॅरालिसिसचा अ‍ॅटॅक येईल व हे सहन करता न आल्यास मृत्यूही ओढवेल, हे लक्षात ठेव !''

इतक्या स्पष्ट शब्दांत सांगितल्यानंतर त्याची पत्नी मला म्हणाली..

''तुम्ही सांगता आहात ते अगदी खरे आहे ! तो मित्र जेव्हा आमच्या घरी येतो, तेव्हा घरातील वातावरण बिघडते, घरात भांडणे होतात, मुले विचित्र वागतात !''

आपल्या पत्नीने आपल्या मित्राविषयी असे बोललेले अशोकला आवडले नाही.

श्री गुरुपौर्णिमा झाल्यानंतर सर्वजण घरी निघून गेले व

मीही साधनेकरिता एकांतवासात निघून गेलो.

ज्याची संगत करू नकोस म्हणून सांगितले तो मित्र अधून-मधून अशोकच्या घरी येत होता व अशोकची पत्नी त्याला मी काय म्हणालो याची आठवणही करून देत होती; परंतु अशोक मनावर घेत नव्हता.

एक दिवस तो मित्र आला व त्याने अशोककडे त्याची मोटारसायकल मागितली. अशोकने त्याला मोटारसायकल दिली.

दोन दिवसांनंतर तो मित्र येऊन सांगू लागला, ''मोटारसायकल चोरीला गेली. आपण तुमची दुसरी मोटारसायकल घेऊन ती शोधायला जाऊ या !''

अशोकच्या पत्नीने अशोकला मी काय सांगितले याची आठवण करून दिली व म्हणाली..

''तुम्हाला दहा फूट दूर राहायला सांगितले आहे. तुम्ही त्याच्याबरोबर मोटारसायकलने जाऊ नका !''

अशोकने तिचे ऐकले नाही व त्या मित्राला डबल सीट घेऊन मोटारसायकल शोधायला गेला. रात्री घरी परत आला. दुसऱ्या दिवशी परत त्या मित्राला घेऊन मोटारसायकल शोधायला गेला.

संध्याकाळी त्याची प्रकृती अचानक बिघडली म्हणून तो स्वत:च हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाला. दोन दिवसांनी त्याची

तब्यत सुधारली. तो परत हिंडू फिरू लागला. त्याच्या पत्नीने परत त्याला मी काय म्हणालो, याची आठवण करून दिली.

सहा-सात दिवसांनंतर तो मित्र परत आला व मोटारसायकल शोधायला जाऊ म्हणू लागला.

अशोकच्या पत्नीने अलकाने त्याला पुनश्च श्रीगुरुपौर्णिमेला मी काय-काय म्हणालो ही सर्व वाक्ये ऐकविली.

यावर अशोक म्हणाला, ''तू बघतच आहेस माझी प्रकृती एकदम ठणठणीत आहे. गेले चार-पाच दिवस भर उन्हातून मी तीन-चार तास मोटारसायकलने फिरत आहे. मला काहीही होणार नाही, याची मला पूर्ण खात्री आहे, तरीपण तुझ्या शब्दासाठी मी मोटारसायकल न नेता टाटा सुमो भाड्याने करतो व मोटारसायकल शोधायला जातो. मला जेमतेम वीस किलोमीटर जायचे आहे. मी दोन-तीन तासात नक्की परत येतो.''

असे म्हणून भाड्याने टाटा सुमो करून त्या मित्राला बरोबर घेऊन अशोक गेला. तासाभरातच त्याला उलट्या होऊ लागल्या व त्याने मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करा, असे सांगितले.

ड्रायव्हरने तात्काळ गाडी रत्नागिरीच्या दिशेने वळविली. भरधाव वेगाने त्यांनी गाडी हॉस्पिटलमध्ये आणून, मित्राने व

ड्रायव्हरने मिळून अशोकला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले.

डॉक्टरांनी प्रयत्नांची शर्थ केली; परंतु काही उपयोग झाला नाही. त्याच रात्री त्याची प्राणज्योत मालवली.

ज्यांच्या मागे भयंकर दुष्ट शक्ती आहेत, अशा लोकांच्या संगतीने सज्जन व्यक्तीचे किती नुकसान होऊ शकते याचे हे उदाहरण आहे.

''समाजात वावरणे मला आवडत नाही म्हणून मी समाजात रहात नाही; परंतु या समाजातील जेमतेम दहा-वीस माणसे माझ्याकडे येतात. यांना जेव्हा मी सांगतो की, अमुक एका व्यक्तीची संगत करू नका. तेव्हा त्यांना राग येतो व ते माझ्याविषयी गैरसमज करून घेतात व ज्यांची संगत करू नका म्हणून सांगितले त्यांची संगत करतच राहतात. त्यांनी हे प्रकरण पुन्हा-पुन्हा वाचावे व योग्य तो बोध घ्यावा ! ''

**तीन**

कोकणामध्ये देवदेवतांच्या नावाने इतका काही गोंधळ आहे की, हा गोंधळ कुठलाही सिद्धपुरुष निस्तरू शकणार नाही, असे मला वाटते. कोकणातील ग्रामदेवतांच्या देवळांमध्ये डुक्करांची मुंडकी टांगलेली असतात. कोकणातील लोक डुक्कराचे मांस आवडीने खातात. आपल्या ग्रामदेवतांना डुक्कराचे बळी देतात.

खरे पाहता डुक्कराला शिवल्याने माणसामध्ये दुष्ट शक्ती प्रवेश करतात. डुक्कराचे मांस खाल्याने सज्जन मनुष्य दुष्ट, दुर्जन बनतो. चांगले विचार तो करू शकत नाही, स्वार्थी बनतो. पिशाच्च शक्तींच्या प्रभावाखाली तो सदैव राहतो. अर्थात, केव्हातरी वर्षातून एकदा डुक्कराचे मांस खाल्याने असे घडणार नाही, परंतु नेहमी डुक्कराचे मांस खाणाऱ्या लोकांवर दुष्ट शक्ती आपला प्रभाव गाजवितात एवढे मात्र नक्की ! या साठी सज्जनांनी डुक्कराचे मांस खाऊ नये, असे माझे सांगणे आहे.

वातावरणातील दुष्ट शक्ती समाजाला अधोगतीच्या दिशेने नेत आहेत हे पाहून समर्थ रामदास स्वामींनी प्रत्येक गावामध्ये एक मारुतीचे मंदिर असावे, असा आग्रह धरला होता.

समर्थ रामदास स्वामींच्या इच्छेप्रमाणे कोकणातील लोकांनी डुक्कराची पारध करणे बंद करून प्रत्येक गावामध्ये एक मारुतीचे मंदिर बांधावे व मंदिरामध्ये मारुती स्तोत्र व हनुमान चालीसा यांचे पाठ करावेत म्हणजे कोकणवासी जास्त सुखी होतील, असे मला वाटते.

कोकणात काही जागा अशा आहेत की, तेथे अनेक लोक जाऊन नमस्कार करतात, परंतु तेथे पिशाच्च शक्ती असते, असे आढळून आले आहे.

कोकणातील एके ठिकाणी आपण होळीच्या उत्सवासाठी जाणार आहोत, असे मला अशोकने फोनवर सांगितले.

मी म्हणालो, ''तू तेथे जाऊ नकोस तेथे पिशाच्च शक्ती आहेत !''

यावर तो थोडासा वैतागला व फोनवर म्हणाला...

''हजारो लोक तेथे होळीला जातात व नवसाची कोंबडी कापतात. ते सगळे काही खुळे आहेत काय ?'' असे म्हणून त्याने फोन ठेवून दिला. माझे न ऐकता तो होळीला गेला. तेथे गेल्यावर त्याच्या पोटात दुखू लागले व होळीचा उत्सव अर्धवट सोडून त्याला घरी परत जावे लागले.

देवस्थानांमध्ये कोठल्या शक्ती आहेत हे फक्त सिद्धपुरुषांनाच कळत असते. सात्त्विक माणसाने देवस्थानात जाताना नीट विचार करून जावे. औदुंबर, नरसोबावाडी, गाणगापूर, अक्कलकोट या दत्तक्षेत्रांमध्ये खूप सात्त्विक शक्ती आहे. तेथे लोकांनी अवश्य जावे.

वणी (नाशिक) येथील सप्तशृंग गडावरील अठरा हाताच्या देवीचे स्थानही खूप जागृत आहे. तेथेही लोकांनी अवश्य जावे.

सत्पुरुषांच्या समाधिस्थानी खूप चांगली स्पंदने असतात. म्हणून सत्पुरुषांची समाधी जेथे असेल तेथे सद्भक्तांनी अवश्य जावे.

'संगत पाहिजे चांगली' असे साटम महाराज नेहमी म्हणत असत. त्याचा प्रत्यय हा अध्याय वाचल्यावर वाचकांना येईल. वाचकांनी सतत चांगली संगत धरावी हाच हे प्रकरण लिहिण्याचा उद्देश आहे.

मनुष्य कोणीही असो, चूक केली की त्याचे दुष्परिणाम भोगावेच लागतात. याबद्दल माझा स्वत:चा एक अनुभव सांगून हे प्रकरण संपवितो.

**चार**

एकदा एका सज्जनाने मला एक चामडे आणून दिले. चामडे कसले आहे याचा फारसा विचार न करता मी चामड्यावर बसून ध्यानधारणा करण्यास सुरुवात केली.

त्या चामड्यावर बसून ध्यान करण्यास सुरुवात करताच माझे डोके जड झाले. चारही दिशांनी वाईट स्पंदने माझ्या शरीरात शिरू लागली. असे का होते हे माझ्या लक्षात येईना.

ध्यानात बसल्यानंतर नेहमी पवित्र स्पंदनांचा, पवित्र लहरींचा, पवित्र लोकांचा मला अनुभव येत असे.

त्या चामड्यावर बसल्यावर मात्र हे सर्व अनुभव येणे बंद झाले व दुष्ट शक्तींचा अनुभव येऊ लागला व भयानक त्रास होऊ लागला. दुर्दैवाने म्हणा अथवा त्या चामड्याच्या प्रभावामुळे म्हणा, मला असे का घडते आहे हे कळेना.

असेच दोन-तीन दिवस निघून गेले. माझे त्या चामड्यावर बसणे व ध्यानधारणा करणे चालूच होते. अचानक एक दिवस एक मोठे डुक्कर प्रकट झाले, त्याने मला जोराने धडक दिली व विचारले, ''आम्हाला कशाला बोलाविले ?''

मी त्याला म्हटले, ''मी दत्तभक्त आहे. तुला कशाला बोलावू !''

यावर तो डुक्कर म्हणाला, ''मग आमच्या आसनावर बसून ध्यान का करता ?'' असे म्हणून ते डुक्कर अदृश्य झाले.

तेव्हा कोठे खरा प्रकार माझ्या लक्षात आला. मी तात्काळ आसनावरून उठलो. त्या चामड्याचे तुकडे केले व वाहणाऱ्या नदीत फेकून दिले.

त्या चामड्यावर बसून साधना केल्याकारणाने माझे स्थूलशरीर व सूक्ष्मशरीर अतिशय अपवित्र झाले होते. त्याचे शुद्धीकरण करण्यास मला सुमारे दीड महिना साधना करावी लागली.

वाचक हो ! केवळ चामड्यावर बसून साधना केल्याकारणाने एखाद्या सत्पुरुषाचे इतके नुकसान होत असेल, तर डुक्कराचे मांस खाणाऱ्या लोकांचे काय होत असेल याचा विचार वाचकांनीच करावा !

समाजातील चुकीच्या प्रथा आता सोडून द्यायला हव्यात व चांगल्या प्रथांचा समाजात प्रसार व्हायला पाहिजे.

सर्व वाईट शक्ती मारुतीला घाबरतात, म्हणून प्रत्येक गावात एकतरी मारुतीचे मंदिर असावे. मारुतीचे हे स्थान जागृत राहावे, म्हणून सद्भक्तांनी दररोज हनुमान चालीसा व मारुती स्तोत्र यांचे पाठ त्या मंदिरात करावेत. असे केले असता दुष्ट शक्तींचा प्रभाव हळूहळू कमी होत जाईल व चांगल्या शक्तींचा प्रभाव वाढू लागेल.

देवतांच्या नावाने बळी देण्याचे प्रकार पूर्णपणे बंद व्हायला पाहिजेत. कारण कुठल्याही देवतेला बळी देण्याची आवश्यकता नसते. वातावरणातील दुष्ट शक्ती स्वत:ची ताकद वाढविण्यासाठी बळी घेत असतात. मानव जो बळी देतो तो बळी राक्षसांची व दुष्ट आत्म्यांची ताकद वाढवितो.

बळीने देवदेवता प्रसन्न होत नाहीत हे समाजाने ध्यानात ठेवावे. दुष्ट व राक्षस आत्मेच बळी घेत असतात व या दुष्ट राक्षस आत्म्यांना बळी देऊन समाज दुष्ट शक्तींचे पोषण करतो व गेली हजारो वर्षे हे चालू आहे. याचा सरळ अर्थ असा की, ईश्वराची भक्ती करण्याऐवजी मनुष्य स्वेच्छेने असुर, दैत्य, राक्षस यांची भक्ती करत आला आहे.

वर्षातून एकदा बळी दिला जातो, अशा मूळ प्रथा; पण या प्रथेचे पालन करणाऱ्यांना तुम्ही वर्षातून एकदाच बळी का देता असे विचारले, तर त्याचे उत्तर देता येत नाही. कोणालाही

याचे शास्त्रशुद्ध उत्तर माहीत नाही.

पूर्वजांनी वर्षातून एकदा बळी देण्याची प्रथा पाडली. त्याचे खरे कारण असे आहे की, असुर, दैत्य, राक्षस हे ज्या लोकांत राहतात त्या लोकांचा एक दिवस म्हणजे पृथ्वीतलावरील एक वर्ष ! म्हणून वर्षातून फक्त एकदाच त्यांच्या नावाने बळी दिला जातो. त्यांच्या नावाने बळी दिल्यानंतर ते आपल्याला वर्षभर त्रास देत नाहीत ही समजूत!

हळूहळू लोकसंख्या वाढू लागली व बळी देण्याचे प्रकार दररोज घडू लागले. भारतातील तांत्रिक, मांत्रिकांनी बळी देण्याच्या प्रथेचा सर्वत्र प्रसार केला. हजारो वर्षे आपण या आसुरी शक्तींना रक्त पाजून पोसले आहे व त्यामुळे समाजामध्ये नऊशे नव्याण्णव व्यक्ती दुष्ट शक्तीच्या अधीन रहात आहेत व त्यामुळे समाजामध्ये दुष्ट प्रवृत्ती खूपच वाढलेल्या आहेत. यावर उपाय म्हणून संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदाय सुरू करून समाजाला सन्मार्गाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. समाजामध्ये चांगल्या गोष्टींचा प्रसार व्हावा व दुष्ट शक्तींचा नाश व्हावा असे वाटत असेल, तर **बळींची प्रथा पूर्णपणे बंद होणे आवश्यक आहे.**

# १०. कर्म व त्याचे परिणाम

कर्माचे परिणाम हे मानवालाच नव्हे, तर पशुपक्ष्यांनाही भोगावे लागतात. इतकेच नव्हे, तर देव, योगी, सिद्ध, कोणीही कर्माच्या परिणामापासून पळवाट काढू शकत नाही.

पुष्कळ वेळा सत्पुरुष कर्माचे परिणाम हे आपल्या सोयीनुसार भोगतात; परंतु कर्माचे परिणाम कोणालाही टाळता येत नाहीत.

पूर्वजन्मातील सत्कर्मांमुळे माणसाला वैभव, ऐश्वर्य, कीर्ती, मानसन्मान, यश इत्यादी गोष्टी प्राप्त होतात. मानवाजवळ जेव्हा या गोष्टी असतात तेव्हा त्याने हे सर्व आपल्या पूर्वजन्मींच्या सत्कर्मांचे फळ आहे याची जाणीव ठेवून पुढील जन्माची बेगमी करून ठेवायला हवी.

सर्व प्रकारच्या दुर्व्यसनापासून दूर राहायला हवे. जर असे केले नाही तर पूर्वजन्मींच्या सत्कर्मांमुळे प्राप्त झालेली पुण्याई संपून जाते व माणसाला दुर्बुद्धी होऊ लागते व अधोगतीच्या

दिशेने त्याचा प्रवास सुरू होतो.

पुण्याईच्या बळावरच मनुष्य मृत्यूनंतर दिव्य लोकात प्रवेश करतो. पुण्य इहलोकी सुख देते व मृत्यूनंतर दिव्य लोकात प्रवेश प्राप्त करून देते. माणसाचे सत्कर्मच माणसाला मदतनीसाच्या रूपाने उभे राहते, वाटाड्याच्या रूपाने उभे राहते, देवाच्या रूपाने उभे राहते.

मनुष्य हा कुटुंबवत्सल असल्याकारणाने कुटुंबातील अनेक माणसांचे प्रारब्ध एकत्रित होऊन घराण्याचे प्रारब्ध तयार होते व संपूर्ण घराण्याला चांगल्या वाईट कर्मांचे परिणाम भोगावे लागतात. हे लक्षात ठेवून कुटुंबातील प्रत्येकाने चांगली कर्मे करून घराण्याच्या प्रारब्धाचा तोल सांभाळणे अतिशय आवश्यक असते. घराण्यातील माणसे जर बरोबर वागली नाहीत तर त्याचे दुष्परिणाम संपूर्ण घराण्याला भोगावे लागतात.

स्वार्थी, कंजूष व स्वत:पुरतेच जगणाऱ्या माणसाच्या पोटी जी संतती निर्माण होते ती कमनशिबी असते. अशा संततीला दारिद्र्य व अपयश भोगावे लागते व ही परंपरा पुढे अनेक पिढ्या चालत राहते.

याकरिता मानवाने वैभव प्राप्त झाल्यानंतर सत्कर्मे करण्याचे सोडू नये. सतत सत्कर्मे करीत राहिले पाहिजे. परोपकार व दान करून पुण्य मिळवित राहायला पाहिजे. जप व ध्यान करून ईश्वराच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## दुष्कर्मे व त्याचे परिणाम

पूर्वजन्मात केलेल्या दुष्कर्मांमुळे संपूर्ण घराण्याला दारिद्र्य, मूढता, अहंकार, दुष्ट प्रवृत्ती, ईर्षा, द्वेष, मत्सर करण्याचा स्वभाव, स्वार्थी वृत्ती, पिशाच्चबाधा अशा विविध मार्गांनी माणसाची दुष्कर्मे माणसाला सतावत असतात.

पूर्वजन्मातील दुष्कर्मे माणसाच्या मनात अहंकार निर्माण करत असतात व माणसाला ईश्वरापासून, सन्मार्गापासून दूर नेतात. माणसाची दुष्कर्मे माणसाला मृत्यूनंतर भयंकर अशा अंध:कार लोकात घेऊन जातात व विविध प्रकारच्या यातना भोगायला लावतात. इतकेच नव्हे, तर अनेक प्रकारच्या प्राण्यांच्या योनींमध्ये माणसाच्या आत्म्याला जन्म घ्यायला लावतात. या प्राण्यांच्या योनीतही त्या आत्म्याला सुख लाभत नाही. दुष्कर्मांमुळे माणसाचा आत्मा हजारो-हजारो वर्षे यातना भोगत राहतो.

दुष्कर्मे करणाऱ्या घराण्यामध्ये पिशाच्चलोकांतील आत्मे जन्माला येतात. गुंड प्रवृत्तीची मुले जन्माला येतात. गुन्हेगारी प्रवृत्तीची मुले जन्माला येतात. यामुळे संपूर्ण घराण्याचे जीवन उद्ध्वस्त होते.

**सत्कर्म देव आहे, दुष्कर्म दानव आहे.** सत्कर्मामुळे सुख प्राप्त होते. मृत्यूनंतर आत्म्याला सद्गती प्राप्त होते. दुष्कर्मामुळे क्लेश होतात. जीवन दु:खमय होते. मृत्यूनंतर

यातनालोकात जावे लागते. कर्माचे परिणाम फक्त मानवालाच भोगावे लागतात असे नव्हे, तर पशू, पक्षी, प्राणी यांनाही भोगावे लागतात. अर्थात, ज्या पशू, पक्षी, प्राण्यांना कर्माचे परिणाम भोगावे लागतात, असे पशू, पक्षी, प्राणी हे पूर्वजन्मीचे मानव असतात. पाप कर्मामुळे त्यांना पशू, पक्षी, प्राणी इत्यादी योनींमध्ये जन्म मिळालेला असतो व तेथेही कर्माचे परिणाम म्हणून त्यांना यातना भोगाव्याच लागतात. इतकेच नव्हे, तर पूर्वजन्मातील कर्माप्रमाणे या पशू जन्मातही त्यांना काही कामे करावी लागतात. सर्कशीतील प्राणी हे त्याचे उत्तम उदाहरण होय !

प्राण्यांना होणारे रोग, हात-पाय तुटणे, अनैसर्गिक व तीव्र वेदनांनी युक्त असा मृत्यू, हे सर्व त्यांनी पूर्वजन्मात मनुष्य असताना केलेल्या दुष्कर्माचे परिणाम होत.

काही प्राणी ऐष आरामात राहतात. हजार-दोन हजार रुपये पगार घेणारा मनुष्य या प्राण्याची सेवा करायला नेमलेला असतो. डॉक्टर या प्राण्याच्या तब्येतीची देखभाल करत असतात. हे सर्व त्या प्राण्याने पूर्वी मनुष्य जन्मात असताना केलेल्या पुण्याईचे फळ होय ! मनुष्यरुपाने जीवन जगत असताना पुण्य केले, सत्कर्मे केली; परंतु हातून चूक घडली की जेणे करून ईश्वरी न्यायाप्रमाणे पशू योनीत जन्म घ्यावा लागला.

पशू, पक्षी, प्राणी यांच्या जीवनाकडे बारकाईने पाहिले

असता ईश्वरी न्याय व्यवस्था किती अचूकपणे कार्य करीत असते हे लक्षात येते. ईश्वराच्या राज्यामध्ये पृथ्वीतलावरील प्रत्येक प्राण्याच्या जीवनावरही अतिशय बारकाईने नियंत्रण ठेवले जाते. त्याच्या खाण्यापिण्यावरही अदृश्य सृष्टीतून नियंत्रण ठेवले जाते. अशा घटना प्रत्यक्ष पाहिल्यावर असे वाटते की, ईश्वराच्या या सृष्टीविषयी आपण अद्याप कणभरसुद्धा जाणले नाही. याविषयी माझ्या असंख्य अनुभवांपैकी काही अनुभव व काही ऐकलेल्या गोष्टी पुढे देत आहे.

एकदा एक कुत्रा भुकेने व्याकुळ होऊन हिंडताना मी पाहिला. जवळच असणाऱ्या हातगाडीवरून मी काही खाद्यपदार्थ विकत घेतले व त्या कुत्र्याला घातले; परंतु त्याने त्याकडे पाहिलेही नाही.

अशाच प्रकारच्या घटना गाय, बैल यांच्या बाबतीतही घडल्या. भात, भाजी, चपाती या सारखे अन्नपदार्थ पुढ्यात ठेवूनसुद्धा हे प्राणी अन्न का खात नाहीत हे समजत नाही. काही कुत्रे एकादशीला उपवास करतात तर काही कुत्रे कधीही मांसाहार करत नाहीत, हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. माझ्या माहितीतील एका सद्‌गृहस्थांच्या घरचा कुत्रा दूध-भात खात असे, इतर कुठल्याही पदार्थांकडे तो पहातही नसे.

असे म्हणतात की, पृथ्वीतलावरील पुरेसे पुण्य न केलेले मानव कावळ्याच्या योनीत जन्म घेतात, म्हणून कावळ्यांना

आपले पूर्वज मानण्याची प्रथा पडली आहे. कावळे हे जेथे मनुष्य वस्ती असेल तेथेच राहतात. मनुष्य वस्ती नसलेल्या ठिकाणी कावळे दिसतही नाहीत, तर अशा या कावळ्यांसंबंधीचा माझा एक अनुभव !

एकदा मी रामेश्वरला गेलो होतो. तेथील एका गेस्ट हाऊसमध्ये उतरलो होतो. गेस्ट हाऊसचा मागचा दरवाजा उघडून पाहिला. तेथे सुमारे दोनशे–तीनशे कावळे काव–काव करीत होते. माझ्याजवळील सर्व खाद्यपदार्थ मी त्या कावळ्यांना खाऊ घातले. खाद्यपदार्थ हवेत उडवल्यानंतर कावळे चोचीने झेलत व खाऊन टाकत होते. माझ्याजवळील सर्व खाद्यपदार्थ संपले. प्रसादाचे नारळ फोडून त्यातील खोबरेही कावळ्यांना खाऊ घातले; परंतु कावळ्यांची तृप्ती काही होत नव्हती. ते पुन्हा पुन्हा खायला मागत होते.

माझ्याबरोबर सुरेश नावाचा एक मित्र होता. मी त्या मित्राला म्हणालो, ''मिळतील तेवढ्या इडल्या घेऊन ये. आपण कावळ्यांना इडल्या खायला देऊ !'' माझ्या सांगण्याप्रमाणे मित्र बाजारात गेला व सुमारे दोनशे–तीनशे रुपयांच्या इडल्या घेऊन आला. सुमारे दोन मोठ्या प्लॅस्टिकच्या पिशव्या भरून इडल्या त्याने आणल्या होत्या.

मी वर्तमानपत्रामध्ये सर्व इडल्या ठेवून त्या कावळ्यांसमोर नेऊन ठेवल्या. कावळ्यांना खाणे सोयीचे व्हावे म्हणून थोड्या–

थोड्या अंतरावर वर्तमानपत्रांवर इडल्या ठेवल्या होत्या. अशा प्रकारे सर्व अंगणभर इडल्या ठेवून मी दरवाजात उभा राहिलो व कावळ्यांकडे पाहू लागलो.

काव-काव करीत शेकडो कावळे त्या इडल्यांच्या जवळ आले, परंतु इडल्यांपासून काही अंतरावर ते थांबले. कुठली तरी शक्ती त्यांना इडल्या खाऊ देत नव्हती. ते इडल्यांकडे रोखून बघत, जवळ जात; पण खाऊ शकत नव्हते. हा सर्व प्रकार मी दरवाजात उभा राहून पहात होतो. १५-२० मिनिटांनंतर कावळ्यांनी इडल्यांचा नाद सोडला व ते माझ्याकडे बघून कावकाव करू लागले व खायला मागू लागले.

त्या कावळ्यांसाठी मी ईश्वराची प्रार्थना केली. अचानक माझे लक्ष दुरून येणाऱ्या एका डोमकावळ्याकडे गेले. तो डोमकावळा सरळ त्या इडल्यांजवळ आला व त्याने एक छोटासा इडलीचा तुकडा उचलला व बाजूला गेला. क्षणार्धात दोनशे-तीनशे कावळ्यांनी त्या इडल्यांवर हल्ला चढविला व सर्व इडल्या फस्त करून टाकल्या. हे असे का घडले ? याचा अर्थ काय, हे मला कधीच कळले नाही. परंतु यावरून एका गोष्टीचा मात्र बोध झाला तो असा ...

'खाद्यपदार्थ जरी समोर आले, तरी ईश्वरी इच्छेशिवाय प्राणी ते खाऊ शकत नाहीत !'

मी एक अशी गाय पाहिली की, तिला भात-आमटी खाणे

आवडत असे. तिच्या डोळ्यांतून सारखे पाणी वाहत असे.

गवत खाणे तिला मुळीच पसंत नव्हते व गाईला पोटभर आमटी-भात खायला घालणे मालकाला परवडत नव्हते. नक्कीच ती गाय पूर्वजन्मी कोणीतरी स्त्री असली पाहिजे. त्या गायीकडे बघून मला कबीराची एक गोष्ट आठवते.

**कबीराची गोष्ट**

रामनामात दंग झालेले कबीर आपल्या एका मित्राच्या दुकानात नेहमी जात व त्या मित्राला म्हणत ...

''अरे बाबा ! तू माझा मित्र आहेस म्हणून सांगतो परमेश्वराची भक्ती कर ! मनुष्य जन्माचे सार्थक कर !''

दुकानाच्या गल्ल्यावर बसलेला तो मित्र कबीरांना म्हणत असे, ''ईश्वराची भक्ती करणे हे तुमच्यासारख्या आळशी लोकांचे काम आहे. पैसे कसे कमवावेत, उद्योगधंदा कसा करावा याची अक्कल तुम्हा लोकांना नसल्याने तुम्ही ईश्वराच्या नावाने पोट भरता. तुमच्यासारख्या लोकांमुळेच समाज बिघडतो.''

दोन मित्रांमध्ये असा हा संवाद वर्षानुवर्षे चालत होता. एक दिवस तो दुकानदार मृत्यू पावला.

दुकानाच्या गल्ल्यावर त्या शेठजीचा मुलगा बसू लागला. कबीरांनीही त्या दुकानात जाणे बंद केले . पाच सात वर्षांचा

काळ मध्ये निघून गेला.

एक दिवस कबीर त्या दुकानासमोर रस्त्याने चालले होते. त्यांनी पाहिले की, एका गाडीला रेडा बांधलेला होता. गाडीमध्ये भरपूर माल भरलेला होता. गाडी ओढताना रेड्याला अपार कष्ट होत होते. त्याला चालवत नव्हते. शेठजीचा मुलगा त्या रेड्याला चाबकाने फोडून काढत होता. ओझ्यामुळे रेड्याला चालता येत नव्हते. शेवटी रेडा रस्त्यातच बसला. रेडा रस्त्यातच बसला हे पाहून शेठजीचा मुलगा चिडला व रेड्याला चाबकाने जोरजोराने मारू लागला. चाबकाने मारताना शेठजीचा मुलगा त्या रेड्याला शिव्याही घालत होता.

हा सर्व प्रकार पाहून कबीराला दया आली. शेठजीच्या मुलाला दोन शब्द सांगावेत व रेड्याला मारण्यापासून परावृत्त करावे म्हणून ते त्याच्या जवळ गेले. कबीराने रेड्याकडे पाहिले. रेड्याने कबीराकडे पाहिले. कबीरांना पाहताच रेड्याच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रुधारा वाहू लागल्या. हे पाहून कबीर म्हणाले...

**''क्यूँ शेठजी अब कैसा लग रहा है ? जिस बच्चेके लिए आपने धन कमाया वही बच्चा आपको चाबुकसे मार रहा है।''**

कबीरांचे उद्‌गार व रेड्याच्या डोळ्यांतील अश्रुधारा पाहून शेठजींच्या मुलाने कबीरांना काय झाले म्हणून विचारले,

तेव्हा कबीर त्याला म्हणाले, ''अरे बाबा ! हा तुझा बाप आहे. मेल्यानंतर याला रेड्याच्या योनीत जन्म मिळाला आहे. जिवंतपणी याने भरपूर धन कमाविले. कंजूषपणे वागला, दानधर्म केला नाही. मनुष्य जन्माचे सार्थक करण्याचा विचारही केला नाही. हे सर्व त्याने तुझ्यासाठी केले. त्याने गोळा केलेल्या पैशावर आज तू सुखी आहेस व केलेल्या कर्माची शिक्षा म्हणून हा तुझ्या हातूनच चाबकाचे फटके खात आहे. तरी आता तू याला मारणे सोड व जितके दिवस हा जिवंत आहे तितके दिवस तू याला दाणावैरण पोटभर खायला घाल, म्हणजे याच्या आत्म्याचे आशीर्वाद तुला मिळतील व तुझेही भले होईल.''

शेठजीच्या मुलाला कबीरांचा हा उपदेश पटला नाही. तो कबीरांना म्हणाला,

''तुम्हाला काहीच कामधंदा नाही, म्हणून लोकांना उपदेश करीत फिरता ! जा ! कामाला लागा ! गाडीला जुंपण्यासाठीच मी हा रेडा विकत घेतला आहे. याला काय फुकट खाऊ घालू म्हणता? चाबकाचे फटके मारून नाही उठला तर त्याला लोखंडी सळई तापवून डाग देईन. बघतो कसा उठत नाही ते !'' असे म्हणून त्याने त्या रेड्याला जोरजोराने मारायला सुरुवात केली व कबीरांना तेथून निघून जाण्यास सांगितले.

ईश्वराचा न्याय हा असा असतो. आयुष्यभर कंजूषपणा

करून ज्या मुलासाठी शेठजीने धन साठविले त्याच मुलाच्या हातून शेठजीला ईश्वराने चोप देवविला व शेठजीला पश्चात्ताप करण्यास भाग पाडले.

कर्माचे फळ भोगण्यासाठी मानवाच्या आत्म्याला विविध योनीत जन्म घ्यावे लागतात, हे या गोष्टीवरून सिद्ध होते.

पृथ्वीतलावरील मनुष्य व मनुष्येतर जीवसृष्टीवर ईश्वराचे संपूर्णपणे नियंत्रण असते. जणूकाही ही सृष्टी म्हणजे ईश्वराचा एक खेळ आहे, असेही अनेकदा वाटते.

ईश्वराने मानवाला मर्यादित प्रमाणात स्वातंत्र्य दिले आहे व त्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग केल्याकारणाने मानवाला आपत्ती भोगाव्या लागतात.

**'करावे तसे भरावे' 'पेरावे तसे उगवते'** ईश्वराच्या न्यायाची ही प्रमुख सूत्रे आहेत. कर्मे चांगली असतील तर अदृश्य सृष्टीतील देवदेवता मानवाला तत्परतेने मदत करतात. कर्मे वाईट असतील, तर अदृश्य सृष्टीतील दुष्ट आत्मे तुमच्या मेंदूवर प्रभाव गाजवितात व तुम्हाला सन्मार्गाने कधीही पुढे जाऊ देत नाहीत. अपयश व दु:ख वाट्याला येते. कुठूनही मदत मिळत नाही. परिश्रम व्यर्थ होतात. मार्ग दाखविणारा कोणी भेटत नाही आणि अशा स्थितीमध्ये मनुष्य जर अहंकारी असेल, तर अदृश्य सृष्टीतून मिळणाऱ्या मदतीचे सर्व दरवाजे त्याच्याकरिता बंद होतात.

अग्निला हात लावला तर हात भाजल्याशिवाय रहात नाही. हात चुकून लावला की, मुद्दाम लावला याचा विचार अग्नि करू शकत नाही; त्याचप्रमाणे हात लावणारी व्यक्ती ही स्त्री आहे की पुरुष आहे, की लहान मूल आहे याचाही विचार अग्नि करू शकत नाही. भाजणे, जाळणे हा त्याचा स्वभावधर्म आहे. त्याचप्रमाणे त्याला जरासा स्पर्श करणाऱ्याला तो भाजतो; पण त्याला जास्त स्पर्श करणाऱ्याला तो जाळून टाकतो.

कर्माचेही तसेच आहे. साध्या कर्माचे परिणाम उशिरा होतात, तर तीव्र कर्माचे परिणाम तात्काळ दिसून येतात. हे तीव्र कर्म जाणतेपणाने घडले किंवा अजाणतेपणे घडले, तरी परिणाम जे व्हायचे ते होतातच.

तीव्र कर्म म्हणजे...

एखाद्याचा जीव घेणे, अकारण एखाद्याला सतावणे, एखाद्या सत्पुरुषाला काही कारण नसताना सतावणे किंवा सत्पुरुषाचा द्वेष करणे, याला तीव्र दुष्कर्म किंवा पाप म्हणतात.

एखाद्याचा जीव वाचविणे, स्वत:चे प्राण धोक्यात घालून दुसऱ्याचे प्राण वाचविणे, खूप भूक लागलेल्याला, एक-दोन दिवस उपाशी असलेल्या एखाद्या मनुष्यास पोटभर जेवायला घालणे, याला तीव्र सत्कर्म असे म्हणतात.

या विषयावर प्रकाश टाकण्याकरिता किंवा हा मुद्दा नीट समजावून देण्याकरिता दोन सत्यकथा पुढे देत आहे.

**नकळत घडलेल्या गोहत्येचा परिणाम**

ही घटना हिमालय पर्वतातील एका खेडेगावामध्ये घडलेली आहे. एक मनुष्य शिकार करण्यासाठी जंगलात गेला. अरण्यामध्ये फिरत असताना त्याने पाहिले की, एक वाघ एका गाईवर झडप घालण्याच्या तयारीत आहे. ती गाय गाभण होती. गाईला वाचविण्यासाठी या शिकाऱ्याने वाघावर गोळी झाडली; परंतु ती गोळी वाघाला न लागता गाईला लागली व गाय तेथेच तडफडून मेली.

आपल्या हातून गोहत्या घडली हे पाहून शिकाऱ्याला अतिशय दु:ख झाले; परंतु त्याला काहीच इलाज नव्हता. शिकारी घरी परत आला.

काही दिवसांनी त्याच्या बायकोला दिवस गेले. तिला सातवा महिना सुरू होताच एक दिवस तिच्या पोटात दुखू लागले व काही उपचार करण्याच्या अगोदरच शिकाऱ्याची पत्नी मरण पावली.

काही दिवसांनंतर शिकाऱ्याने दुसरे लग्न केले. वर्षा-दीड वर्षात दुसऱ्या पत्नीला दिवस गेले, परंतु तिला सातवा महिना लागताच तीसुद्धा मरण पावली.

शिकाऱ्याला हे समजेना की, आपली पत्नी गरोदर

झाल्यानंतर सातव्या महिन्यातच का मरण पावते. त्याने अनेक ज्योतिषांना याविषयी विचारले, परंतु कोठेही त्याला उत्तर मिळाले नाही.

अशा प्रकारे त्या शिकाऱ्याच्या चार बायका गरोदरपणात वारल्या. एक दिवस आपल्या काही मित्रांबरोबर तो परत शिकारीला गेला. अरण्यात फिरत असताना त्याला एका गुहेमध्ये एक तपस्वी साधू ध्यानस्थ बसलेले आढळले.

तपस्वी साधूला पाहताच या सर्वांना आपण शिकारीला आलो आहोत याचा विसर पडला व त्या तपस्वी साधूजवळ सगळे जाऊन बसले.थोड्या वेळाने त्या तपस्वी साधूची समाधी उतरली व त्याने या सर्वांची चौकशी केली. सर्वांनी आपला परिचय त्याला दिला.

शिकाऱ्याने त्या साधूला विचारले, ‘‘माझी आतापर्यंत चार लग्ने झाली, परंतु माझ्या चारही बायका गरोदरपणात सातव्या महिन्यात मृत्यू पावल्या याचे कारण काय व यावर उपाय काय ?’’

त्या तपस्वी साधूने दोन मिनिटे डोळे मिटून ध्यान केले व नंतर तो त्या शिकाऱ्याला म्हणाला, ‘‘काही वर्षांपूर्वी तू शिकारीला गेला असताना एका वाघाला पाहून गोळी झाडलीस व ती गोळी एका गाभण गाईला लागली व ती मरण पावली. गोहत्येचे तीव्र पातक तुला लागले आहे. तुझ्या हातून गाभण

गाईची हत्या झाल्याकारणाने तुझी पत्नी गरोदर होऊन तिला सातवा महिना लागताच ती मृत्यू पावते, कारण गाय जेव्हा मेली तेव्हा गाईलाही सातवा महिना होता.''

अनवधानाने हातून घडलेल्या गोहत्येचे भयंकर परिणाम झालेले पाहून त्या सर्व शिकाऱ्यांनी आयुष्यभर कधीही शिकार न करण्याची प्रतिज्ञा केली व साधूला नमस्कार केला.

शिकाऱ्याने विचारले, ''मी पाचवे लग्न केले तर बायको व मूल जगण्यास काय करावे लागेल ? या पातकातून माझी कशी सुटका होईल ?''

तपस्वी साधूने उत्तर दिले, ''तुझ्या हातून गोहत्येचे तीव्र पातक घडले आहे, याला काही उपाय नाही.'' असे म्हणून त्या साधूने त्या सर्व शिकाऱ्यांना जाण्याची आज्ञा केली.

ही कथा कौटुंबिक प्रारब्ध कसे असते यावर चांगलाच प्रकाश टाकते.

**'नवऱ्याचे कर्म बायकोला नडते, आई–वडिलांचे कर्म मुलांना नडते**' असे म्हटले जाते, ते अगदी खरे आहे.

नवऱ्याच्या तीव्र कर्माचे परिणाम बायकोला भोगावे लागले हे आपण या कथेत पाहिले. तीव्र कर्माचे परिणाम पुष्कळ वेळा जो तीव्र दुष्कर्म करतो त्याला याच जन्मी भोगावे लागतात असेही आढळून आले आहे. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या तीव्र दुष्कर्माचे परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात असेही

आढळून आले आहे. तीव्र दुष्कर्माचे परिणाम कसे होतात व त्यामुळे कुटुंबाची कशी वाताहत लागते याच्या आणखी चार कथा पुढे देत आहे.

### सिद्धपुरुषाला छळण्याचे परिणाम

### एक

कणकवलीमध्ये श्री भालचंद्र महाराज एका झाडाखाली तपस्या करत होते. एक मनुष्य त्यांचा खूप द्वेष करायचा. त्यांना ढोंगी म्हणायचा. एक दिवस रागाच्या भरात त्याने श्री भालचंद्र महाराजांना लाथ मारली. श्री भालचंद्र महाराज मौनी तपस्वी होते. मौन धारण करून त्यांनी सुमारे पन्नास वर्षे कणकवलीमध्येच तपश्चर्या केली.

'विनाशकाले विपरीत बुद्धी' या न्यायाने तो मनुष्य भालचंद्र महाराजांचा तिरस्कार करीत असे. एक दिवस अनेक लोक श्री भालचंद्र महाराजांच्या पाया पडत आहेत हे पाहून तो तेथे गेला व श्री भालचंद्र महाराजांच्या पाया पडणाऱ्या त्या सद्भक्तांना म्हणाला...

''या नागड्याच्या पाया पडून तुमचे भले होणार आहे काय?'' (श्री भालचंद्र महाराज दिगंबर अवस्थेत रहात असत.)

''मी यांना लाथ मारतो बघा !'' असे म्हणून त्याने श्री भालचंद्र महाराजांना लाथ मारली.

त्यानंतर काही दिवसांनी त्या माणसाच्या त्याच पायाला रोग झाला. तो पाय सुजला, फुटला, त्यातून रक्त-पू वाहू लागले. यावर उपचार करण्यासाठी त्याने आपले घरदार, शेतजमीन सर्व काही विकले, परंतु काहीही उपयोग झाला नाही. खूप ताप, भयंकर वेदना व दुर्गंधी यामुळे त्याला झोप येत नसे. हळूहळू रोग पूर्ण शरीरभर पसरला. सर्व अंगाला सूज आली. जागोजागी अंग फुटले. अशा स्थितीत अनेक वर्षे त्याला काढावी लागली. जमीनजुमला, घरदार सर्व काही विकावे लागल्याने संपूर्ण अवकळा आली व अशा स्थितीतच त्याचा अंत झाला.

**दोन**

ही घटना सुमारे शंभर वर्षांपूर्वीची आहे. श्री अक्कलकोट स्वामींचे शिष्य श्री देव मामलेदार. श्री देव मामलेदार यांचे शिष्य श्री घाग महाराज.

श्री घाग महाराज हे महान तपस्वी होते. हिमालयातील आपली तपस्या आटोपून ते हिंदुस्थानभर भ्रमण करीत संगमेश्वर येथे आले. संगमेश्वर येथील एका धर्मशाळेत ते उतरले. तो काळ इंग्रजसत्तेचा होता. रेव्हेन्यू डिपार्टमेंट व पोलिस डिपार्टमेंट त्या काळात एकच होते.

श्री घाग महाराज त्या धर्मशाळेमध्ये आपल्या आसनावर बसलेले होते. इतक्यात तेथे एक पोलिस आला व घाग

महाराजांच्या अंगावर खेकसला व आत्ताच्या आत्ता येथून उठून चालायला लाग, असे म्हणाला..

श्री घाग महाराज म्हणाले...

''मला माहीत आहे की, मामलेदार साहेब येत आहेत व मी त्यांचीच वाट बघत येथे बसलेला आहे.'' हे ऐकून तो पोलिस खवळला व श्री घाग महाराजांना हुसकावून लावण्यासाठी त्याने त्यांच्या आसनाला हात लावला व आसन ओढू लागला. इतक्यात मामलेदार तेथे आले. मामलेदार पोलिसाला म्हणाले...

''अरे त्या साधूला बसू दे तिथे ! त्याला त्रास देऊ नकोस !''

मामलेदार साहेब आपल्या खुर्चीवर स्थानापन्न झाले. इतक्यात श्री घाग महाराजांनी आपल्या झोळीतून विभूती काढली व ती मामलेदारांच्या दिशेने हवेत भिरकावली.

त्याच क्षणी तेथे एक लिंबू येऊन पडले. श्री घाग महाराज मामलेदार साहेबांना म्हणाले, ''साहेब आपल्यावर एका व्यक्तीने मूठ मारली आहे. हे लिंबू जर आपल्याला लागले असते, तर आपण तात्काळ खलास झाला असता.''

श्री घाग महाराज पुढे म्हणाले,

''ज्या मांत्रिकाने ही मूठ आपल्याला मारली आहे तो मांत्रिक अमुक-अमुक ठिकाणी असून जोपर्यंत हे लिंबू परत

जात नाही तोपर्यंत तो मांत्रिक तेथेच बसून राहील. आपण पोलिसांना पाठवून त्या मांत्रिकास पकडून आणावे.''

मामलेदार साहेबांना या सर्व गोष्टीचे आश्चर्य वाटले. श्री घाग महाराजांनी सांगितलेल्या पत्त्यावर त्यांनी ताबडतोब दोन पोलिस पाठविले व त्या मांत्रिकाला पकडून आणले. त्याने गुन्हा कबूल केला.

श्री घाग महाराजांनी त्या मांत्रिकास मूठ परत घेण्यास भाग पाडले. त्याचप्रमाणे श्री घाग महाराजांनी त्याची विद्या नष्ट करून टाकली. त्याची सर्व विद्या नष्ट करून टाकल्यानंतर श्री घाग महाराजांनी मामलेदाराला सांगून पोलिसांतर्फे त्या मांत्रिकाला चोप द्यायला लावला व जगाला घाबरवणाऱ्या त्या मांत्रिकाचा अतिसामान्य मनुष्य बनवून त्याला तेथून हाकलून लावले.

मामलेदार साहेबांनी प्राण वाचविल्याबद्दल श्री घाग महाराजांचे आभार मानले.

मूठ मारणे म्हणजे मंत्रविद्येने एखाद्याचा प्राण घेणे. मूठ मारण्याच्या विद्येत सिद्ध असलेला मांत्रिक एक लिंबू मारण मंत्राने भारतो व ते हवेत भिरकावतो. ताशी पाचशे मैल वेगाने हे लिंबू आपल्या बळीच्या दिशेने जाते. हे लिंबू चर्मचक्षूंना दिसत नाही. सिद्धपुरुषांच्या दिव्यदृष्टीलाच हे लिंबू दिसते. या लिंबासोबत एक भयंकर नरभक्षक राक्षसी शक्ती प्रवास करीत असते. ही राक्षसी शक्ती ज्याच्यावर मूठ मारली आहे त्याच्या

शरीरातून काळीज काढून घेते व त्या लिंबासहित मांत्रिकाकडे परत जाते.

एकंदरीत मुठीचा प्रकार हा असा असतो. त्यासाठी तीन धारेचे लिंबू मांत्रिक वापरतात व काही टाचण्या मंत्रविद्येने अभिमंत्रित करून राक्षसी दुष्ट शक्तींना त्या लिंबात प्रवाहित करतात.

श्री घाग महाराजांनी मामलेदार साहेबांचे प्राण वाचविले. श्री मामलेदार साहेबांनी घाग महाराजांना नमस्कार करून त्यांचे आभार मानले.

हे सर्व पाहून ज्या पोलिसाने श्री घाग महाराजांना त्रास दिला होता तो घाबरत-घाबरत पुढे आला. त्याच्याकडे पाहून श्री घाग महाराज म्हणाले, ''तुझ्या साहेबाचे प्राण वाचविण्यासाठी मी येथे बसलेला असताना तू मला अकारण त्रास दिलास, शिव्या घातल्यास, दमदाटी केलीस व शेवटी माझ्या आसनाला हात लावलास. माझे आसनच खेचलेस. तुझ्या या कर्माचे परिणाम तुला भोगावेच लागतील.''

त्यानंतर आठ दिवसातच त्या पोलिसाची नोकरी गेली व नंतर त्याचे खूप हाल झाले.

**तीन**

श्री तैलंगस्वामी नावाचे एक महासिद्ध काशीमध्ये रहात होते. ते कित्येक दिवस उपाशी रहात व एकदा खायला लागले

की, पाच-दहा मडकी दही फस्त करीत.

एकदा एका दुष्ट माणसाने एका मडक्यामध्ये चुना भरला व स्वामीजी दही खा, असे म्हणून तो चुना त्यांना खायला दिला.

श्री तैलंगस्वामींनी ते मडके भरून चुना खाल्ला. काही क्षणांतच तो मडकेभर चुना देणारा तडफडू लागला, 'स्वामीजी मला वाचवा. स्वामीजी मला वाचवा.' असे ओरडू लागला.

चुना श्री तैलंगस्वामीनी खाल्ला, परंतु वेदनेने चुना देणारा तडफडू लागला. त्याची तडफड पाहून श्री तैलंगस्वामी त्याला म्हणाले...

''तू जेवढा चुना मला खायला घातलास, त्याच्या एक शतांश चुना खाल्यानंतर जेवढ्या वेदना होतात, तेवढ्याचाच मी तुला अनुभव देत आहे. उरलेल्या नव्याण्णव शतांश वेदना मी पचवून टाकल्या आहेत. आता या उरलेल्या नव्याण्णव शतांश वेदनांचे काय करू ते सांग !''

यावर चुना देणारा म्हणाला, ''स्वामीजी मला माफ करा. मी मरेपर्यंत तुमची सेवा करीन; पण या वेदना मला सहन होत नाहीत.''

यावर तैलंगस्वामी म्हणाले, ''तू तीव्र पापकर्म केले आहेस. हे तुझे पापकर्म तुला भोगावेच लागेल. महिन्यातून एक दिवस तुला भयंकर वेदना सहन कराव्या लागतील. असे तुला या

जन्मी तसेच पुढील अनेक जन्मांत भोगावे लागेल.''

आता तुझे वय चौतीस आहे. आजपासून महिन्यातून एक दिवस तुला भयंकर वेदना सहन कराव्या लागतील व तुझा मृत्यूही या पोटदुखीच्या वेदनेतूनच होईल.

वयाच्या चौतिसाव्या वर्षी तू हे तीव्र पापकर्म केल्याकारणाने पुढील प्रत्येक जन्मात तुला चौतिसावे वर्ष लागले की, महिन्यातून एकदा भयंकर वेदना सहन करणे तुला भाग पडेल व तुझा मृत्यूही भयंकर पोटदुखीनेच होईल. अशा प्रकारे अनेक जन्म हे कर्म भोगल्यानंतर एक दिवस हे कर्म संपून जाईल व मगच तुझी यातून सुटका होईल. अशा प्रकारे त्या माणसाला कर्मांच्या गंभीर परिणामांची जाणीव देऊन श्री तैलंगस्वामींनी आपल्या पायाचे तीर्थ त्याला प्यायला दिले. श्री तैलंगस्वामींनी दिलेले तीर्थ प्राशन करताच त्या माणसाच्या वेदना तात्काळ नष्ट झाल्या व तो ठणठणीत बरा झाला.

या घटनेनंतर तो श्री तैलंगस्वामींचा एकनिष्ठ भक्त बनला. स्वामींची मनोभावे सेवा करू लागला. त्याच्याकडे पाहून स्वामीजी त्याला अधून-मधून म्हणत की, तू जरी मनापासून सेवा करीत असलास तरी तू केलेल्या कर्माचे परिणाम तुला भोगावेच लागतील. तू करीत असलेल्या सेवेचे फळ म्हणून तुझ्या अंत:करणात ईश्वरभक्ती राहील, परंतु कर्माचे परिणाम

कोणालाही टाळता येत नाहीत.

**चार**

महायोगी लाहिरी महाशय बनारसमध्ये रहात होते. त्यांच्या घरासमोरून एक रस्ता जात होता. त्या रस्त्याला लागून लाहिरी महाशयांच्या घराच्या समोर एक बैठे सपाट छप्पर असलेले घर होते. त्या घराचा मालक आपल्या घराच्या छपरावर चढायचा व छतावर उभा राहून लाहिरी महाशयांच्या घराकडे तोंड करून लघवी करायचा.

श्री लाहिरी महाशयांनी अनेक वेळा तू असे करू नकोस म्हणून प्रेमाने सांगितले पण त्याने ऐकले नाही.

काही दिवसानंतर त्या घरमालकाला, तसेच घरात राहणाऱ्या सर्वांना चित्रविचित्र त्रास होऊ लागले व शेवटी ते घर सोडून त्यांना जाणे भाग पडले.

या चारही कथा आपल्याला एकच गोष्ट सांगतात. मानवाचे कर्म मानवाला कधीही सोडत नाही.

कर्माचे परिणाम मानवाला भोगावेच लागतात. पुष्कळ वेळा एका कर्माचे परिणाम अनेक जन्म भोगावे लागतात, हे श्री तैलंगस्वामींच्या कथेवरून लक्षात येते. याकरिता मानवाने नेहमी सत्कर्म करीत राहायला हवे व कधीही दुष्कर्मे करू नयेत, कारण दुष्कर्माचे परिणाम अनेक जन्म भोगावे लागतात.

हे लिहीत असताना दुष्कर्माचे परिणाम किती भयंकर होतात, याची आणखी एक गोष्ट आठवली ती येथे देत आहे. ही कथा वाचून वाचकांनी विचार करावा की, साध्या चेष्टामस्करीचे रूपांतर जर भयंकर तीव्र दुष्कर्मात होऊन त्याचे भयंकर परिणाम जर अनेकांना भोगावे लागतात, तर जे लोक हत्या, आतंकवादासारखी दुष्कर्मे करतात त्यांचे काय होत असेल ?

ही घटना सुमारे तीस-चाळीस वर्षांपूवी रत्नागिरी येथे घडलेली आहे. रत्नागिरीतील भैरीच्या मंदिरासमोरील एका विशाल वृक्षाखाली एक वेडसर म्हातारा बसलेला असायचा. अनेक लोक जाता येताना त्याची चेष्टामस्करी करायचे. तो म्हाताराही लोकांनी केलेली चेष्टामस्करी मनावर घ्यायचा नाही. उलट त्यांची चेष्टामस्करी करणाऱ्यांचा एक ग्रुपच तयार झाला. हळूहळू हा ग्रुप वाढत गेला व सुमारे साठ-सत्तर लोक या ग्रुपमध्ये एकत्रित झाले.

एकदा हे साठ-सत्तर लोक एकत्र येऊन त्या म्हाताऱ्याची चेष्टामस्करी करत त्याच्या जवळ बसलेले होते. चेष्टामस्करी करता-करता एकाने त्या वेड्या म्हाताऱ्याला उद्देशून म्हटले...

''आपण या म्हाताऱ्याचे लग्न लावून देऊ या !''

त्या माणसाच्या या प्रस्तावाला सर्वांनी अनुमोदन दिले व अमावास्येच्या दिवशी त्याचे लग्न लावून देण्याचे ठरविले.

एका माणसाने लग्नाच्या वऱ्हाडासाठी आपला ट्रक देण्याचे ठरविले. गावात एक वेडी आलेली होती. तिला पकडून आणायचे व तिच्याबरोबर या वेड्याचे लग्न लावायचे, असे सर्वांनी ठरविले.

वेडसर दिसणाऱ्या या वृद्ध माणसाने असे काहीतरी करू नका, याचे परिणाम चांगले होणार नाहीत, असे अतिशय गोड भाषेत समजावून सांगितले; परंतु त्या सर्व माणसांनी ठरविले की, अमावास्येच्या दिवशी एका विशिष्ट ठिकाणी सर्वांनी एकत्र जमायचे, ट्रकमध्ये बसून सर्वांनी त्या वेड्या स्त्रीला शोधून काढायचे. सर्वांनी मिळून त्या वेड्या स्त्रीला पकडून ट्रकमध्ये बसवायचे व त्या स्त्रीला भैरीच्या देवळाजवळ आणून तिचे व या वेड्याचे लग्न लावून द्यायचे.

सर्वांनी मिळून ठरविल्याप्रमाणे अमावास्येच्या दिवशी सुमारे साठ-सत्तर लोक एकत्र जमले. ट्रकमध्ये बसून त्यांनी त्या वेड्या स्त्रीचा शोध घेतला. वेड्या स्त्रीला उचलून त्यांनी ट्रकमध्ये बसविले व सर्वजण त्या भैरीच्या मंदिराजवळ आले.

भैरीच्या मंदिराजवळ सर्वजण ट्रकमधून खाली उतरले. त्यांनी त्या वेडीला फुलांच्या मुंडावळ्या बांधल्या. काही लोकांनी त्या वेड्या म्हाताऱ्याला धरले व आम्ही आता तुझे लग्न वेडीबरोबर लावून देतो, असे म्हणाले.

या सर्व लोकांतून कशीबशी स्वत:ची सुटका करून घेऊन

म्हाताऱ्याने भैरीच्या मंदिरात प्रवेश केला व तो तेथेच गुप्त झाला. तो कोठे गेला हे कोणालाच कळले नाही. सर्व लोकांनी मंदिर व मंदिराच्या आजूबाजूचा परिसर पिंजून काढला, परंतु तो म्हातारा त्यांना कोठेही मिळाला नाही. तास-दोन तास सर्वजण त्याला शोधत होते; परंतु तो म्हातारा सापडला नाही. शेवटी कंटाळून सर्वांनी आपआपल्या घरी परतायचे ठरविले.

त्या वेडीला तेथेच सोडून सर्वजण ट्रकमध्ये बसले व रत्नागिरीच्या दिशेने जाऊ लागले. इतक्यात त्या ट्रकचे स्टेअरिंग व ट्रकचे व्हील यांना जोडणारा रॉड तुटला व ट्रक रस्त्याच्या कडेला असलेल्या एका खोल खड्यात पडला. या अपघातात त्या ट्रकमधील अनेक लोक मेले व बाकीचे सर्व जखमी झाले. ट्रकची पूर्ण वाताहत लागली.

या घटनेवरून असे वाटते की, भैरीच्या मंदिराजवळ बसणारा वेडा, वेडा नव्हता. गूढ गुप्त विद्यांची साधना करणारा तो एक तांत्रिक साधक होता व भैरवसिद्धीची साधना तो तेथे करत होता. अनेक पिशाच्चे त्याला वश होती. असो, चेष्टामस्करींचा भयंकर दुष्परिणाम झाला, हे मात्र खरे !

कर्माचे परिणाम विविध प्रकारे कसे भोगावे लागतात हे आपण या अध्यायात पहात आहोत. कुठल्या कर्माचे परिणाम कसे होतील व काय होतील हे कोणालाच कळत नाही. माणसाचे कर्म माणसाला परिणामाच्या दिशेने सतत पुढेपुढे नेत राहते व

कर्माचे परिणाम आत्म्याची पाठ कधीही सोडत नाही. आत्मा कुठल्याही योनीत जन्माला गेला तरी पूर्वकर्म त्याला भोगावेच लागते. काही घटना अशा घडतात की, त्याची काहीच संगती लागत नाही; परंतु कर्माच्या निष्कर्षावर जेव्हा या गोष्टींना आपण घासून पाहतो तेव्हा घटनांचे अर्थ कळू लागतात. कर्माचे परिणाम कळू लागतात. ईर्षा, द्वेष, मत्सराचे दुष्परिणाम कळू लागतात. सर्व सृष्टीवर असणारे ईश्वराचे नियंत्रण कळू लागते व या सर्व माया बाजारात जीवात्मा विविध योनींमधून कसा भटकत असतो हेही लक्षात येते.

सुमारे तीस वर्षांपूर्वी आंध्र प्रदेशामध्ये अशीच एक घटना घडली. ती घटना वाचकांना सांगावीशी वाटते. ती घटना वाचकांना कर्म, जीवात्म्याचा कसा पाठपुरावा करते हे लक्षात आणून देईल.

आंध्र प्रदेशातील एका रस्त्यावर रेल्वे क्रॉसिंगवर अनेक वाहने, मोटारसायकल व बरेच लोक उभे होते. सर्वजण रेल्वे तेथून केव्हा जाते याची वाट बघत होते. इतक्यात तेथे एक भयंकर साप आला. साप विषारी होता. तेथे जमलेल्या लोकांनी त्या सापाला दगडांनी ठेचून मारले व एका काठीने उचलून रस्त्यापलीकडील शेतामध्ये नेऊन टाकले.

इतक्यात आकाशातून एक घार आली. तिने आपल्या पायाच्या पंजामध्ये त्या सापाला उचलले व घार निघून गेली.

सर्वजण पुन्हा ट्रेनची प्रतीक्षा करीत उभे राहिले. इतक्यात स्कूटरवरून  एक मनुष्य तेथे आला. तोही सर्वांत शेवटी उभा राहिला. त्याने स्कूटर बंद केली. डोक्यावरील हेल्मेट काढले व घाम पुसू लागला.

सर्पाला उचलून घार आकाशात उडाली होती. सर्प मेलेला नव्हता तो फक्त बेशुद्ध झालेला होता. घार आकाशात उडाली तेव्हा लागलेल्या जोरदार वाऱ्याने तो शुद्धीवर आला. घारीच्या पंजातून तो निसटला व आपला घाम पुसत असणाऱ्या स्कूटरस्वाराच्या डोक्यावर पडला. भयंकर चिडलेल्या त्या सर्पाने स्कूटरस्वाराच्या मानेला कडकडून चावा घेतला. तत्क्षणीच स्कूटरस्वार खलास झाला. तेथे जमलेल्या लोकांनी पुनश्च त्या सर्पाला मारले व नीट मेला याची खात्री केली व दूर शेतात नेऊन टाकले . दुसऱ्याच क्षणी आकाशातून घार आली व सर्पाला घेऊन परत आकाशात निघून गेली. तेवढ्यात ट्रेन आली. सर्वजण आपआपल्या दिशेने निघून गेले. स्कूटरस्वाराचे प्रेत पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतले.

ही  घटना बरेच काही सांगून जाते. कर्माच्या निष्कर्षाप्रमाणे या घटनेचे अर्थ पुढीलप्रमाणे लागतात व ईश्वराचे सर्व प्राणिसृष्टीवर कसे नियंत्रण आहे हे सिद्ध होते.

कर्मसिद्धांताप्रमाणे स्कूटरस्वाराचे व त्या सर्पाचे पूर्वजन्मी भयंकर वैर होते. त्या स्कूटरस्वाराची हत्या करण्याचे कर्म

त्याला करायचे होते, म्हणून ते कर्म पूर्ण करण्यासाठी त्या रस्त्यावर तो सर्प येत होता. स्कूटरस्वार तेथे येणार होता व काही वेळ तेथे थांबणार होता, हे कर्माच्या कायद्याप्रमाणे ठरलेले होते. त्या स्कूटरस्वाराची हत्या केल्यानंतर त्या सर्पाचा मृत्यू ओढवणार होता व सर्प योनीतून त्याची सुटका होणार होती. सर्प फक्त काही मिनिटे तेथे अगोदर पोहोचला. त्यामुळे तेथे जमलेल्या लोकांनी त्याला ठेचून काढले. कदाचित लोकांनी त्या सर्पाला दगडाने ठेचणे हेही त्या सर्पाचे पूर्वजन्मातील कर्माचे फळ असावे. बेशुद्ध झाल्यानंतर घार त्याला आकाशात भक्ष्य म्हणून घेऊन गेली. येथेही कर्मसिद्धान्ताप्रमाणे तो सर्प घारीचे भक्ष्य होणार होता. म्हणजे सर्प माणसाला मारणार होता व घार सर्पाला भक्षण करणार होती. भक्षण करण्यासाठी घार सर्पाला घेऊन आकाशात उडाली; परंतु जणू काही ईश्वर म्हणाला...

**''अरे सर्पा, पूर्वजन्मातील सूड उगविण्याचे व त्या स्कूटरस्वाराला ठार करण्याचे तुझे कार्य अजून बाकी आहे. हे कार्य पूर्ण केल्याशिवाय तू मरणे बरोबर नाही, सर्प योनीतून तुझी सुटका होणार नाही.''**

ईश्वराने असे म्हणताच सर्प जिवंत झाला. त्याचे कार्य त्याला आठवले व तो भयंकर चिडला. इतक्यात स्कूटरवाला तेथे येऊन पोहोचला. घारीच्या पंजातून ईश्वराने बरोबर त्या

स्कूटरवाल्याच्या डोक्यावर सर्प पडेल अशी व्यवस्था केली. सर्प स्कूटरवाल्याच्या मानेला कडकडून चावला. स्कूटरवाला तात्काळ मृत्युमुखी पडला. सर्पाचे कार्य संपले. लोकांनी दगडाने त्याला ठेचून मारले. सर्प योनीत असणाऱ्या त्या जीवाला ईश्वराने त्याच्या कर्माचे फळ म्हणून दगडाने ठेचून मारण्याची शिक्षा केली व कर्माचे फळ म्हणून तो सर्प घारीचे भक्ष्य बनला. या सत्यकथेवरून एक गोष्ट नक्की होते की, ईश्वराचे संपूर्ण सृष्टीवर प्रचंड नियंत्रण आहे. सर्व जीवकोटीवर त्याचे संपूर्ण नियंत्रण आहे व सृष्टीमध्ये घडणारी प्रत्येक घटना ईश्वरनियंत्रित असते. या अध्यायाचे सार थोडक्यात सांगायचे झाल्यास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**कर्माचे परिणाम प्रत्येक जीवाला भोगावेच लागतात. मग तो मनुष्य असो अथवा प्राणी असो. योगी, तपस्वी, सिद्ध यांनाही कर्माचे परिणाम भोगणे चुकत नाही. फक्त या लोकांच्या बाबतीत फरक इतकाच होतो की, त्यांना कर्माचे परिणाम आपल्या सोयीनुसार भोगता येतात. ईश्वरभक्ती, दान व परोपकार यामुळे कर्माच्या परिणामाची तीव्रता कमी करता येते.**

❋ ❋ ❋

# ११. सामूहिक प्रारब्ध

मानवाच्या अनेक पूर्वजन्मांतील असंख्य कर्मांचे एक बंडल अथवा गाठोडे तयार होते. या गाठोड्याला **संचित** असे म्हणतात.

संचिताच्या गाठोड्यातून मानव या जन्मी जे काही भोगणार असतो, त्याला **प्रारब्ध** असे म्हणतात.

या जन्मी मनुष्य जे काही कर्म करतो, त्या कर्माला **क्रियामाण** कर्म असे म्हणतात. हे क्रियामाण कर्म संचितात जमा होत असते व संचिताचे गाठोडे सतत फुगत असते.

मन निर्विकल्प झाल्यानंतर ईश्वराशी एकरूप होते व मन ईश्वराशी एकरूप झाल्यानंतर क्रियामाण कर्म जे संचितामध्ये जमा होत असते ती क्रिया थांबून जाते व पुढील एक-दोन जन्मांमध्ये सर्व संचित नष्ट होते व मनुष्याला मोक्ष प्राप्त होतो. ही सर्व प्रक्रिया ईश्वरभक्तीने घडते, म्हणून ईश्वरभक्ती हे मोक्षाचे सर्वोत्कृष्ट साधन मानले गेले आहे.

## मानवाचे चार देह

**१) स्थूलदेह –** स्थूलदेह हा हाडामांसाचा बनलेला असून, याची निर्मिती मातेच्या गर्भामध्ये होते. हा स्थूलदेह एक वाहन असून, या वाहनात बसून जीवात्म्याने परमेश्वराच्या दिशेने प्रवास करावा अशी परमेश्वराची इच्छा असते. ईश्वरप्राप्तीचे सर्वोत्कृष्ट साधन म्हणून आत्म्याला मनुष्य जन्म ईश्वर देत असतो. हा मनुष्य जन्म मिळावा म्हणून पिशाच्च सृष्टीतील कोट्यावधी आत्मे हजारो वर्षे ईश्वराची प्रार्थना करीत असतात. म्हणून मनुष्य जन्माला मुक्तीचे द्वार, असे म्हटले जाते.

पिशाच्चसृष्टीमध्ये हजारो वर्षे विविध प्रकारच्या यातना भोगणाऱ्या एखाद्या जीवात्म्याला (पिशाच्चाला) जेव्हा त्याचा कर्मभोग संपला व आता त्याला मनुष्य जन्म मिळणार हे कळते तेव्हा त्याला पराकोटीचा आनंद होतो. मनुष्य जन्म मिळाल्यानंतर ईश्वरभक्ती करून आपण मोक्ष प्राप्त करू, असे त्याला वाटते, परंतु पृथ्वीतलावर जन्म झाल्यावर तो सर्व काही विसरतो.

पिशाच्चलोक, पितृलोक, प्राणी, पशू, पक्षी अशा सर्व स्तरांवरून पृथ्वीवर मनुष्यरूपाने जीव जन्माला येत असतात. त्यामुळे पृथ्वीतलावर विविध प्रकारच्या चांगल्या-वाईट प्रवृत्तींची-स्वभावांची रेलचेल झालेली दिसून येते.

कंजूष, स्वार्थी, दुष्ट, इतरांवर सत्ता गाजविणारे असे

मानवाच्या स्वभावांचे विविध प्रकार पृथ्वीवर आपल्याला पाहायला मिळतात. याशिवाय माणसाला अधोगतीच्या दिशेने खेचणाऱ्या असंख्य शक्ती वातावरणात असतात. त्या मानवाला चांगल्या मार्गाने जाऊ देत नाहीत.

पृथ्वीतलावरील अशा मानवाला ईश्वराच्या दिशेने वळविण्यासाठी देवलोकातून, सिद्धलोकातून, ऋषीलोकातून अनेक श्रेष्ठ महात्मे पृथ्वीतलावर जन्म घेत असतात, तसेच काही पुण्यात्मे योगमार्गात प्रगती करण्यासाठी जन्म घेतात. काही ईश्वरभक्तीच्या मार्गाने पुढे जाण्यासाठी जन्म घेतात. हे श्रेष्ठ आत्मे पृथ्वीतलावरील मानवांना ईश्वराची भक्ती करायला लावतात व ईश्वराच्या दिशेने पुढे नेण्यासाठी प्रयत्न करतात. स्थूलदेहरूपी साधनाने मानव अशा प्रकारे मुक्तीच्या दिशेने हळूहळू पुढे जातो. यामुळेच नरजन्माचे महात्म्य अनेक ग्रंथांमध्ये वर्णन केलेले आहे.

२) **सूक्ष्मदेह** – आपल्या कर्मानुसार मनुष्याचा आत्मा सूक्ष्मदेहात अदृश्य सृष्टीत कोठेतरी रहात असतो. तो जर पुण्यवान असेल, तर स्वर्गात रहात असतो व पापी असेल तर नरकात असतो. पुण्यवान असेल तर आध्यात्मात प्रगती करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म घेतो. पितृलोकातील असेल, तर आपल्या प्रारब्धाचा उर्वरित भाग भोगण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म घेतो व पापी असेल, तर आपले पापकर्म भोगण्यासाठी

पृथ्वीतलावर जन्म घेतो. हे पापकर्म भोगून संपविताना ईश्वराची भक्ती करून त्याने ईश्वराच्या दिशेने थोडेफार पुढे जावे म्हणून त्याला संधीही दिली जाते. व्यावहारिक भाषेमध्ये या सूक्ष्मदेहालाच **मनुष्याचा आत्मा** असे म्हटले जाते. सत्कर्माचे व दुष्कर्माचे फळ म्हणजे सुख-दु:ख हाच आत्मा भोगतो.

या सूक्ष्मदेहामध्ये या जन्मी भोगायचे प्रारब्ध असते. याशिवाय मन, बुद्धी, अहंकार या गोष्टीही या सूक्ष्मदेहात असतात. असा हा सूक्ष्मदेह मातेच्या गर्भामध्ये सातव्या महिन्यामध्ये प्रवेश करतो.

स्थूलदेहरूपी वाहन त्याला प्राप्त झालेले असते. प्रारब्ध कर्मानुसार विशिष्ट ग्रहस्थितीत त्याचा जन्म होतो. त्याच्या देहाला ईश्वराने एक ठराविक वर्षे इतकी आयुष्यमर्यादा दिलेली असते. तेवढ्या वर्षांमध्ये त्याने आपले प्रारब्ध भोगून काढायचे असते. प्रारब्धभोग जर कमी असेल, तर बालपणातच मृत्यू येतो व प्रारब्धभोग जर जास्त असेल, तर मनुष्य अधिक वर्षे जगतो. एकंदरीत मनुष्य जन्म हा प्रारब्धभोग भोगून संपविण्यासाठी, तसेच ईश्वराच्या दिशेने पुढे जाण्यासाठी, ईश्वरभक्ती करण्यासाठी ईश्वरानेच कृपा करून दिलेला असतो, याची जाणीव मानवाने ठेवली पाहिजे.

ईश्वराच्या दिशेने पुढे न जाता, आध्यात्मात प्रगती न करता मनुष्य जेव्हा पैशाच्या मागे लागतो, सत्तेच्या मागे लागतो,

स्वार्थ, लोभ, कंजूषपणा करतो, तेव्हा समाधान, शांती नष्ट होते. श्रीमंत मनुष्य सर्व काही आहे ! परंतु शांती, समाधान नाही म्हणून तडफडत राहतो, तर गरीब मनुष्य अनेक प्रकारच्या समस्यांनी त्रस्त-ग्रस्त होऊन जातो. या दोन्ही गोष्टी ईश्वरभक्तीच्या अभावामुळे घडतात, हे वेळीच ओळखून जर ईश्वरभक्ती केली, तर जीवात्म्याचा तोल सांभाळला जातो. अन्यथा, भयंकर परिणाम होऊ लागतात. यासाठी प्रत्येक माणसाने थोडीफार तरी ईश्वरभक्ती करणे आवश्यक आहे.

पापी माणसाचा सूक्ष्मदेह काजळाप्रमाणे काळाकुट्ट असतो, तर पुण्यवान माणसाचा सूक्ष्मदेह स्फटिकाप्रमाणे स्वच्छ व पारदर्शी असतो.

ईश्वरभक्ती, जप, नामस्मरण, साधना, सद्गुणांची जोपासना या सर्व गोष्टी आत्म्यावरील म्हणजे सूक्ष्मदेहावरील काजळी दूर करण्यासाठी करायच्या असतात. त्याने आत्मा म्हणजे सूक्ष्मदेह स्फटिकाप्रमाणे स्वच्छ होतो. अशा प्रकारे स्फटिकाप्रमाणे स्वच्छ झालेल्या आत्म्याला मुक्ती प्राप्त होते, परमेश्वराच्या साम्राज्यात प्रवेश प्राप्त होतो. मनुष्य देह धारण करून एक ठराविक आयुष्य जगण्यासाठी आत्मा पृथ्वीतलावर येतो, असे वर म्हटले आहे, तरीसुद्धा ईश्वरभक्ती करून आध्यात्मात प्रगती करणाऱ्याचे आयुष्य परमेश्वर वाढवितो व आत्म्याला शुद्ध करण्याची संधी मानवाला उपलब्ध करून देतो. एकंदरीत सूक्ष्मदेह हा असा आहे. यात

प्रारब्ध वास्तव्य करते. प्रारब्धानुसार बुद्धी होते व संतसमागमाने आत्मशुद्धी, प्रारब्धशुद्धीचा मार्ग मिळतो.

**३) कारणदेह –** कारणदेह हा सूक्ष्मदेहाहूनही अतिशय सूक्ष्म व तेजस्वी असतो. या कारणदेहामध्ये चित्त असते. या चित्तामध्ये अनेक जन्मांचे **संचित** साठवलेले असते. हा कारणदेहच अनेक जन्मांचे कारण असतो, म्हणून याला कारणदेह म्हणतात.

**४) महाकारणदेह –** महाकारणदेह हा अत्यंत शुद्ध व परमात्मस्वरूप असतो, विश्वव्यापी असतो. परमात्मा व महाकारणदेह यांच्यामध्ये एक सूक्ष्म भेद असतो. परमात्मा हा बिंब असतो तर महाकारणदेह हा त्या बिंबाचे प्रतिबिंब असते, एवढा भेद सोडल्यास परमात्म्यामध्ये व महाकारणदेहामध्ये काहीही फरक नसतो. मानव पृथ्वीतलावर कसा जन्माला येतो, कशाकरिता जन्माला येतो व त्याचे देह कसे असतात याविषयी आपण माहिती घेतली. यावरून एक गोष्ट सिद्ध होते की, परमेश्वर आत्म्याला स्वत:चा उद्धार करण्यासाठी पृथ्वीतलावर मनुष्य जन्म प्रदान करतो. आता पृथ्वीतलावर जन्माला आल्यानंतर त्याची परिस्थिती काय होते व तो कसा अडकत जातो, इकडे लक्ष टाकू या !

पृथ्वीतलावर जन्माला आल्यानंतर मानव आपण कशाकरिता जन्माला आलो हे विसरून जातो. संपूर्ण बालपण खेळण्यात

निघून जाते. थोडे वयात आल्यानंतर पैसा कमाविणे व कुटुंबाचे पोषण करणे यात निघून जाते व वृद्धावस्थेमध्ये शरीर रोगग्रस्त होते. यातूनही जो मोकळा वेळ मिळतो तो सर्व चकाट्या पिटण्यात व मनोरंजनादी साधनांमध्ये व्यतीत होतो. अशा प्रकारे एखाद्या सुखवस्तू माणसाचे आयुष्य व्यतीत होते. ईश्वराने दिलेली अनमोल संधी वाया जाते व याची शिक्षा म्हणून पुढे विविध प्रकारच्या योनींमधून जन्म-मरणरूपी चक्रात आत्मा फिरत राहतो. हे एखाद्या सुखी व सज्जन माणसाचे वर्णन आहे. या सुखी व सज्जन माणसाला इतरही अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागते.

### कौटुंबिक प्रारब्ध

ज्या कुटुंबामध्ये आपण जन्म घेतला त्या कुटुंबामध्ये जितकी माणसे असतील त्या सर्वांचे मिळून एक प्रारब्ध असते. या प्रारब्धाला कौटुंबिक प्रारब्ध म्हणतात.

कौटुंबिक प्रारब्धाच्या न्यायाप्रमाणे आई-वडिलांचे चांगले-वाईट कर्म मुलांना भोगावे लागते. नवऱ्याचे कर्म बायको मुलांना भोगावे लागते. घरातील माणसे जर स्वार्थी व संकुचित प्रवृत्तीची असतील, ईश्वरभक्ती करत नसतील, तर अनेक पिढ्या कौटुंबिक प्रारब्ध सतावत राहते.

काही कुटुंबे शापित असतात. अशा शापित कुटुंबामध्ये अनेक पिढ्यांपर्यंत शापाचे परिणाम भोगावे लागतात.

काही कुटुंबे तर अशी असतात की, त्यांच्या घराण्यामध्ये

कोणीतरी पूर्वजांनी चेडे-चेटूक किंवा बायंगी आणलेले असते. ज्या घराण्यात असे काही असते त्या घराण्यांना दहा ते पंचवीस पिढ्यांपर्यंतसुद्धा त्रास भोगावा लागतो. येथे थोडेसे विषयांतर करून चेडे-चेटूक किंवा बायंगी हे काय आहे, हे पाहू ! आपल्या घराण्यामध्ये सुबत्ता यावी म्हणून काही लोक एखादा पिशाच्च आत्मा आपल्या घरात आणून ठेवतात. या पिशाच्चाला वर्षातून एकदा एखादा बळी देतात. बाकी पूर्ण वर्षभर ते पिशाच्च आपले काम करीत असते.

ज्या कुटुंबामध्ये अशा प्रकारे पिशाच्च आणलेले असते, त्या पिशाच्चाला घरातील कोणी व्यक्ती अमुक एक वस्तू हवी आहे, असे सांगताच ती वस्तू घरात हजर होते. घरामध्ये अशा प्रकारचे पिशाच्च आणणे याला मराठीमध्ये बायंगी भूत, बायंगी, चेडे, चेटूक असे म्हणतात. सुरुवातीला जरी हा प्रकार फायद्याचा वाटत असला, तरी कालांतराने याचे भयंकर दुष्परिणाम होतात. अशा कुटुंबातील कोणीही व्यक्ती ईश्वरभक्ती करू शकत नाही. घरात ईश्वरभक्ती सुरू केल्यास संपूर्ण घराण्याला भयंकर त्रास होऊ लागतो. याशिवाय आणलेले भूत अनेक मार्गांनी सतावते हा भाग वेगळाच. असो !

अशा कुटुंबातील लोक पिढ्यान्‌पिढ्या यातना भोगतात व मृत्यूनंतर पिशाच्चलोकात जातात. ईश्वराच्या कृपेचा किरण त्यांना कधीही मिळत नाही. कुटुंब प्रारब्ध कसे असते याची

अत्यंत थोडक्यामध्ये वाचकांना माहिती दिलेली आहे. अशा अनेक कुटुंबांच्या एकत्रित प्रारब्धातून सामूहिक प्रारब्ध निर्माण होते.

### सामूहिक प्रारब्ध

शेकडो कुटुंबांचे प्रारब्ध एकत्र येऊन एखाद्या गावाचे प्रारब्ध तयार होते. हजारो गावांचे प्रारब्ध एकत्र येऊन एखाद्या देशाचे प्रारब्ध तयार होते. अशा प्रकारे सामूहिक प्रारब्ध किंवा सामाजिक प्रारब्ध तयार होते. सामूहिक किंवा सामाजिक प्रारब्धाचे वर्णन करणे अतिशय कठीण आहे, तरीसुद्धा वाचकांना हे सामूहिक प्रारब्ध कसे असते याची थोडीफार माहिती पुढे देत आहे.

समजा, एक छोटेसे गाव असून, त्या गावामध्ये सुमारे पन्नास घरे आहेत. गावाची लोकसंख्या सुमारे तीनशेच्या आसपास आहे. हे सर्वजण गरीब आहेत. परोपकारी आहेत. एकोप्याने व प्रेमाने राहणारे आहेत. हे लोक दिवसभर कष्ट करतात. संध्याकाळी घरी आल्यावर एक तास ईश्वराचे चिंतन करतात. सर्वांनी मिळून गावात एक धर्मशाळा बांधलेली आहे. या धर्मशाळेत बाहेरून येणारे लोक उतरतात. गावातील लोक अशा अपरिचित लोकांची सेवा करतात. गावात एक मंदिर असून, या मंदिरात ग्रामस्थ नामस्मरण करतात. एखादे गाव जर अशा प्रकारे असेल, तर त्या गावातील लोक सुखी, शांत व समाधानी असतील. असे या गावाचे सामूहिक प्रारब्ध असेल. या गावात चोरी होणे व आग

लागणे असे प्रकार होणार नाहीत. अशा गावात भूकंप व जलप्रलयही होत नाहीत. सामूहिक प्रारब्ध कसे असावे हे वर उदाहरण देऊन दाखविले आहे. या विरुद्ध जे जे काही असेल ते समाजाच्या दुष्कर्माचे परिणाम समजावेत.

समाज जेव्हा ईश्वराला विसरतो, चुकीच्या चालीरीती समाजात जेव्हा फोफावतात, माणसे जेव्हा स्वार्थी होतात, माणसे जेव्हा स्वत:पुरतेच जगतात, माणसे जेव्हा लोभी बनतात, भ्रष्टाचारी बनतात, कंजूष बनतात, माणसे जेव्हा परोपकार करणे सोडून देतात, माणसे जेव्हा इतरांना त्रास देतात, सुनांचा जेव्हा छळ होतो, सावत्र मुलांचा जेव्हा छळ होतो, प्रेमाने वागणे मानव जेव्हा सोडून देतो, दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचे मानव जेव्हा बंद करतो, वाईट व दुष्ट प्रवृत्ती जेव्हा समाजामध्ये बोकाळतात, मनुष्य जेव्हा स्वत:चाच विचार करू लागतो, स्वत:पुरताच जगतो, स्वार्थ जेव्हा पराकोटीला जाऊन पोहोचतो तेव्हा... समाजावर विविध प्रकारच्या आपत्ती यायला सुरुवात होते. भूकंप, जलप्रलय, अग्निप्रलय, दुष्काळ अशा विविध मार्गांनी अदृश्य सृष्टीतील शक्ती मानवाला त्रास द्यायला सुरुवात करतात.

राज्यकर्ते जेव्हा भ्रष्ट होतात, जनतेला लुटणे व पैसा खाणे एवढेच काम जेव्हा राज्यकर्ते करू लागतात, शासन यंत्रणेमध्ये भ्रष्टाचार जेव्हा बोकाळतो, तेव्हा रुद्र शक्तींचा कोप होतो. चोऱ्यांचे प्रमाण वाढते. आतंकवाद वाढतो. कुठल्या ना कुठल्या

कारणाने राज्यकर्त्यांना सतत डोकेदुखी होऊ लागते. युद्धजन्य परिस्थिती निर्माण होते. परकीय आक्रमण होते. हत्या व आत्महत्या यांचे प्रमाण वाढते.

**ईश्वरसान्निध्य म्हणजे शुद्धता, पवित्रता, शांती समाधान, आनंद, परोपकारी वृत्ती, नम्रता, सर्वांना आनंद देण्याची वृत्ती व प्रेम.**

समाजातील साधू, शास्त्री, पंडित, धर्ममार्तंड, पुजारी जेव्हा ईश्वराच्या जवळ नेणाऱ्या या सद्‌गुणांचे आचरण करणे सोडून देतात व राजकारण करणे, कपटकारस्थान करणे, तंत्र, मंत्र, भूत, पिशाच्चांच्या साधना करणे, पिशाच्च शक्तीने समाजावर नियंत्रण करणे, समाजाला आपल्या मुठीत ठेवणे असे प्रकार करतात, तेव्हा सामाजिक प्रारब्ध पराकोटीचे अशुद्ध होते. समाजामध्ये चुकीच्या रुढी, प्रथा हे तथाकथित धर्ममार्तंड सुरू करतात व चुकीच्या प्रथांमुळे कुटुंबव्यवस्था व समाजव्यवस्था बिघडून जाते. या पोथी पंडितांमुळे, तथाकथित धर्ममार्तंडांमुळे जेव्हा समाज पूर्णपणे बिघडतो तेव्हा चुकीच्या रुढी, प्रथा व परंपरा सुरू होतात. जेव्हा चुकीच्या रुढी, परंपरा व प्रथा समाजात फोफावतात तेव्हा ईश्वरी कोप होतो व चुकीच्या रुढी व परंपरा जोपासणारे देश पारतंत्र्य-गुलामगिरीच्या खाईत लोटले जातात. अशा देशांना हजारो वर्षे गुलामगिरीत काढावी लागतात. याशिवाय प्रलयंकारी भूकंप, अग्निप्रलय अशा

नैसर्गिक आपत्तींनी तो देश त्रस्त-ग्रस्त होतो. याशिवाय पराकोटीचे अज्ञान, पराकोटीचे दारिद्र्य, पराकोटीची मूढता, पराकोटीचा अहंकार व पराकोटीची अव्यवस्था या गोष्टी संपूर्ण समाजाला त्रस्त-ग्रस्त करतात.

**आपल्या देशाचे चांगले व्हावे असे वाटत असेल, तर समाजातील राज्यकर्त्या लोकांनी, सरकारी यंत्रणेत काम करणाऱ्या लोकांनी व समाजातील साधू व पुजारी लोकांनी स्वत:ला सुधारणे आवश्यक आहे. हे सुधारले तर समाज सुधारेल व समाज सुधारला, तर संपूर्ण देशाचे कल्याण होईल.**

सामूहिक प्रारब्ध कसे असते याचे थोडक्यात वर्णन या अध्यायात केलेले आहे. शांती, समाधान, आनंद या गोष्टी बाजारात कोठेही विकत मिळत नाहीत. गरीब अथवा श्रीमंत मनुष्याला, राज्यकर्त्याला अथवा सामान्य मानवाला शांती, समाधान हवे असेल, तर परोपकार, प्रेम, ईश्वरभक्ती व नि:स्वार्थ बुद्धी यांची कास धरावीच लागेल व यांची कास न धरल्यास सामूहिक प्रारब्ध, सामाजिक प्रारब्ध, देशाचे प्रारब्ध व जगाचे प्रारब्ध दूषित होत राहील व युद्ध, भांडणे, आतंकवाद कधीही नष्ट होणार नाहीत. यासाठी जगातील प्रत्येक मानवाने प्रेम, परोपकार, ईश्वरभक्ती यांची कास धरून शांती, समाधान व ईश्वरकृपा प्राप्त केली पाहिजे, तरच जगात शांतता नांदेल व जग सुखी होईल.

# १२. मृत्यूनंतरचे जीवन

पृथ्वीवरील मानवाचे जीवन संपल्यानंतर मानवाला अनेक गोष्टींचे ज्ञान होते. आपण किती चुकलो हे त्याला कळून येते व म्हणूनच साधू, संत व विचारवंतांनी मानवाला सांगितले आहे की, 'हे मानवा ! पृथ्वीवरील जीवनाला तू खरे जीवन समजू नकोस.' पृथ्वी म्हणजे एक विश्वविद्यालय आहे. येथे मानव शिकण्याकरीता येतो. येथे आल्यावर जर का तो शिकला नाही, तर मात्र त्याची दुर्गती होते व अशी दुर्गती होऊ नये म्हणून आजपर्यंतच्या अनेक प्रेषितांनी त्याला उपदेश केलेला आहे; परंतु मानव प्रेषितांनी काय सांगितले, कशासाठी सांगितले याचा विचार न करता प्रेषितांनंतर त्यांच्या नावे धर्मस्थापना करतो. मी अमुक एका धर्माचा म्हणून अभिमान बाळगतो व इतर धर्मियांचा द्वेष करू लागतो. इतरांनी आपल्या धर्मात यावे म्हणून त्यांच्यावर जुलूम, जबरदस्ती करतो. इतर धर्मियांची प्रार्थनास्थळे उद्ध्वस्त करतो.

आजपर्यंतचा इतिहास पाहता हेच आपल्याला दिसून येते. यातून जाती, पंथ, संप्रदाय व विविध धर्म यांची निर्मिती झाली, परंतु सत्य काय आहे ?

मृत्यूनंतर मानवाला सद्‌गती प्राप्त व्हावी, त्याच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून ईश्वराने प्रेषित पाठविले. या सर्व प्रेषितांच्या उपदेशाचे सार थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे,

१) प्रेमाने वागा.

२) द्वेष, मत्सर, फसवणूक करू नका.

३) परोपकार करा.

४) ध्यान, चिंतन करा.

५) ईश्वरभक्ती करा.

आजपर्यंत जितक्या प्रेषितांनी भूतलावर जन्म घेतला त्या सर्वांनी जे सांगितले त्याचा सारांश थोडक्यात वर सांगितला आहे, परंतु मानव प्रेषितांच्या उपदेशानुसार वागण्याचे सोडून भलत्याच मार्गाने जात आहे. त्यामुळे आज त्याला सांगण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे की, प्रेषितांनी त्याला सन्मार्गाने वागण्यास का सांगितले ?

पृथ्वीवरील मानव हा विविध योनींतून मनुष्यरूपाने पृथ्वीवर जन्माला येत असतो व त्यानुसार त्याची बुद्धी असते. त्यामुळे वैचारिकभिन्नता, स्वभावभिन्नता दिसून येते. असंख्य लोक क्रूर, कपटी, कारस्थानी असतात. त्यात त्यांचा काहीच दोष

नसतो; कारण पूर्वजन्मीच्या पशू योनीतून ते मनुष्य जन्माला आलेले असतात व साधू, प्रेषित हे अशा मनुष्यरूपी पशूला माणसात आणण्याचा प्रयत्न करीत असतात.

जर मनुष्याने स्वत:ला सुधारले नाही, तर काय होते हे आता आपण पाहू.

मनुष्याचे कर्म ज्या पद्धतिचे असेल त्याप्रमाणे त्याला मृत्यूनंतर सद्‌गती किंवा दुर्गती प्राप्त होते. दुर्जन लोक नरकात जातात तर सज्जन स्वर्गात जातात. साधू, संत, महान ईश्वरभक्त स्वर्ग लोकाहूनही उच्च लोकात जातात, तर असा हा परलोक कसा आहे हे आता आपण सारांशरूपाने पाहू.

**पहिला लोक – धूमयान मार्ग**

**पहिला स्तर – प्रेतलोक –** पहिला स्तर म्हणजेच नरक किंवा प्रेत लोक. स्थूलशरीरात असताना ज्यांनी भयंकर पापकर्मे केलेली असतात असे जीव या पहिल्या लोकात येतात. खून, दरोडे घालणे, दुसऱ्याच्या संपत्तीचा अपहार करणे, जुलूम किंवा अत्याचार करणे, पृथ्वीतलावर दहशतवाद निर्माण करणे, गुंडगिरी करणे, सुपारी घेऊन खून करणे, स्त्रियांवर अत्याचार करणे इत्यादी पापकर्मे करणारे लोक या पहिल्या प्रेतलोकात येतात.

या लोकांना मरताना विविध प्रकारच्या यातना भोगाव्या लागतात. मृत्यूसमयी भयंकर आकाराची पिशाच्चे पशुरूपाने पापात्म्याच्या आत्म्याला खेचत असतात, तर प्राण जाता जात

नसतो. ही फार भयानक स्थिती असते. भयानक पापकर्मांमुळे मृत्यूनंतर अशा जीवांच्या सूक्ष्मशरीराला अतिशय जडत्व आलेले असते व त्यामुळे पृथ्वीला चिकटून असलेल्या प्रेतलोकात यांची रवानगी होते.

असे पापी जीव जर अपघातात मेले, तर जेथे अपघात झाला त्याच जागी हजारो वर्षे राहतात व निरनिराळ्या चित्रविचित्र प्राणी-पशूंच्या रूपात ते जिवंत माणसांना दिसतात. खुनी आत्मे मृत्यूनंतर रक्तपिपासू बनतात व जेथे मानवी रक्त प्राप्त होईल अशा जागी राहतात. मानवी रक्त प्राप्त होणे दुर्लभ असते व या आत्म्यांची मानवी रक्त प्राप्त करण्याची भयानक धडपड चाललेली असते. असे मृतात्मे बऱ्याच वेळा अपघात घडवून आणतात व स्वत:ची रक्ताची तहान भागवितात. भूक, तहान, वासना, द्वेष, मत्सर इत्यादी शेकडो प्रवृत्तींनी या लोकातील जीवांना भयानक यातना भोगाव्या लागतात. या लोकातील यातनांची कल्पनाही करणे शक्य नाही, इतक्या यातना येथील लोकांना भोगाव्या लागतात. पुष्कळ वर्षांनंतर या अवस्थेतील आत्म्यांना गिधाड, घुबड, वटवाघूळ, काळे मांजर, तरस, घाणेरडे साप, चिखलातील किडे अशा नीच योनींत जन्म मिळतो, तर काही आत्मे हजारो वर्षे झाड, दगड अशा रूपाने राहतात. या योनीतील कित्येक आत्मे असे असतात की, त्यांना हजारो वर्षे ज्या जागी ते मृत झाले त्या जागीच भटकत राहावे लागते; ती जागा सोडून त्यांना अन्यत्र

जाता येत नाही. एकदा का एखाद्या मनुष्याची या प्रेत योनीत रवानगी झाली की, किमान हजार-दीड हजार वर्षे तरी सुटका होत नाही. या योनीतील कित्येक जीव असे आहेत की, लाखो वर्षे सुटकेची वाट पहात तडफडत आहेत.

या पहिल्या लोकातील अत्यंत सुरुवातीचा व पृथ्वीलगतचा हा प्रेतलोक अत्यंत अंध:कारमय असतो. शिवाय या लोकात भयानक आकाराचे चित्रविचित्र प्राणीही असतात. काही प्राण्यांना तर तव्या एवढ्या आकाराचा एकच डोळा असतो, तर काही प्राण्यांना मुंडकेच नसते. काहींचे नाक हातभर लांब, तर काहींना नाकच नसते. काहींचे कान हातभर लांब तर काहींना कानच नाही, अशा चित्रविचित्र देहांचे आत्मे या लोकात राहतात.

**दुसरा स्तर – पिशाच्चलोक –** पहिल्या लोकातच हा दुसरा स्तर असून, हाही पहिल्या इतका भयंकर आहे. फरक इतकाच की, या लोकातील आत्मे पहिल्या स्तरावरील आत्म्यापेक्षा थोडे कमी कुरूप असतात. बाकी सर्व यातना पहिल्या स्तराप्रमाणेच असतात. या लोकातील पिशाच्चे ही अत्यंत उग्र स्वरूपाची असतात. जे द्वेष, मत्सर करतात त्यांना या लोकात पाठविण्यात येते. समाजातील अत्यंत खालच्या वर्गातील लोक म्हणजे ज्यांनी विकासाच्या दृष्टीने काहीही प्रयत्न न करता केवळ पोट भरण्यात आयुष्य घालविलेले आहे, अशा स्वार्थी, लोभी, लालची लोकांची रवानगी या लोकात केली जाते. यातील अनेक आत्मे माणसांना पकडतात व त्रास देतात.

काही घरे वर्षानुवर्षे ओसाड दिसून येतात, कारण या लोकातील आत्मे येथे निवास करीत असतात. या लोकातील काही जीवात्मे एवढे मूढ असतात की, आपण मृत झालो आहोत हे त्यांना बराच काळ समजत नाही. या लोकातूनही हजारो वर्षे सुटका होत नाही तरीही काही आत्म्यांना नीच पशू योनीत शिक्षा म्हणून जन्म मिळतो.

भयंकर कंजूष माणसाला गिधाडाचा जन्म मिळतो. जे लोक फक्त स्वार्थ करतात अशा स्वार्थी लोकांच्या आत्म्याला कावळ्याचा जन्म मिळतो. जे लोक अतिशय नीच कर्मे म्हणजे खून, आतंकवाद, हत्या अशी कर्मे करतात अशा आत्म्यांना हजारो वर्षे नरकवास भोगल्यानंतर ओझी वाहणाऱ्या जनावरांचा जन्म मिळतो. या पिशाच्च लोकांत काही आत्मे असेही असतात की, मृत्यूनंतर येथील यातना सहन न झाल्याने ते परमेश्वराची प्रार्थना करतात. त्यावेळी त्यांची शेकडो वर्षांची शिक्षा लवकर संपविण्याच्या उद्देशाने त्यांना ओझी वाहणाऱ्या रेड्याचा अथवा बैलाचा जन्म दिला जातो. **ऋण, हत्या व वैर** यामुळे मनुष्याचा आत्मा नरकात जातो.

पृथ्वीतलावरील पैसे घेऊन दुसऱ्याचा खून करणारे, धंदेवाईक खुनी, गुंड, दादागिरी करणारे, डाकू, लुटारू, मदांध सत्ताधारी, पृथ्वीतलावर श्रीमंती भोगत असतानाही ज्यांनी दानधर्म केला नाही, असे लोक मृत्यूनंतर या लोकात येऊन राहतात. या लोकामध्ये एके काळी पृथ्वीतलावरील राज्यकर्ते म्हणून वावरलेले

आत्मे अद्यापही यातना भोगत आहेत.

## दुसरा लोक (नरक), भूतलोक – धूमयान मार्ग

या दुसऱ्या लोकालाही नरकच म्हटले जाते. फसवणूक, लबाडी, चोरी, विश्वासघात, लाच घेणे, स्त्रियांची अब्रू लुटणे, स्वार्थी अशा सर्व जीवांची रवानगी या लोकात होते. भूतलावर कपट, कारस्थानी मार्गाने श्रीमंत व सत्ताधीश झालेले लोक मृत्यूनंतर केलेल्या कर्मांची फळे या लोकात भोगत असतात. आत्महत्या करणारे लोकही या लोकात येतात. आत्महत्या करणाऱ्या मनुष्याची स्थिती इतकी वाईट असते की, मृत्यूनंतर अनेक वर्षे ते आत्महत्येच्या यातना अनुभवत राहतात. भूतलावर धनलोभाने पीडलेले लोक, धनासाठी वाटेल ते करणारे लोक या लोकात येऊन असंख्य वर्षे या भूत योनीत काढून नंतर सर्प योनीत जन्म घेतात. यातील काहींना वृक्षरूपानेही जन्म घ्यावा लागतो किंवा वृक्षावर असंख्य वर्षे लटकत राहावे लागते. विशेष म्हणजे या लोकातील तसेच पहिल्या लोकातील आत्म्यांना स्वत:च्या उद्धाराची जाणीव लक्षावधी वर्षे होत नाही. लाखातून एखाद्याला या लोकात आल्यावरही स्वत:च्या उद्धाराची जाणीव राहाते. या लोकातील आत्मेही मनुष्यांना खूप त्रास देतात. असंख्य रोग असे आहेत की, जे या योनीतील पिशाच्चांच्या बाधेमुळे होतात. या योनीतील स्त्रिया अनेक वेळा पृथ्वीतलावरील मानवांना भुलवितात व त्यांच्याशी संबंध जोडून

आपली वासना तृप्त करतात.

एखाद्या व्यक्तीच्या शरीरात घुसून या लोकातील भुते हजारो मैल प्रवास करतात.

पहिल्या लोकाप्रमाणे हा लोकही अंध:कारमय आहे. एखाद्या गुहेमध्ये जसा अंध:कार असतो तसा अंधार या लोकात असतो. या लोकातील काही आत्मे पृथ्वीतलावर झाडामध्ये, मोठमोठ्या शिलांमध्ये, दगडांमध्ये, गुहांमध्ये, वारुळांमध्ये राहतात.

पृथ्वीतलावर आपण पाहतो की, एखाद्या दगडाला शेंदूर फासलेला असतो. तेथे वर्षातून एकदा ग्रामस्थ कोंबड्यांचे, बकऱ्यांचे बळी देतात. अशा या शेंदूर फासलेल्या शिलांमध्ये या लोकातील आत्मे वास्तव्य करतात व बळी दिलेल्या प्राण्याचे रक्त पितात.

बळी घेणारे, रक्त पिणारे, बळी मागणारे अशा सर्व शक्ती या पिशाच्चलोकातीलच असतात हे वाचकांनी लक्षात ठेवावे. या पिशाच्चलोकांमध्ये क्रूर प्राणीही असतात; तसेच ज्यांची धडे माणसाची आहेत; पण शिरे मात्र प्राण्याची आहेत, असे आत्मेही या लोकात दिसून येतात.

**तिसरा लोक (नरक), असुर योनी – धूमयान मार्ग**

हा तिसरा लोकही अंध:कारमय असून, येथील अंधाराची तुलना पृथ्वीवरील अमावास्येच्या रात्री (ताऱ्यांच्या

प्रकाशविरहित) जसा अंधार असतो त्याच्याशी करता येईल.

स्वार्थी, प्रजेचे हित न जपणारे सत्ताधारी, आसुरी महत्त्वाकांक्षा बाळगणारे, इतरांवर हुकमत गाजविणारे अशा सर्व लोकांची रवानगी मृत्यूनंतर या लोकात केली जाते. धूर्त, कपटी, कारस्थानी, सत्तेचे राजकारण करणारे, सत्ता व संपत्तीसाठी वाटेल ते करणारे अशा मदांध लोकांना मृत्यूनंतर या स्तरावर हजारो वर्षे खितपत पडावे लागते. पृथ्वीतलावर तंत्रविद्या करणारे किंवा भूत-पिशाच्चांना वश करून त्याद्वारे लोकांची फसवणूक करणारे सर्व तांत्रिक-मांत्रिक लोक या स्तरावर येऊन अडकून पडतात. पृथ्वीतलावरील काही तांत्रिक भुतांना वश करतात. मृत्यूनंतर त्यांना या लोकात येऊन शेकडो वर्षे इतर तांत्रिकांचे गुलाम म्हणून वागावे लागते. या लोकात प्राचीन काळातील दुष्ट राक्षस जीव अद्यापही खितपत पडून आहेत. यातील बलवान आत्मे दुर्बल आत्म्यांना गुलाम बनवितात, तर पृथ्वीवरील काही मांत्रिक अशा बलवान आत्म्यांनाही वश करून घेऊन त्यांच्यावर सत्ता गाजवितात. या लोकातील कित्येक आत्मे अत्यंत वृद्ध व दुर्बलही असतात. काही अंधाऱ्या गुहांतून राहतात. या लोकातील कित्येक आत्मे पृथ्वीतलावरील माणसांवर आपला प्रभाव गाजवितात. माणसांच्या मनात लोभ, लालसा, स्वार्थ, दारू पिण्याचे व्यसन इत्यादी वाईट प्रवृत्ती निर्माण करतात.

या लोकातील कित्येक आत्मे पृथ्वीतलावरील स्त्री-पुरुषांत

संचार करतात व लोकांना चुकीचे मार्गदर्शन करतात, परंतु काही आत्मे मात्र योग्य मार्गदर्शनही करतात. या लोकातील काही स्त्रिया जल अप्सरा म्हणूनही पृथ्वीतलावरील स्त्री-पुरुषांना पकडतात. जीवात्म्याच्या येथपर्यंतच्या प्रवासमार्गाला भारतीय ऋषींनी धूमयान मार्ग किंवा अंधारमय मार्ग असे म्हटले आहे.

या स्तरावरील काही आत्मे स्मशानात राहतात, कबरस्थानात राहतात. तांत्रिक, मांत्रिक लोक कबरस्थानामध्ये, स्मशानामध्ये यांचे आवाहन करून यांना बळी अर्पण करतात व वश करून घेतात. काही आत्मे तर नुसत्या दारूनेही वश होतात. अशा प्रकारे पिशाच्चांना वश करून तांत्रिक-मांत्रिक अनेक प्रकारचे चमत्कार करतात. नजरबंदीची विद्या, जादूविद्या या आत्म्यांद्वारे साध्य करता येते; परंतु असे चमत्कार करणारे साधक मृत्यूनंतर याच लोकामध्ये दीर्घकाळ वास्तव्य करून राहतात.

**चौथा लोक, (पितृलोक) – पितृयान मार्ग**

हा चौथा लोक अगदी पृथ्वीसमान आहे. पृथ्वीवर ज्यांनी फारसे पाप केलेले नाही; परंतु फारसे पुण्यही केले नाही, अशा जीवांना या लोकात यावे लागते. पृथ्वीप्रमाणेच येथे दिवस-रात्र, चंद्राच्या कला, निसर्ग इत्यादींचे अस्तित्व असून, चांगली व वाईट अशी संमिश्र प्रवृत्तींची माणसे येथे राहतात. हा लोक पृथ्वी व स्वर्गलोक यांच्या मध्यावर असल्याने याला ब्रह्माण्डाची नाभी असेही म्हटले जाते. पृथ्वीतलावर जे आत्मे मनुष्यरूपाने जन्म घेतात, त्या मनुष्यरूपाचे सूक्ष्मशरीर किंवा लिंगदेह याची

निर्मिती या लोकात होते. आत्म्याच्या कर्मानुसार त्याला स्त्री किंवा पुरुषाचा देह प्राप्त होतो व येथून तो मनुष्यरूपाने पृथ्वीतलावर जन्म घेतो. मनुष्यरूपाने जन्म घेतल्यावर आपल्या साठ-सत्तर वर्षांच्या आयुष्यात त्याने अधोलोकात जायचे की सत्कर्मे, परोपकार, दानधर्म करून चौथ्या लोकाच्या वरील स्वर्गलोकात जायचे हे संपूर्णपणे मनुष्याच्या हातात असते.

तेव्हा वाचकांनो! तुम्ही विचार करा. तुमच्या साठ-सत्तर वर्षांच्या आयुष्यात पुण्य करून ऊर्ध्वलोकात जाण्यासाठी प्रयत्न करा. त्यासाठी सत्कर्मे, देवदर्शन, तीर्थयात्रा, परोपकार, दानधर्म या सर्व गोष्टी नि:स्वार्थ बुद्धीने करा, तरच तुम्ही तरून जाल. अहंकार, दुष्ट बुद्धी, द्वेष, मत्सर इत्यादी प्रवृत्तीने वागाल, तर तुम्हाला मृत्यूनंतर एक, दोन, तीन यांपैकी कुठल्यातरी लोकात खितपत पडावे लागेल, म्हणून पुन्हा-पुन्हा विचार करा. सत्तर वर्षांच्या सरासरी आयुष्यात बालपण व शिक्षण यात जवळजवळ वीस-पंचवीस वर्षे निघून जातात. पुढील सांसारिक जीवनात पैशासाठी उपद्व्याप करावेच लागतात; परंतु हे करताना वाममार्गाचा अवलंब करू नका. याने अधोगती होईल. प्रेमाने वागून जास्तीत जास्त लोकांचे आशीर्वाद प्राप्त करा. ध्यान, चिंतन करून परमेश्वराला आळवा; कारण वयाच्या साठ वर्षांनंतर इच्छा असूनही सत्कर्मे करणे कठीण जाते. म्हणून तारुण्यातच आध्यात्मिक प्रगती साध्य करा.

या चौथ्या लोकात ज्या मार्गाने आत्मे येतात त्या मार्गाला पितृयान मार्ग असे म्हणतात. पृथ्वीतलावरील ज्यांची मने स्वत:च्या कुटुंबाच्याच हितार्थ गुरफटलेली असतात, असे कुटुंबवत्सल जीव, त्याचप्रमाणे आपला संसार भला की आपण भले, अशा विचारांचे जीव या लोकात येतात. स्वत:च्या उन्नतीसाठी प्रयत्न न करता जे केवळ स्वत:चे व कुटुंबाचे पोषण करीत राहतात, आध्यात्ममार्गात प्रगती करीत नाहीत, असे जीव या पितृलोकात येतात. पितृलोकातील जीव आपल्या कुटुंबात, नातेवाईकांत किंवा मित्रमंडळींत पुनश्च जन्म घेतात. या पितृलोकातील जीवन फारसे चांगलेही नाही, फारसे वाईटही नाही. चिंता व काळजी येथील लोकांना सोडत नाहीत. आपल्या पाठीमागे असणाऱ्या कुटुंबियांची येथील जीव काळजी करीत राहतात. जेव्हा भूतलावरील नातेवाईक आपल्या पितरांची आठवण काढतात, त्यांच्या नावाने श्राद्धादी विधी करतात किंवा प्रार्थना करतात तेव्हा या लोकांना फार आनंद होतो. पृथ्वीतलावरील ८० टक्के लोक या लोकापर्यंत येऊन पोहोचतात. प्रवृत्तींच्या तीव्रतेवर कुठला आत्मा कोठल्या लोकात पाठवायचा हे ठरते. या लोकात काही महात्मेही राहतात. ते येथील लोकांच्या उद्धारासाठी प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे या लोकातही काही आत्मे पृथ्वीवरील लोकांशी संपर्क साधून त्यांच्या उद्धारासाठी प्रयत्न करतात.

या चौथ्या लोकाच्या शेवटी एक नदी असून, या नदीला

वैतरणा (तरून जाण्यास कठीण अशी) असे नाव आहे. ही नदी पार केल्यावर स्वर्गलोकाची सुरुवात होते. या लोकात राहणाऱ्या महात्म्यांच्या उपदेशाने जे पावन होतात त्यांना येथून पुढे जाण्यास मिळते. पृथ्वीलोकात जे परोपकार, दानधर्म, ईश्वर उपासना करतात असे लोक जेव्हा मृत्यू पावतात तेव्हा प्रथम सरळ या लोकातील या वैतरणानामक नदीजवळ येतात. येथे एक गाय येते व त्या गाईची शेपटी पकडून आत्मा ही वैतरणा नदी पार करतो. पृथ्वीतलावर ज्यांनी सद्‌गुणांचे आचरण केले आहे व सद्‌गुरुंची सेवा केली आहे अशा गुरूंचे शिष्य जेव्हा मृत होऊन या नदीपर्यंत पोहोचतात तेव्हा या नदीतून गुरूंचा हात बाहेर येतो. या हाताला धरून आत्मा ही नदी पार करून स्वर्गलोकात प्रवेश करतो.

या चौथ्या लोकातील वातावरण पृथ्वीसारखेच असते. पृथ्वीवरील निसर्गाप्रमाणे येथेही निसर्ग आहे. येथील मानव पृथ्वीवरील मानवासारखा असतो. फक्त येथील लोकांना भूक व तहान नसते. अन्नाच्या वासाने, सुगंधाने यांची तृप्ती होते, तरीही येथील लोक त्यांच्या वंशजांची काळजी करीत राहतात. रोगराई या प्रदेशात नसते, तरीही काही जीवांना मानसिक दुःख असते. येथे राहणारे सत्पुरुष येथील जीवांना मार्गदर्शन करतात. येथील काही सात्त्विक स्वभावाच्या स्त्रिया या लोकातील लहान मुलांची काळजी घेतात. ही लहान मुले पृथ्वीतलावर मृत झालेली असतात. या लोकातील काही आत्मे पृथ्वीवरील

आपल्या नातेवाईकांपैकी कुणाच्या तरी अंगात संचार करून मार्गदर्शन करतात, तर काही स्त्री-पुरुष ग्राम-देवतांच्या रूपानेही राहतात.

येथील सत्पुरुष सद्प्रवृत्तीची जोपासना करण्याचा उपदेश येथील आत्म्यांना करतात. या लोकांतील प्रत्येक जण आपल्या इच्छेप्रमाणे घरदार निर्माण करून आपल्या मित्रमंडळींसह राहू शकतो. येथील निवासींना संकल्प करताच त्यांना हवी असलेली वस्तू प्राप्त होते. याच पद्धतिने हे लोक घरेदारे व आपल्या आवडत्या वस्तू निर्माण करतात. जे लोक स्वर्गाच्या प्रवेशद्वाराजवळ उभे असतात अशा लोकांना ही सामर्थ्ये प्राप्त होतात. स्वर्गात प्रवेश करण्यापूर्वी त्यांचे लिंगदेह वितळून जातात व नवीन सुंदर सुडौल, अलंकारयुक्त असे दिव्य देह प्राप्त होतात. समाधानी वृत्तीची माणसे सरळ चौथ्या लोकातून पाचव्या लोकात प्रवेश करू शकतात, तर चिंता, काळजी करणारे आत्मे पुन्हा पृथ्वीलोकावर जन्म घेतात. पितृयान पंथ येथे संपतो.

**पाचवा लोक, कनिष्ठ स्वर्ग लोक - देवयानमार्ग**

स्वर्गलोकाचे दोन भाग आहेत. कनिष्ठ स्वर्गलोक व श्रेष्ठ स्वर्गलोक. कनिष्ठ स्वर्गलोकात मुख्यत्वेकरून चौथ्या लोकातून आलेले जीव राहतात किंवा पृथ्वीलोकावरून मृत्यू पावल्यावर काही लोक वैतरणा नदीजवळ घोटाळत राहतात व नंतर त्यांच्या पुण्यप्रभावाने त्यांचा कनिष्ठ स्वर्गलोकात प्रवेश होतो.

याशिवाय या लोकात यक्ष, किन्नर, देवदेवता, संगीताच्या देवताही राहतात; परंतु यांनाही गौण देवता म्हटले जाते. ज्या मार्गाने पृथ्वीतलावरील आत्मे येथे येतात त्या मार्गाला देवयान पंथ किंवा देवयानमार्ग असे म्हणतात. यावरून वाचकांच्या लक्षात येईल की, आतापर्यंत आपण एकूण तीन मार्गांचा परिचय करून घेतला.

**धूमयान मार्ग –** या मार्गाने पापी जीव एक ते तीनपर्यंतच्या अंध:कारमय, यातनामय लोकात जातात.

**पितृयान मार्ग –** या मार्गाने आत्मे पितृलोकात म्हणजे चौथ्या लोकात येतात व यातील काही वैतरणा नदी पार करून स्वर्गलोकात प्रवेश करतात.

**देवयान मार्ग –** या मार्गाने पुण्यवान आत्मे स्वर्गलोकात प्रवेश करतात.

पृथ्वीतलावर जप, तप, यज्ञ, दान, परोपकार, ईश्वरभक्ती करणारे आत्मे प्रथम या कनिष्ठ स्वर्गलोकात प्रवेश करतात.

येथील आभाळ अतिशय स्वच्छ असते. येथील आत्मे अतिशय सुंदर असतात. येथील वातावरणात सर्वत्र सौंदर्य भरलेले असते. सर्वत्र आनंदी आनंद असतो. येथील जीव परोपकार करणारे असतात, किंबहुना परोपकार करणाऱ्या आत्म्यांना या कनिष्ठ स्वर्गलोकात प्रवेश मिळतो व येथून मग ते स्वर्गलोकाकडे प्रयाण करतात. येथील लोकांना जीवांच्या उद्धाराचे कार्य दिले जाते. भूक, तहान, रोग, निद्रा या लोकी

असत नाहीत. स्त्री-पुरुष आनंदात राहतात, प्रेमाने वागतात.

या लोकांतील असंख्य आत्मे पृथ्वीतलावरील लोकांना मदत करणे, स्वप्नांत जाऊन मार्गदर्शन करणे, प्रार्थनेला प्रतिसाद देणे अशा प्रकारची कामे करतात. पृथ्वीतलावरून या लोकात प्रवेश करणाऱ्या लोकांना मार्गदर्शन करण्याचे कार्य करतात. येथील आत्मे स्वत:च्या इच्छेप्रमाणे अत्यंत सुंदर निवासस्थाने निर्माण करतात. केवळ संकल्प करायचा अवकाश की, येथील आत्म्यांना जसे हवे तसे घर निर्माण करता येते. या लोकात सुंदर जलाशय आहेत. काही आत्मे जलाशयावर तरंगती घरे निर्माण करून राहतात. तेथील वातावरण अत्यंत प्रसन्न असते. सुंदर पर्वतराजी, वनश्री, दऱ्या व शीतल-आनंददायक प्रकाश हे या लोकाचे वैशिष्ट्य आहे. पृथ्वीतलावर प्रेमाने वागून परोपकार करणारे आत्मे या लोकी अत्यंत आनंदात राहतात. येथील पशू-पक्षीही अत्यंत सुंदर असतात. सर्वत्र शांती भरून राहिलेली असते.

दिवस-रात्र असा प्रकार येथे नसतो. थंडी, उन्हाळा असे ऋतुमान येथे नसते. सदैव प्रसन्न वातावरण असते. येथील लोक एकत्र जमतात व धर्मचर्चा करतात. ईश्वरनामाचा महिमा गातात. पुष्कळ वेळा अत्यंत उच्च कोटीचे महात्मे या लोकांना भेट देतात व मार्गदर्शन करतात. येथील वृक्ष सदा फळा-फुलांनी बहरलेले असतात. येथील आत्मे कधीकधी पुष्पशय्येवर विश्राम करतात. येथे सदैव स्निग्ध, शीतल प्रकाश वातावरणात

भरून राहिलेला असतो. ब्रह्मलोकात वास करणारे अनेक महात्मे अधून-मधून या लोकांना भेट देतात. त्यांची दर्शने होताच येथील लोकांच्या सूक्ष्मदेहात उन्नतीकारक परिवर्तन आपोआप होते व श्रेष्ठ स्वर्गलोकाच्या दिशेने येथील आत्म्यांची प्रगती होत राहते.

### सहावा लोक, श्रेष्ठ स्वर्गलोक

सहावा लोक हा पाचव्या लोकापेक्षा कितीतरी पटीने अधिक सुंदर असून येथील सौंदर्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही. सर्वत्र हिरवीगार सृष्टी, अत्यंत रमणीय वातावरण, सदैव स्निग्ध प्रकाश, आल्हाददायक व प्रसन्न हवामान हे या लोकाचे वैशिष्ट्य असून या लोकात देवपदाला पोहोचलेले आत्मे तसेच देवता राहतात. पृथ्वीवर जे लोक पुण्य, परोपकार,दान-धर्म, ईश्वरभक्ती, प्रेमाने व नि:स्वार्थ बुद्धीने वागतात, ते लोक या सहाव्या लोकात प्रवेश करतात. ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य नि:स्वार्थ परोपकारात घालविले आहे असे आत्मे सरळ या श्रेष्ठ स्वर्गलोकात प्रवेश करतात.

कनिष्ठ स्वर्गलोकात प्रवेश मिळाल्यापासून तसेच पुढील सर्व लोकात एक वैशिष्ट्य असे असते की या लोकातील आत्मे चिरतरूण असतात. समजा एखादा मनुष्य पृथ्वीवर मरताना त्याचे वय नव्वद पंच्याण्णव वर्षांचे आहे. अर्थात ते जरा-जर्जर शरीर टाकून तो जेव्हा पाचव्या किंवा सहाव्या लोकात प्रवेश करतो तेव्हा त्याचे सूक्ष्मशरीर अत्यंत तेजस्वी

व तीस बत्तीस वयोमानाचे दिसून येते. ही सुविधा फक्त पाचव्या लोकापासून आहे. म्हणून देव-देवतांची चित्रे तरुण, यौवनसंपन्न अशी चितारली जातात. सौंदर्य हा स्वर्गलोकाचा स्थायीभाव असून येथील प्रत्येक आत्मा सौंदर्यसंपन्न असतो. येथील भूमिवर रत्ने इतस्तत: विखुरलेली असतात. भूमीचे रंगही वेगवेगळे असतात. काही ठिकाणी सुवर्णरंग भूमी तर काही ठिकाणी पाचूच्या रंगाची भूमीही येथे आहे.

सौंदर्य, आनंद व प्रसन्नता हे या लोकाचे वैशिष्ट्य आहे. पुण्यवान जीव हजारो वर्षे येथे आनंद उपभोगत राहतात. तसेच ते आत्मोन्नतीही करून घेतात. पृथ्वीतलावर कोठेही पाहायला मिळणार नाहीत अशा प्रकारचे रंग येथे पाहायला मिळतात. अशा दिव्य रंगातील पक्षी, फुले , फुलझाडे, वृक्ष-वनश्रीने हा लोक अधिकच सौंदर्यसंपन्न बनला आहे. येथील नद्यातील पाणीही विविध रंगी असते व त्यातील मासेही मोहक असतात. सर्वत्र प्रेमाचे व शांतीचे वातावरण असते. पृथ्वीतलावर अत्यंत नि:स्वार्थ बुद्धीने जगलेले लोकच या लोकात प्रवेश करू शकतात. येथील लोक त्यांच्या आवडीनुसार भक्ती करतात. एखाद्याला शिवपूजा करायची असेल तर त्याला हवी असणारी सर्व सामुग्री मनात आणताच निर्माण होते. एखाद्याला येशूख्रिस्ताची प्रार्थना करायची असेल तर त्याच्या आवडीप्रमाणे सारे काही येथे उपलब्ध होते.

येथे आल्यावर मनुष्याला आपण पृथ्वीतलावर किती

मूर्खपणाने वागत होतो याचे ज्ञान होते. पृथ्वीवरील धर्म, जात, पंथ, भेद-भाव, श्रेष्ठ-कनिष्ठ भाव यांचा स्वर्गात काही उपयोग होत नाही याचे त्याला ज्ञान होते. हा श्रेष्ठ स्वर्गलोक विस्ताराने खूपच मोठा आहे. येथील काही भागात देवता राहतात. या देवतांचे विशिष्ट अधिकार असतात व आपापल्या अधिकारानुसार त्या कार्य करीत असतात. प्रत्येक देवतेचा स्वतंत्र महाल असतो. आपापल्या महालात या देवता राहतात व येथून पृथ्वीतलावरील आपल्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण करतात. या स्वर्गलोकात विविध विभाग असून या विविध विभागांना वेगवेगळी नावे आहेत. उदा. शुक्रलोक, बुधलोक, चंद्रलोक, इत्यादी, परंतु या सर्वांस मिळून स्वर्ग हे एकच नाव आहे. शुक्रलोकात संगीताची आवड असणारे संगीततज्ज्ञ असे आत्मे राहतात. तेथील आत्मे फारच सौंदर्यसंपन्न असतात. त्याचप्रमाणे बुद्धिमान, साहित्य, वाङ्मय यात रुची असणारे आत्मे बुधलोकात राहतात. परमहंसपदाला पोहोचलेले लोक चंद्रलोकावर राहून इतर लोकांतील आत्म्यांना मार्गदर्शन करतात. शुक्रलोकावरील आत्मे विज्ञानात फारच प्रगत आहेत. शिवाय संगीताला सृजन शक्तीचे सामर्थ्य येथील आत्मे देऊ शकतात. या लोकातील आत्मे पृथ्वीतलावरील मनुष्यांना प्रेरणा देतात. या प्रेरणेमुळेच निरनिराळे शोध पृथ्वीतलावरील लोकांना लागतात. स्वर्गलोकातील आत्मे स्वर्गलोकाच्या कक्षेत येणाऱ्या सर्व लोकांत हिंडू फिरू शकतात. येथील

आत्मे मनोवेगाने कोठेही जाऊ शकतात. दु:ख, चिंता, काळजी यांचे अस्तित्व स्वर्गलोकात मुळीच नसते.

स्वर्गलोकात पर्वत आहेत. पर्वतात गुहा आहेत. परंतु येथील गुहांमध्ये अंधार नसतो. सर्वत्र शीतल प्रकाशाचे साम्राज्य असते. येथे स्फटिकांचे व हिऱ्यांचे पर्वत आहेत. यातून आल्हाददायक प्रकाश परावर्तीत होत असतो. स्वर्गातील इंद्रधनुष्य अत्यंत विलोभनीय व विविधरंगी असते. स्वर्गात अनंत प्रकारची सुंदर फुलझाडे, फळझाडे आहेत. परंतु येथील प्रत्येक वस्तू ही परिपक्व वयाची असते. म्हणजे रोपट्याचे झाड होणे, झाड म्हातारे होणे, पाने सुकून गळणे, फुलापासून फळ येणे असा प्रकार येथे नसतो. येथील वृक्ष लहानाचे मोठे होत नाहीत व मरतही नाहीत. प्रत्येक झाडाचा किंवा वृक्षाचा एक ठराविक आकार असतो, तो कायम तसाच राहतो. येथील फुलझाडांची फुले गळून पडत नाहीत. सडणे, कुजणे, दुर्गंधी हा प्रकार स्वर्गात मुळीच नाही. येथील काही फुले दोनदोन फूट आकाराची आहेत. येथील फुलांच्या सौंदर्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही. सुंदर-सुंदर नौकातून येथील आत्मे विहार करतात. येथील जलाशयही अतिशय सुंदर आहेत. येथील नद्यांच्या प्रवाहातून कर्णमधुर संगीत बाहेर पडते. स्वर्गात विविध आकाराचे अत्यंत सुंदर प्राणी आहेत. हे प्राणीही अत्यंत दिव्य रूपधारी असतात. हे प्राणी गवतावरून चालताना गवताचे पातेही लवत नाही. तुडविले जात नाही. वैरभाव व ईर्षा यांचे

वास्तव्य स्वर्गात नाही. त्यामुळे येथील वाघ, सिंह व गायींचे कळप एकत्र नांदतात.

स्वर्गातील जीवनात चढ-उतार नसतो. त्यामुळे वृद्ध होणे, अशक्त होणे, जन्म-मृत्यू, भूक-तहान यांचे वास्तव्य स्वर्गात नसते. येथील महान आत्मे स्वत:च्या उन्नतीसाठी सतत प्रयत्न करीत राहतात. तसेच खालच्या स्तरावरील लोकांना मदत करीत राहतात. या स्वर्गलोकात कोट्यावधी देवदेवता राहतात व आपापल्या अधिकाराप्रमाणे कार्य करीत राहतात. या लोकातील कित्येक आत्मे पृथ्वीतलावर जन्म घेऊन सज्जनतेचा, मानवतेचा आदर्श समाजासमोर निर्माण करतात.

**ईश्वर चिंतनाने, नि:स्वार्थ बुद्धीने, परोपकार करीत समाधान वृत्तीने जगण्याने अत्यंत दिव्य असा हा स्वर्गलोक प्राप्त होतो.**

## सातवा लोक – ब्रह्मलोक – १

स्वर्गलोकानंतर पुढील सर्व लोकांना ब्रह्मलोक म्हटले जाते. यद्यपि वेगवेगळ्या भाषेत या लोकांना वेगवेगळी नावे आहेत. तरी हा सर्व प्रांत परब्रह्माच्या जवळ जाणाऱ्या लोकांसाठी असल्याने याला ब्रह्मलोक हेच नाव सार्थ वाटते. स्वर्गलोक व ब्रह्मलोक यांच्यामध्ये एक बारीक किरणांची रेषा आहे. येथे हे दोन्ही लोक विभागले जातात. श्रेष्ठ स्वर्गलोकातून फारच थोडे आत्मे ही रेषा पार करून ब्रह्मलोकात प्रवेश करू शकतात. महालोक, तपोलोक इत्यादी त्याचेच

विभाग मानले जातात.

मनाचा नाश झाल्यावरच या लोकात प्रवेश प्राप्त होतो. म्हणून पृथ्वीतलावरील योगी साधनेद्वारा स्वत:च्या मनाचा नाश घडवून आणतात. म्हणजे मन उन्मन करतात. जेव्हा मन उन्मन होते तेव्हा ब्रह्मलोकाचे द्वार उघडते. या ब्रह्मलोकात पराशांती प्राप्त होते. ब्रह्मलोकातील आत्म्यांचे अति सूक्ष्मदेह हे ज्योतिर्मय असतात. हे महान आत्मे इतर लोकांच्या उद्धारासाठी अहर्निश प्रयत्न करीत असतात. पृथ्वीवर ज्यांनी समाधी अवस्था प्राप्त केली आहे असे श्रेष्ठ महान आत्मे या लोकांत येऊन राहतात. असंख्य देवदेवताही येथील महान आत्म्यांची सेवा करतात.

ज्यांनी समाधी अवस्था प्राप्त केली आहे असे पृथ्वीवर योगसाधना केलेले योगी लोक या लोकात राहतात. या लोकात आल्यावर अनेक महान आत्म्यांचा सहवास घडतो. पुष्कळ वेळा येथील आत्मे अन्य लोकांत जाऊन आत्म्यांना उपदेश करतात. तसेच पृथ्वीतलावर भक्तिमार्गाचा प्रसार करतात.

**आठवा लोक, ब्रह्मलोक – २**

या लोकात एक अतिविशाल सूर्य असून या सूर्याच्या तेजाने इतर लोकांतील सूर्य, ग्रह, नक्षत्र, तारे प्रभावित होत असतात. हा प्रदेश अत्यंत उष्ण असल्याने याला तपोलोक असेही म्हणतात. महान सिद्धयोगी, तपस्वी लोकच या लोकात

प्रवेश करू शकतात.

श्रेष्ठ स्वर्गलोकातून उन्नती करीत काही आत्मे येथपर्यंत येऊ शकतात. परंतु एखाद्या पाचव्या सहाव्या लोकातील आत्म्याला या लोकात केवळ फिरण्यासाठी यायचे झाल्यास स्वत:वर विशिष्ट प्रकारचे कवच पांघरूनच यावे लागते अन्यथा या लोकातील तेज सहन होत नाही. या ब्रह्मलोकाचा आणखी एक पोटविभाग असून त्याला नक्षत्रलोक म्हणतात. येथील आत्म्यांचे सूक्ष्मदेह अत्यंत तेजस्वी असून ते चांदण्याप्रमाणे चमचम करीत असतात. हा लोक अत्यंत सुंदर व मधुर आहे. ब्रह्मलोकाचा उपविभाग असूनही शतकोटी चंद्राप्रमाणे हा प्रांत अत्यंत शीतल आहे. येथील जलाशयही ज्योतिर्मय आहेत. अनेक प्राचीन ऋषी, महान भक्त या नक्षत्र मंडलात निवास करतात. असंख्य देवता या लोकात राहतात. येथील देवता, ऋषी, महान आत्मे पृथ्वीवरील भक्तांच्या उद्धाराचे कार्य करतात. भक्तांच्या हाकेला धावून जातात.

### नववा लोक – ब्रह्मलोक ३

हा नववा लोक म्हणजे एक महान ज्योति असून या तेजोपिंडातून समस्त सृष्टीची उत्पत्ती होत असते. या लोकाला आनंदधाम असेही म्हणतात.

या नवव्या लोकात जीव प्रवेश करताच तो निर्गुण, निराकार, भेदरहीत होऊन जातो. असंख्य महात्मे, देव–देवता या तेजोमय निर्गुण निराकार ज्योतिमध्ये प्रवेश करतात व

स्वत:चे अस्तित्व नष्ट करतात. या ज्योतिच्या लालसर, सुवर्णरंगी पिवळसर, धवलशुभ्र कडा, सत्त्व, रज, तमोगुणांचे दर्शन घडवितात. या महाज्योतिलाच आपण परमात्मा म्हणतो. या समस्त सृष्टीवर  या ज्योतिर्मय परमात्म्याची सत्ता चालते. या ज्योतितून साऱ्या ब्रह्माण्डाचा उगम होतो व अंती या ज्योतितच साऱ्या ब्रह्माण्डाचा अंत होतो. आतापर्यंत आपण मृत्यूनंतर मनुष्याचा आत्मा कशाकशा अवस्थेतून जातो हे पाहिले. पुण्य व पाप यांचा प्रभाव पाहिला. यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे चौथ्या लोकापर्यंतच्या जीवांना पृथ्वीतलावर परत जन्म घ्यावा लागतो. पाचव्या लोकापासून वर राहणाऱ्या आत्म्यांना पृथ्वीवर जन्म घ्यावा लागत नाही. त्यातूनही काही उच्च कोटीचे महात्मे नवव्या लोकापर्यंत पोहोचून पुनश्च खाली उतरतात व लोकोद्धाराचे कार्य करतात. यातील कित्येक आत्मे पृथ्वीतलावर जन्म घेऊन लोकोद्धाराचे कार्य करतात.

**पृथ्वीवरील सर्व प्रेषितांच्या जीवनाचा एकच उद्देश असतो की, मानवाने ईश्वरभक्ती, प्रेम, परोपकार करून जास्तीत जास्त उच्च लोकात प्रवेश करावा. यासाठीच ते सतत प्रयत्नशील असतात. तरी मानवांनो ! हे ध्यानात घ्या. साठ सत्तर वर्षांचे जीवन म्हणजे सर्वस्व असे समजू नका. जास्तीत जास्त चांगले वागा. नि:स्वार्थी राहा. तरच  आनंदमय परलोकात तुमचे स्वागत होईल.**

# १३. ग्रंथरहस्य

आपल्या विविध ग्रंथांमध्ये अनेक प्रकारची रहस्ये दडलेली आहेत. विचारवंतांनी या रहस्याचा शोध घेऊन यातील आध्यात्म, आत्मज्ञान, मंत्रशास्त्र इत्यादी गोष्टी जगासमोर आणल्या पाहिजेत. ग्रंथांमध्ये गूढ रहस्ये कशी भरलेली असतात याची थोडीशी झलक पुढे देत आहे.

**रामायण**

दशरथ म्हणजे मानवी देह. दशरथाच्या तीन बायका म्हणजे मानवी देहातील इडा, पिंगला, सुषुम्ना. राम म्हणजे आत्मा, सीता म्हणजे कुंडलिनी शक्ती, मारुती म्हणजे प्राणवायु, रावण म्हणजे अहंकार, कुंभकर्ण म्हणजे आळस, बिभिषण म्हणजे सद्‌सद्‌विवेकबुद्धी, लक्ष्मण म्हणजे मन, भरत म्हणजे भक्ती किंवा प्राणसाधना. शत्रुघ्न म्हणजे साधनेतील विघ्ने निवारण

करून पुढे जात राहण्याची दुर्दम्य इच्छा. अशा प्रकारे रामायणामध्ये अनेक रहस्ये दडलेली आहेत.

**महाभारत**

पाच पांडव म्हणजे शरीरातील पाच वायु – प्राण, अपान, व्यान, उदान, समान. द्रौपदी म्हणजे कुंडलिनी शक्ती, शंभर कौरव म्हणजे माणसातील शंभर दुष्प्रवृत्ती. श्रीकृष्ण म्हणजे आत्मा.

पंचप्राण आत्म्याची साधना, भक्ती करून शंभर कौरवांचा म्हणजे शेकडो दुष्प्रवृत्तींचा नाश करतात, असे महाभारतात सांगितले आहे.

**वटसावित्री कथा**

सावित्री म्हणजे तीन वाहणारे प्रवाह–इडा, पिंगला, सुषुम्ना. या इडा, पिंगला, सुषुम्ना यांच्या त्रिवेणीमध्ये स्नान केले असता म्हणजे प्राणसाधना केली असता कुंडलिनी जागृत होते व वटवृक्षासारखी सिद्धावस्था प्राप्त होते. अनेकांना आश्रय देण्याची शक्ती प्राप्त होते. अनेकांचे कल्याण करता येते. या सावित्रीचा पती, सत्यवान म्हणजे सुशील आत्मा म्हणजे सात्त्विक मनुष्य. सावित्रीची म्हणजे तीन सरितांची म्हणजे इडा, पिंगला, सुषुम्ना यांची साधना केली असता यमाचे म्हणजे मृत्यूचे भय

रहात नाही. हा झाला ग्रंथांचा आध्यात्मिक भाग !

याशिवाय या दिव्य ग्रंथांमध्ये जी विविध स्तोत्रे दिलेली असतात, त्या स्तोत्रांमध्ये अमोघ शक्ती असते. या स्तोत्रांचे पाठ केल्याने दैवी शक्ती प्राप्त होते. याशिवाय अठरा पुराणांमध्ये काही कथा अशा आहेत की या कथांद्वारे आकाशातील ग्रह, नक्षत्र, तारकांची माहिती दिलेली आहे.

श्रीदुर्गासप्तशती हा ग्रंथ सुद्धा विविध प्रकारच्या शक्तींनी भरलेला आहे. या ग्रंथांतील देवीसूक्त, देवीकवच व नारायणीस्तुती इत्यादी स्तोत्रे दैवी शक्ती संपन्न आहेत.

गणपतीस्तोत्र, श्री सूक्त, ललितासहस्रनाम, विष्णूसहस्रनाम, रामरक्षा या स्तोत्रांमध्येसुद्धा अमोघ दैवीशक्ती आहे. या स्तोत्रांच्या पाठाने मानवी जीवनाचे सार्थक होते.

खूप मोठे मोठे ग्रंथ वाचण्याऐवजी एखाद्या स्तोत्राचे हजारो पाठ करावे. म्हणजे ते स्तोत्र सिद्ध होते व त्या स्तोत्रातील देवता भक्तांचे संरक्षण करते व भक्ताला कुठल्याही गोष्टींची कमतरता पडू देत नाही.

आपल्या ग्रंथांमध्ये वृक्षांच्या महात्म्याची अनेक वर्णने आहेत. वड, औदुंबर, पिंपळ, शमी अशा वृक्षांची लागवड केल्याने खूप पुण्य प्राप्त होते. तसेच वातावरण शुद्ध होते.

नदीच्या किनारी किंवा पाणवठ्याच्या जागी अशा वृक्षांची लागवड करावी. ही सुद्धा एक साधनाच आहे. अशा वृक्षांच्या लागवडीने खूप पुण्य मिळते. जो एकशे आठ वृक्ष लावतो, त्याच्यावर त्या वृक्षाची देवता कृपा करते, असे ग्रंथामध्ये सांगितले आहे. औदुंबराचे एकशे आठ वृक्ष लावले असता दत्ताची कृपा होते. पिंपळाचे एकशे आठ वृक्ष लावले असता विष्णूची कृपा होते व पितरांना सद्‌गती प्राप्त होते. वडाचे एकशे आठ वृक्ष लावले असता शंकराची कृपा होते, ऋषींची कृपा होते. शमीचे एकशे आठ वृक्ष लावले असता गणपतीची कृपा होते. ग्रंथांमध्ये असे वृक्ष महात्म्य सांगितलेले आहे. अशा प्रकारे ग्रंथांमध्ये गूढ रहस्ये सांगितलेली आहेत.

**समाप्त**

**परोपकारार्थं इदं शरीरम्।**

**ईश चिंतनार्थं इदं मनः ।**

**विवेकार्थं इदं बुद्धिः ।**

**ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।**

**शरीर परोपकार करण्यासाठी आहे.**

**मन ईश्वर चिंतनासाठी आहे.**

**बुद्धी, चांगले - वाईट (विवेक)**

**यांचा विचार करण्यासाठी आहे.**

**जीवन हे ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहे.**

**- श्री स्वामी दत्तावधूत**

आता हृदय हे आपुले ।
चौफाळोनिया भले ।।
वरी बैसवू पाऊले ।
समर्थ स्वामी सद्‌गुरुची ।।

प्रभू आपण शंकर ।
मी पूजितो पामर ।।
मम बोल अरण्यपत्र ।
बेल म्हणौनी स्विकारावे ।।

– श्री स्वामी दत्तावधूत